४१ वा वर्धापन दिन

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

४१ वा वर्धापन दिन

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, ८ ऑगस्ट २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक २७० । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पाचवे सरसंघचालक कुप्प सी. सुदर्शनजी यांचा आज तिथीनुसार स्मृतिदिन

देशाच्या उन्नतीसाठी प्रत्येक भारतीयाला त्याच्या संस्कृतीचा अभिमान ठेवावा लागेल. भारतीयत्वाची खरी ओळख ही आपल्या विविधतेतून एकात्मतेत आहे. संघभावना ही केवळ संघाचीच नाही, तर ती प्रत्येक भारतीयाची जपणूक आहे.

**- कुप्प्. सी. सुदर्शनजी**
रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक

# शेतकऱ्यांच्या हिताशी तडजोड नाही : मोदी

## कृषिक्षेत्र अमेरिकेसाठी खुले करणार नसल्याचे केले स्पष्ट



**◆ नवी दिल्ली, ७ ऑगस्ट**
**आपले शेतकरी, मासेमार आणि दुग्ध व्यावसायिकांच्या हिताशी भारत कोणतीही तडजोड करणार नाही आणि आवश्यक असल्यास वैयक्तिकरीत्या मोठी किंमत चुकवण्यास तयार आहे, असा स्पष्ट संदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना दिला.**

भारत आणि अमेरिका व्यापार करारावर वाटाघाटी करीत असतानाही ट्रम्प यांनी बुधवारी भारतीय वस्तूंवर ५० टक्के शुल्क लादण्याची घोषणा केली. त्यानंतर आज नरेंद्र मोदी यांनी हा संदेश दिला आहे. भारताच्या कृषी आणि दुग्ध व्यवसाय क्षेत्र आमच्यासाठी खुले करा, या अमेरिकेच्या मागणीवर दोन्ही देशांमधील व्यापार करार अडकला आहे.

अमेरिकेला मका, सोयाबीन, सफरचंद, बदाम आणि इथेनॉलवरील शुल्कात कपात हवी आहे. त्याचप्रमाणे दुग्धजन्य पदार्थांचे प्रमाणही भारतीय बाजारपेठेत वाढवायचे आहे. मात्र, याचा फटका थेट शेतकऱ्यांना बसणार असल्याने भारताचा या मागणीला विरोध आहे.

शेतकरी हिताला आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. भारत आपले शेतकरी, पशूपालक आणि मासेमार बंधू-भगिनींच्या हितांसोबत कधीच तडजोड करणार नाही, असे मोदी म्हणाले. भारताच्या हरित क्रांतीचे शिल्पकार आणि दिवंगत कृषीशास्त्रज्ञ एम. एस. स्वामीनाथन् यांच्या जयंतीनिमित्त आयोजित जागतिक परिषदेला ते संबोधित करीत होते.

रशियातून होणाऱ्या तेल खरेदीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी अमेरिकेने भारतावरील दबाव वाढवत मोठ्या प्रमाणात व्यापारी शुल्क लादले आहे. या कार्यक्रमात नरेंद्र मोदी यांनी स्वामीनाथन् यांच्या सन्मानार्थ एक नाणे आणि टपाल तिकीट जारी केले. भारतीय शेतीसाठीचे दृष्टिकोन मांडताना मोदी यांनी पोषण सुरक्षा, पीक विविधीकरण आणि हवामान-प्रतिरोधक पीक जातींचा विकास तसेच तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण सुनिश्चित करण्याच्या गरजेवर भर दिला. (वृत्तसंस्था)

### उष्णता-प्रतिरोधक, पूर-अनुकूल पिके विकसित करा

कृषी प्रणालींमध्ये एआय आणि मशीन लर्निंगच्या एकात्मिकतेला प्रोत्साहन देतानाच पावसाची ओढ सहन करणारी, उष्णता-प्रतिरोधक आणि पूर-अनुकूल पिके विकसित करा, असे आवाहन मोदी यांनी केला. पीक उत्पादनाचा अंदाज घेण्यासाठी, कीटकांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि शेती पद्धतींचे मार्गदर्शन करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात निर्णय घेण्यास मदत करणारी यंत्रणा विकसित करा, असे आवाहनही त्यांनी केले.

### किंमत मोजण्यास मी तयार...

शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी मी वैयक्तिकरीत्या मोठी किंमत चुकवण्यास तयार आहे, असे मोदी यांनी स्पष्ट केले. वैयक्तिक पातळीवर मला फार मोठी किंमत चुकवावी लागणार असल्याचे मला माहीत आहे. मात्र, मी यासाठी तयार आहे. शेतकरी, मासेमार, दुग्ध व्यावसायिकांसाठी भारत किंमत चुकवण्यासाठी तयार आहे, असे त्यांनी ठणकावून सांगितले.

# यंदा कापसाला ८,१०० रुपये भाव

## सीसीआयकडून शेतकऱ्यांना दिलासा

**◆ नागपूर, ७ ऑगस्ट**

जिल्ह्यात यंदा सुमारे पाच लाख हेक्टरवर खरीप पिकांची लागवड झाली आहे. असे असले तरी पांढरे सोने असलेल्या कापूस लागवडीत दीड लाख हेक्टरची घट झाली आहे. दुसरीकडे आर्थिक स्थैर्य देणाऱ्या मका, सोयाबीनची निवड शेतकऱ्यांनी केली आहे. गेल्या वर्षीपर्यंत कापसाला व्यापाऱ्यांसह 'सीसीआय'ने कमी दर दिला होता. यंदा 'सीसीआय'कडून कापसाला प्रतिक्विंटल आठ हजार शंभर रुपये भाव दिला जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

'सीसीआय'कडून गतवर्षी कापसाला साडेसात हजार रुपये दिला गेला होता. अतिगरजवंत शेतकरी व्यापाऱ्यांना कापूस मोजून लागलीच पैसे घेऊन मोकळे होतात, हा आजवरचा अनुभव आहे. व्यापाऱ्यांनी कापसाची प्रतवारी पाहून गतवर्षी सात हजार ते सात हजार दोनशेपर्यंत भाव दिला होता. भाव वाढेल, या आशेने शेतकऱ्यांनी कापूस घरात ठेवला. शेवटी मिळेल त्या भावात व्यापाऱ्यांना विकावा लागला. कारण 'सीसीआय'ने हंगाम संपण्यापूर्वीच कापूस खरेदी केंद्रे बंद केली होती. (तभा वृत्तसेवा)

### व्यापारी किती भाव देणार?

**यंदाच्या हंगामासाठी प्रतिक्विंटल ८ हजार १०० रुपयांचा भाव जाहीर झाला आहे. व्यापाऱ्यांनी कापसाला सात ते सात हजार तीनशेवर भाव दिलेला नाही. त्यामुळे 'सीसीआय'च्या तोडीने ८,१०० भाव व्यापारी कापसाला देतील का, हा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.**

### खरेदी केंद्रे लवकर सुरू करावी

ऑक्टोबरमध्ये नवीन कापूस बाजारात येतो. सर्वप्रथम काही व्यापारी कापूस जादा दराने खरेदी करतात. त्यामुळे कापसाच्या भावाविषयी शेतकऱ्यांच्या आकांक्षा वाढतात. मात्र नंतर व्यापारी कमी भावाने कापूस घेतात. यात शेतकरी नाडले जातात. असे होऊ नये, अशी शेतकरी अपेक्षा करीत आहेत. 'सीसीआय'ने हंगाम सुरू होताच खरेदी केंद्रे सुरू केली तरच शेतकरी कापूस 'सीसीआय'कडे देतील. 'सीसीआय'ने आतापासूनच खरेदी केंद्रे सुरू करण्यासाठी हालचाली सुरू करणे अपेक्षित आहे.



**सोलापूर : तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त तरुण भारतचे कार्यकारी संचालक दिलीप पेठे यांना शुभेच्छा देताना पुण्याच्या जनता सहकारी बॅंकेचे सीईओ जगदीश कश्यप, सरव्यवस्थापक श्रीधर मस्के, विभागीय व्यवस्थापक निलेश पंडीत व सोलापूर शाखेचे व्यवस्थापक सुजीत फडके.**

## न्या. वर्मा यांची याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळली

**नवी दिल्ली :** प्रक्रियेचे काटेकोरपणे पालन झाले, असे निरीक्षण नोंदवताना सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी अलाहबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांची याचिका फेटाळली. घरात सापडलेल्या रोकड प्रकरणाच्या अंतर्गत चौकशीत दोषी आढळलेला अहवाल फेटाळून लावण्याची मागणी त्यांनी याचिकेत केली होती. न्या. यशवंत वर्मा यांच्या वर्तनात आत्मविश्वास निर्माण करीत नाही आणि त्यांची याचिका स्वीकारली जाऊ नये, असे न्या. दीपांकर दत्ता आणि न्या. ए. जी. मसिह यांनी स्पष्ट केले. मार्चमध्ये न्या. वर्मा यांच्या निवासस्थानाला आग लागल्यानंतर मोठ्या प्रमाणात जळलेली रोकड त्यांच्या स्टोअररूममध्ये आढळली होती. तेव्हापासून वादाच्या केंद्रस्थानी असलेल्या न्या. वर्मा यांना हा मोठा धक्का आहे.

## विधानसभा निवडणुकीत गैरप्रकार : राहुल गांधी

**नवी दिल्ली :** मतदार यादीत मोठ्या प्रमाणात गैरप्रकार करुन भाजपला फायदा पोहोचवला जात असल्याचा आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गुरुवारी केला आहे.

निवडणूक आयोग आणि भाजपात हातमिळवणी झाली असल्याचा आरोपही त्यांनी केला. इंदिरा भवन या काँग्रेस मुख्यालयात आयोजित पत्रपरिषदेत गांधी यांनी निवडणूक आयोगावर जोरदार हल्ला चढवला. व्होटचोरी या शीर्षकाखाली कर्नाटकातील महादेवपुरा विधानसभा मतदारसंघातील मतदार यादीतील घोटाळ्याचा कागदोपत्री पुरावा देत गांधी म्हणाले की, माझ्या चमूने या मतदारसंघातील मतदारयादीचा सविस्तर अभ्यास केल्यानंतर मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याचे उजेडात आले. पाच पध्दतीने निवडणुकीत गैरप्रकार करण्यात आले, असा आरोप करत गांधी म्हणाले की, बोगस मतदारांची नोंदणी हा पहिला प्रकार होता, चुकीचा आणि अस्तित्वात नसलेल्या घराचा पत्ता दर्शवणे, एकाच घराच्या पत्त्यावर अनेक लोकांची नावे, फोटो, फॉर्म सहा दुरुपयोग या पध्दतीने मतदार यादीत घुसवण्यात आली.




सोलापूर तरुण भारत
४१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

।। जनसेवा हिच ईशसेवा ।।

MUNCIPAL COUNCIL DUDHANI
दुधनी नगरपरिषद, दुधनी
जिल्हा - सोलापूर

Email id - codudhani2012@gmail.com
दुरध्वनी क्र.- ०२१८१ २५६४२४

जा.क्र. : दुनप/बावि/५९३/२०२५
दिनांक : ०७/०८/२०२५

जाहीर आवाहन

स्वच्छ भारत मिशन (शहरी) व माझी वसुंधरा अभियान ६.० अभियान अंतर्गत, दुधनी नगरपरिषद हद्दीमधील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते कि, आपल्या घरामध्ये निर्माण होणारा कचरा हा ओला व सुका असा वेगवेगळा जमा करूनच घंटागाडीकडे देण्यात यावा, कोठेही रस्त्याच्या बाजूला किंवा अडगळीच्या ठिकाणी कचरा टाकू नये, रस्त्याच्या बाजूला टाकलेल्या कचऱ्यामुळे दुर्गंधी होऊन रोगराई पसरू शकते. असा कचरा रस्त्याच्या बाजूला टाकताना निदर्शनास आल्यास दुधनी नगरपरिषद मार्फत त्या नागरिकावर कायदेशीर कारवाई व ५००/- इतका दंडात्मक कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
**आपली दुधनी स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे.**

लक्ष्मीकांत कहार
(मुख्यधिकारी)
दुधनी नगरपरिषद दुधनी

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...



### श्री सिद्धेश्वर कॉलेज ऑफ फिजिओथेरपीचा लॉन टेनिस संघटनेच्या वतीने सन्मान

**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

येथे झालेल्या महिलांच्य व प्रोढांच्या आंतरराष्ट्रीय लॉन टेनिस स्पर्धेच्या वेळी श्री सिद्धेश्वर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी सोलापूर यांच्याकडून खेळाडूंसाठी फिजिओची विनामूल्य सेवा उपलब्ध करून दिल्याबद्दल सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेच्या वतीने सन्मान करण्यात आले. कॉलेजचे प्राध्यापक डॉ. टी. सुरेश कुमार यांना मानद सचिव राजीव देसाई यांनी स्मृती चिन्ह देऊन कृतज्ञता व्यक्त केली. या प्रसंगी आंतरराष्ट्रीय टेनिसपटू संध्याराणी बंडगर, डॉ. श्वेतांबरी चव्हाण, डॉ. अंजली कुलकर्णी, डॉ. हर्षदा चव्हाण, डॉ. मधुरा शहा, डॉ. यशवंती टिप्पानी, डॉ. अरुंधती भोसले, डॉ. चिंतामणी देशपांडे उपस्थित होते.



### काँग्रेसच्या प्रशिक्षण शिबिरात ८० जिल्हाध्यक्ष व ब्लॉक अध्यक्ष सहभागी

**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या दोन दिवसीय प्रशिक्षणात ८० जिल्हाध्यक्ष व ब्लॉक अध्यक्ष सहभागी झाले. पहिल्या दिवशी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी परिकल्पनेतील भारत विषयावर, माजी खासदार कुमार केतकर व संभाजी भगत यांनी सांस्कृतिक राजकारण या विषयावर, आशुतोष शिर्के यांनी नव्या सुरुवातीची मानसिकता या विषयावर मार्गदर्शन केले. निमिश्व संदीप यांनी संगम व अन्य उपक्रमाची माहिती दिली. प्रदेश सेक्रेटरी मोहन जोशी यांनी शिबिराचे नियोजन केले. आज दुपारी माजीमंत्री अमित देशमुख यांनी भेट दिली. दुसऱ्या दिवशी सकाळी सात ते नऊ या वेळेत श्रमदान होणार आहे. महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्नीथला शिबिरास भेट देणार असून प्रा. दीपक पवार भाषेचे राजकारण, शामसुंदर महाराज संत साहित्यातील संविधान मूल्ये, तुषार गांधी सांप्रदायिकता या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याची माहिती काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी दिली. या शिबिरात अक्कलकोटचे नूतन तालुकाध्यक्ष मल्लिकार्जुन पाटीलही सहभागी झाले आहेत.

# माढ्यात एसटी बस व स्कार्पिओचा भीषण अपघात; एकाचा मृत्यू, १५ जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि.७ ऑगस्ट-**

गुरुवार दिनांक ७ ऑगस्ट रोजी सकाळी नऊच्या सुमारास भरधाव येणाऱ्या स्कार्पियो व एसटी बसचा अपघात होऊन बसमधील जवळपास १५ प्रवासी जखमी झाले असून स्कार्पियो मधील एकाचा मृत्यू झाला आहे. जखमींना रुग्णालयात दाखल केले असून त्यांच्यावर उपचार करण्यात येत आहेत.

यासंदर्भातील सविस्तर वृत्त असे की माढा कुर्डुवाडी रस्त्यावरील पेट्रोल पंपाजवळील जुना माढा - कुर्डूवाडी रस्त्यामोरील वळणावर सकाळी सव्वानऊच्या सुमारास हा अपघात घडला. या अपघातात स्कॉर्पिओ गाडीतील संजय छगन हुबाले (वय ५०, रा. उपळाई बुद्रुक) यांचा मृत्यू झाला असून यशवंत संतोष बेडगे (वय २२, रा. उपळाई बुद्रुक) हे गंभीर जखमी झाले आहेत. अधिक माहिती अशी की वैरागहून बोरीवलीकडे जाणारी एसटी बस (क्र. एम.एच. १४ बी.टी. ४३७४) कुर्डुवाडीच्या दिशेने निघाली होती. त्याचवेळी समोरून, कुर्डुवाडीहून माढ्याच्या दिशेने एक स्कॉर्पिओ गाडी (क्र. एम.एच. ४५ ए.यु. ७२९६) भरधाव वेगाने येत असताना वळणावर स्कॉर्पिओ चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि स्कॉर्पिओ समोरून येणाऱ्या एसटी बसवर आदळली. धडक इतकी जोरदार होती की स्कॉर्पिओ गाडीचा समोरील भाग पूर्णपणे चक्काचूर झाला आहे. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने धाव घेत जखमींना मदत केली. स्कॉर्पिओमधील संजय हुबाले आणि यशवंत बेडगे यांना तातडीने माढ्यातील खाजगी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच संजय हुबाले यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.



या अपघातात एसटी बसमधील १४ प्रवाशांनाही दुखापत झाली असून त्यापैकी तिघांना जबर मार लागला आहे. सर्व जखमींना माढ्याच्या ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. शिवाजी मनोहर सुतार (वय ७५, रा. सुर्डी, ता. बार्शी),विद्या वैजनाथ राऊत (वय ४२ रा. माढा) काशीबाई अर्जुन भड (वय ६५, रा. गौडगाव, ता. बार्शी,) सारिका सिद्धेश्वर मोहिते (वय ३५, रा. इर्ले वाडी, ता. बार्शी), सिंधु पांडुरंग केसरे(वय ६०, रा. इर्ले, ता. बार्शी), पार्वती दादाराव भोसले (वय ७७, रा. काटी, ता. तुळजापूर), स्वाती मारुती खर्चे (वय ३२, रा. माढा), दत्तात्रय उद्धव व्यवहारे (वय ४५, रा. माढा), उषा देविदास चव्हाण (वय ३५, रा. फुरसुंगी, पुणे), नवनाथ भिकाजी कापसे (वय ७६, रा. कापसेवाडी), लहू ज्ञानदेव लोंढे (वय ७७, रा. उपळाई बुद्रुक), जनाबाई लहू लोंढे (वय ७०, रा. उपळाई बुद्रुक), भीमराव सोनवणे (वय ६७, रा. देवळाली, ता. मोहोळ) वैशाली योगेश पवार (वय ३३, रा. कापसेवाडी) व महादेव विश्वनाथ माळी (वय ३०, रा. सुर्डी), अशी एसटी बसमधील जखमी प्रवाशांची नावे आहेत. या अपघाताची तक्रार एसटी बसचे चालक विलास गवळी यांनी माढा पोलिसात दिली आहे.अपघातस्थळी आगारप्रमुख रत्नाकर लाड यांनी भेट देऊन बसमधील इतर प्रवाशांच्या प्रवासाची सोय करत जखमींची विचारपूस केली.

## रेल्वेच्या भुयारी मार्गाचे काम जलद गतीने करणार

### ग्राहक पंचायत व रेल्वे अधिकाऱ्यांची समक्ष चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.७ ऑगस्ट -**

तहसील कार्यालयाकडे जाणाऱ्या भुयारी मार्गाचे काम जलद गतीने करुन एक मार्ग चार दिवसांत वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल असे आश्वासन रेल्वे अधिकाऱ्यांनी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या शिष्टमंडळास दिल्याची माहिती जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

तहसील कार्यालयाकडे जाणाऱ्या भुयारी रेल्वे मार्गाचे काँक्रिटिकरण करण्यासाठी सदर मार्ग २० दिवस बंद ठेवण्यात येणार असल्याचे रेल्वे विभागाने पंढरपूरचे तहसीलदार, नगरपालिका मुख्याधिकारी, शहर पोलीस स्टेशन इ.विभागांना कळविण्यात आले. त्याप्रमाणे संबंधित यंत्रणांनी त्या मार्गावर दैनंदिन नागरिकांचा संपर्क असलेली महत्त्वाची शासकीय कार्यालये, हॉस्पिटल,



शैक्षणिक संस्था इ. असल्याने पालक,विद्यार्थी, नागरिक यांची सातत्याने वर्दळ असते. ही बाब लक्षात घेऊन रेल्वे विभागास एकेरी वाहतूक सुरू ठेवुन काम करावे असे लेखी कळविणे आवश्यक होते परंतु कोणत्याही शासकीय यंत्रणेने जनतेच्या अडचणीबाबत विचार केला नाही.

रेल्वे विभागास पत्रव्यवहार केला नाही. संपर्क केला नाही, त्यामुळे रेल्वे विभागाने संपूर्ण मार्ग बंद करून काम सुरू केले. रेल्वे विभागाने प्रसिद्धीस दिलेल्या माहितीनुसार अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने सोलापूर व पंढरपूर रेल्वे विभागाशी फोनवरून संपर्क केला तसेच पत्राद्वारे विद्यार्थी, पालक, नागरिक, भाविक यांची अडचण गांभीर्याने मांडली, पर्यायी मार्ग किती लांबचा आहे त्यांच्या निदर्शनास आणून दिले, त्याचबरोबर रेल्वे अधिकाऱ्यांशी संपर्क केला व कामाच्या ठिकाणी समक्ष चर्चा केली. त्यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून हे काम जलद गतीने करून एक मार्ग चार दिवसांत पादचारी, दुचाकी, तीन चाकी अशा छोट्या वाहनांसाठी खुला करण्यात येईल असे आश्वासन दिले.

त्यामुळे रविवारी किमान छोटी वाहने, पादचारी यांना तेथून ये जा करता येईल.या समक्ष चर्चेत रेल्वेचे सहा.अभियंता अंकित सिंग, सहकारी महादेव भणगे, गिरी, ग्राहक पंचायतीतर्फे सोलापूर विभाग रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य विनोद भरते, प्रांत सहसचिव दीपक इरकल, जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास, जिल्हा सचिव सुहास निकते, सदस्य रामदास गव्हाणे, विभाकर पंचवाडकर सहभागी झाले होते.

## आंध्र भद्रावती माध्यमिक विद्यालयात वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ ऑगस्ट-**

श्री आंध्र भद्रावती माध्यमिक विद्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम डॉ. सचिन खांडेकर, मातापालक सदस्य, पालक सदस्य, संस्थेचे सचिव व्यंकटेश दुडम, मुख्याध्यापक मुख्याध्यापक श्री मोरडे, शिक्षक व शिक्षिका यांच्या वतीने १२ वृक्षांचे रोपण करण्यात आले. वृक्षारोपण करण्यासाठी वृक्ष व त्याचे संगोपन करण्यासाठी जाळी याचा खर्च स्वतः डॉ. सचिन खांडेकर यांनी केला.

तसेच डॉ. यशवंत पेटकर यांचेही सहकार्य लाभले. संत विनाबा भावे यांच्या ऊक्ती प्रमाणे दान ही भारतीय मनाला सुचलेली सहज कल्पनाआहे. पर्यावरण रक्षणासाठी वृक्षारोपण करणे व त्याचे संगोपन करणे काळाची गरज समजून डॉ. खांडेकर या पर्यावरण प्रेमी डॉक्टरांनी प्रदुषण मुक्त मोहिमेस आपला हातभार लावला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सिध्देश्वर अल्ली यांचे सहकार्य लाभले. आभार दुलंगे यांनी मानले.

## 'सरपंच संवाद' ॲपचा वापर करा

### प्रभारी जिल्हाधिकारी तथा सीईओ जंगम यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

जलजीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) -२ यांसारख्या केंद्र व राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी उपक्रमांमुळे ग्रामीण भागात स्वच्छता व पिण्याच्या पाण्याचा दर्जा उंचावण्यासाठी अनेक पावले उचलली जात आहेत.



या पार्श्वभूमीवर सरपंचांच्या नेतृत्वाखाली ग्रामविकास अधिक गतिमान व परिणामकारक करण्यासाठी सरपंच संवाद मोबाईल प लाँच करण्यात आले असून, त्याचा लाभ घेण्याचे आवाहन प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी जिल्ह्यातील सर्व सरपंचांना केले आहे. दिनांक २२ एप्रिल २०२५ रोजी केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर.पाटील यांच्या हस्ते केंद्र शासनाच्या जलशक्ती मंत्रालयामार्फत स्वच्छ व सुजल ग्रामसाठी नेतृत्व या कार्यक्रमात 'सरपंच संवाद' मोबाईल पचे लोकार्पण करण्यात आले. या उपक्रमामध्ये क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया या संस्थेच्या सहकार्याने हे विकसित करण्यात आले असून, याचा उद्देश ग्रामपंचायतीच्या कारभारात पारदर्शकता, संवाद आणि नविन उपक्रमांची देवाणघेवाण वाढविणे हा आहे. या पच्या माध्यमातून सरपंच आपल्या गावातील उत्तम कामकाज शेअर करू शकतात, देशभरातील इतर गावांतील यशोगाथा पाहू शकतात, विविध विषयांवरील प्रशिक्षण घेऊ शकतात, बातम्यांची माहिती मिळवू शकतात व ऑनलाईन प्रमाणपत्र मिळवू शकतात. हे प स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) आणि जल जीवन मिशन या दोन्ही अभियानांच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यास मदत करणारे प्रभावी डिजिटल साधन आहे.

**विकासाच्या दिशेने वाटचाल**

ग्रामीण भागात स्वच्छता व पिण्याच्या पाण्याचा दर्जा उंचावण्यासाठी जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष उपक्रम राबविले जात आहेत.त्यामुळे जिल्ह्यातील सर्व सरपंचांनी हे ॲप तत्काळ डाऊनलोड करून त्याचा नियमित व योग्य वापर करावा, जेणेकरून गाव स्वच्छ, सुजल व शाश्वत विकासाच्या दिशेने वाटचाल करू शकेल.

**- अमोल जाधव,**
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), जिल्हा परिषद, सोलापूर.

**ॲप डाऊनलोड करण्यासाठी लिंक :**

ड्राइड मोबाइल वापरकर्त्यांसाठी : https://play.google.com/store/apps/details?id=com.qci.sarpanchšsamvaad
ॲपल मोबाइल वापरकर्त्यांसाठी : https://apps.apple.com/in/app/sarpanch-samvaad/id 6452552802



## गोवंश हत्याबंदी कायद्याच्या विरोधात सोलापुरात मोर्चा

**सोलापूर, ७ ऑगस्ट-**

गोवंश हत्या बंदी कायद्यातील जाचक अटी रद्द करण्याच्या मागणीसाठी गुरुवारी पशुपालक, शेतकरी, सामाजिक कार्यकर्त्यांच्या कृती समितीने मोर्चा काढला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथून श्री सिद्धेश्वर मंदिर, पासपोर्ट कार्यालय, जिल्हा परिषद येथील पुनम गेट येथे या मोर्चाचे रूपांतर सभेत झाले. मोर्चामध्ये भारतीय राष्ट्रध्वज तिरंगा तसेच निळा, भगवा आणि पिवळा रंग असलेले झेंडे मोठ्या प्रमाणात फडकवण्यात आले. या मोर्चामध्ये सोलापूर शहरासह जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या हजारांहून अधिक नागरिकांचा सहभाग पाहायला मिळाला. सहभागी झालेले शेतकरी आणि पशुपालक यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यांनी गोवंश हत्या बंदी कायद्यातील अंमलबजावणीच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी शौकत पठाण, बबलू गायकवाड, विजय रणदिवे, सुबोध वाघमोडे, राजू कुरेशी, शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दादासाहेब भिसे यांचे निधन



**करमाळा दि.७ ऑगस्ट**

दादासाहेब काशिनाथ भिसे (वय-८५) यांचे बुधवार, दि.६ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वा निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे, परतवंडे असा परिवार आहे. दै.पुण्य नगरीचे पत्रकार बाळासाहेब भिसे यांचे ते वडील होत.

## लायन्स क्लबच्यावतीने लायन्स पंधरवडा अंतर्गत वृक्षारोपण

### नामवंत डॉक्टरांनी लावली विविध झाडे



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.७ ऑगस्ट-**

पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल टाकत लायन्स क्लब ऑफ अक्कलकोटच्या वतीने लायन्स पंधरवडा अंतर्गत एक भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात अक्कलकोटातील नामवंत डॉक्टरांच्या हस्ते विविध प्रकारचे झाडे लावण्यात आली.

या कार्यक्रमास एमजेएफ लायनेस डॉक्टर सहाराबेगम सलगरकर, डॉक्टर राहुल लिंबीतोटे, डॉक्टर श्रीमती कोटी, डॉक्टर विक्रम पडवळकर, डॉक्टर शिरत नावेद वळसंगकर , डॉक्टर आर व्ही पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती. सदरचा कार्यक्रम अत्यंत प्रेरणादायी पद्धतीने पार पडला.

उपस्थित मान्यवरांचे स्वागत व सत्कार लाइन्स क्लब ऑफ अक्कलकोटचे अध्यक्ष लायन अभय खोबरे यांनी केले. या कार्यक्रमास लायन सचिव शिरीष पंडित, खजिनदार लायन विठ्ठल तेली, लायन शदिद वळसंगकर, लायन प्रकाश उन्नद, लायन शिवपुत्र हळगोदे, लायन सलगरकर, लायन मल्लिकार्जुन मसुती आदी उपस्थित होते.

## डॉ.मोहन तंबाके देवमाणूस

**८ ऑगस्ट २०२२ साली शहराच्या पूर्व भागात गोरगरिबांना वैद्यकीय सेवेसाठी वर्षानुवर्षे पाच रुपये फी घेणारे डॉ. मोहन तंबाके आपल्यातून जाऊन ३ वर्षे झाली. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या जीवनकार्याचा आढावा...**

सोलापूर शहरात एका डॉक्टरांचे अल्पशा आजाराने निधन होते.श्रमिक आणि गोरगरिबांच्या वसाहतीत अंत्ययात्रा येते. लहान बालके, स्त्री पुरुष वयोवृद्ध मंडळीसह हजारो माणसे रस्त्याच्या दुतर्फा उभे असतात. साश्रू नयनांनी डोळ्यातील पाण्याला वाट करून देत अखेरचा निरोप देण्यासाठी उभी असताना अशातच अमर रहे, अमर रहे, डॉक्टर साहेब अमर रहे, गरिबांचा डॉक्टर, अमर रहे, कामगारांचा डॉक्टर अमर रहे,आमचा आधार, आमचा मार्गदर्शक, आमच्या कष्टाचा पैसा आणि आमचा जीव वाचवणारा आमचा देव आम्हाला सोडून गेला. अशा घोषणा अंत्ययात्रेत देत डॉक्टरांच्या पार्थिवावर जड अंतकरणाने डोके टेकवून हात जोडून शेवटचं दर्शन घेणारे आणि हे दृश्य पाहणाऱ्यांच्याही काळजाला कधी पाजर फुटला हे कळलं नाही. आपल्याला नेहमी हवाहवासा वाटणारा आपल्या हक्काचा माणूस, नव्हे ''देवमाणूस'' आपल्यातून निघून चालला आहे, हे पचवणं याप्रसंगी कोणालाही शक्य नव्हतं.



पिढ्यानपिढ्या व्यापार करणाऱ्या कुटुंबातील मोहन तंबाके यांनी शिक्षणाची कास धरली. त्यांनी प्रथम फार्मसी आणि नंतर वैद्यकीय पदवी घेतली. सन १९९३-९४ मध्ये शहराच्या पूर्व भागात वैद्यकीय सेवा देण्यास सुरुवात केली. छोट्या पत्र्याच्या शेडमध्ये अवघ्या ५ रुपये तपासणी फी आकारून दवाखाना सुरू केला. तेलुगु भाषेचा गंध नसलेल्या डॉ. तंबाके यांना भाषा समजत नसल्याने त्यांनी काही वर्षे तेलगू मराठीत सांगण्यासाठी एका दुभाषीला नियुक्त केले. अवघ्या ५ रुपयात डॉक्टर रुग्णांना बरे करतात असे कळल्यावर गरीब आणि कष्टकरी वर्ग दररोज शेकडोंनी येऊ लागले. पहिल्या ५ ते ६ वर्षात रुग्णांची भाषा कळू लागली. शारीरिक दुखापत, निमोनिया, मलेरिया, डेंगू, चिकुनगुनिया इत्यादी छोट्यामोठ्या आजारांवर उपचाराची दिशा मिळाल्यामुळे अवघ्या एका मिनिटात रुग्ण समाधानी आणि ठणठणीत होत होता. या भागातील प्रत्येक नागरिकांच्या कुटुंबातील ते सदस्यच झाले होते. दाजी गणपती, दत्त नगर, कुचन नगर,भद्रावती पेठ ,पद्मशाली चौक, फलमारी झोपडपट्टी,घरकुल एमआयडीसी,नीलम नगर,नवीन घरकुल, जुना घरकुल, स्वागत नगर, गवळी वस्ती, गांधी नगर, २५६ गाळा, घोंगडे वस्ती, भगवान नगर भवानी पेठ इत्यादी परिसरातून मोठ्या संख्येने परिवारासह उपचारासाठी येऊ लागली. तसेच या भागातील गर्भश्रीमंत, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, संस्थाचालक, चादर टॉवेल उद्योगातील उच्चभ्रू परिवारही डॉ. तंबाके यांची प्रसिद्धी आणि हातगुण पाहत विश्वासनं येऊ लागली.

तुटपुंज्या उत्पन्नावर जगणारी कुटुंबे या भागात मोठ्या संख्येने राहतात. ही समस्या डॉक्टरांनी ओळखली. अनेकांना परखडपणे सांगून रुग्णांच्या मनातील भीती दूर करीत असत. आजारपणात असलेल्या रुग्णाला इतक्या हक्काने सांगणारा डॉक्टर भेटला तर आणखी काय हवं. मात्र हा प्रवास करीत असताना पूर्व भागातील लोकांना समजावून सांगण्याचे कसब त्यांनी प्राप्त करून घेतलं होतं. या वृत्तीमुळे त्यांची नाळ पूर्व भागाशी जोडली गेली हे विशेष. रुग्णांच्या शरीरासह मनावरही उपचार करून पूर्वभागाचे आरोग्य यथायोग्य सांभाळणारे डॉक्टर म्हणजेच डॉ.मोहन तंबाके...

वर्षानुवर्षे वैद्यकीय सेवा देत डॉ. तंबाके हे कधी पूर्व भागाचं भूषण बनले हे कळलेच नाही. अनेक मोठमोठ्या संस्थांचे पुरस्कार, सन्मानचिन्हे, समाजभूषण, वैद्यकीय सेवा सन्मान पुरस्कार, कोरोना काळातील केलेल्या उपचारामुळे तत्कालीन पालकमंत्री, जिल्हाधिकारी, आमदार यांच्यावतीने अनेक सन्मान यासह एबीपी माझा या वृत्तवाहिनीने प्रत्येक जिल्ह्यातील एक डॉक्टर असे ''माझा विठ्ठल माझा डॉक्टर'' हा विशेष पुरस्कार त्यांना जाहीर केला होता. यानंतर मात्र अनेक संस्था सामाजिक संघटना त्यांना हात जोडून पुरस्कार देऊ लागले. कोणत्याही प्रकारच्या राजकारणात न पडता सर्वपक्षीय सर्वमान्य विभूषण म्हणजे ''डॉक्टर मोहन तंबाके'' अशी ख्यातीच त्यांनी मिळवली.

**कोरोना काळातील डॉ.साहेबांच्या घरातील चर्चा**

डॉ.साहेब कुटुंबवत्सल होतेच. आई,पत्नी, दोन मुली, एक मुलगा असा परिवार त्यांच्यासोबत होता. अशातच डॉ. तंबाकेंनी या भागातील सर्वांनाच विश्वास देत ''भिऊ नका मी तुमच्या सेवेसाठी कटीबद्ध आहे'' असे जाहीर केले. शहरात जनरल प्रॅक्टिशनर डॉक्टरांनी वैद्यकीय सेवा बंद केली होती. याला अपवाद डॉक्टर मोहन तंबाके. त्यावेळी घरात वहिनीसाहेब, मुली आणि मुलासह डॉक्टर तंबाके यांनी चर्चा केली. डॉ. साहेबांच्या मातोश्री यांनी पी एम रिलीफ फंड अथवा मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये सर्वसामान्य जनतेसाठी एक लाख रुपये मदत करावे असे मत मांडले. यावर डॉक्टर तंबाके यांच्या पत्नी म्हणजेच संगीता वहिनी यांनी सुचवले की, संपूर्ण लॉक डाऊन आणि कोरोना काळात एकाही पेशंट कडून एक रुपयाही घेऊ नका. शहरातील अनेक डॉक्टरांनी सध्या सेवा बंद ठेवली आहे अशावेळी रुग्णांनी कुठे जायचे? प्रत्येक आजार हा कोरोना नाही, कोणाचीही दिशाभूल होऊ नये, याची जबाबदारी आपलीही आहे असे सुचविले. डॉक्टर तंबाके यांचेही मत तंतोतंत हेच होते आणि काय रोज ३०० ते ४०० रुग्ण सकाळपासून दुपारपर्यंत येऊन रांगेत उभे राहू लागली. बघता बघता कोरोनाच्या भयंकर काळात पूर्व भागात एक डॉक्टर मोफत उपचार करत आहेत असे कळल्यावर मात्र दवाखान्यापासून रांग कधी दत्तनगर पर्यंत गेली हे कळलेच नाही. रोजच्या श्रमापेक्षा सकाळ आणि दुपारच्या सत्रात प्रचंड मेहनत त्यांना करावी लागली. वहिनीसाहेब आणि दोन्ही मुली आणि मुलाने कसलाही संकोच या काळात केला नाही. एक प्रकारची मानसिक साथ कुटुंबातील सदस्यांनी डॉक्टर साहेबांना दिली. अतिश्रमामुळे संध्याकाळी त्यांना आराम मिळावा म्हणून कुटुंबातील सदस्य सेवा करू लागली. अशातच संध्याकाळी शेकडो रुग्णे घराकडे येऊ लागली.याचे साक्षीदार आम्ही आहोतच...

आवडती बाग आणि नीटनेटकेपणा डॉक्टर साहेबांना बागेचे प्रचंड आवड होती. घराच्या पोर्चमध्ये समोरच्या जागेत दोनशे हून अधिक झाडी त्यांनी लावली आहेत. त्यांनी पहिल्या मजल्याची गच्ची तर पूर्ण हिरवळीने सजवली. पेरू, चिकू, शेवंती, गुलाब, झेंडू, संत्रा, बांबू, चाफा अशा विविध प्रकारची झाडे पाहता कोणत्यातरी बागेत आलो आहोत असे जाणवते. डॉक्टर साहेबांना स्वच्छतेची प्रचंड आवड.

जीवन हे असंख्य चित्रांचं, असंख्य आठवणींचं अशाच आकृतींचं चिंतन केल्यास आयुष्याला वळण देण्याचे काम डॉक्टर साहेबांसारखी विभूतीच करू शकतात. पाप पुण्याची शिदोरी हे डॉक्टर साहेबांना लागू पडली नाही. मी तर प्रत्यक्ष या पृथ्वीवर जाऊ शकत नाही, कुणाला मदत करू शकत नाही, मात्र माझा काम हा देवमाणूस करू लागला आहे. देवालाही ते आवडले असतीलच यात काही शंका नाही. अनेकांना मृत्यूशय्येवरून उठवून जगायला शिकवणारा डॉक्टर पाहून देवाला नक्कीच श्रम कमी करायची पाळी आली असेल. आम्ही गुण्यागोविंदाने राहत असलेलं पाहून आमचा आनंद देवालाही पहावलं नसेल. म्हणूनच त्याने आमच्या डॉक्टर साहेबांना आज्ञा दिली असेल. डॉक्टर तंबाके यांनी अवघं ५६ वर्षाच्या आपल्या जीवनात २०० वर्षाचं काम करून आमच्यासारखे हजारोंना दिशा दिली. कायम असलेलं आमच्या डोक्यावरील छत्र,पाठीवर असलेलं दैवी शक्तीचा आशीर्वाद अशा तीस वर्षाच्या प्रवासात डॉक्टर साहेब कधी आम्हा सर्वसामान्यांचा ''देवमाणूस'' झाले हे आम्हालाही कळलं नाही. काहींसाठी देवमाणूस आमच्यासाठी मात्र ते आमचा देवच....

**- सुभाष कलशेट्टी, सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# ट्रम्पविरोधात ब्रिक्स देशांची वज्रमूठ

## भारताला मिळाली रशिया-ब्राझीलची साथ ● चीनही पाठिंबा देणार



◆ **नवी दिल्ली, ७ ऑगस्ट**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतासह जगभरातील अनेक देशांवर आयात शुल्क लावले आहे. त्यांनी भारतावर अतिरिक्त २५ टक्के शुल्क लावण्याची घोषणा केली. यासह भारतावर एकूण ५० टक्के शुल्क लावण्यात आले आहे. अमेरिकेच्या दबावापुढे भारत झुकेल, असे त्यांना वाटले. मात्र, भारताने आता नवी रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. भारताने ब्रिक्स देशांचा पाठिंबा मिळवून अमेरिकेविरोधात जणू अप्रत्यक्ष आघाडीच उघडली आहे.

भारतासाठी अमेरिका एक प्रमुख बाजारपेठ आहे. मात्र, या अतिरिक्त शुल्कामुळे भारताने आता इतर पर्याय शोधण्यास सुरुवात केली आहे. टॅरिफ धोरणांमुळे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प स्वतः अडचणीत सापडल्याचे पाहायला मिळत आहे. भारतासोबतचे संबंध बिघडवल्याबद्दल त्यांच्यावर फक्त अमेरिकेतूनच नाही, इतर देशही टीका करत आहेत. अशातच, ट्रम्प यांनी भारतावर कर लावल्यानंतर भारताने चीनसोबतचे संबंध सुधारण्यास सुरुवात केली आहे. यासाठी पीएम मोदी स्वतः चीनच्या दौऱ्यावर जाणार आहेत. रशिया आधीपासूनच भारताच्या बाजूने उभा आहे, आता ब्राझीलदेखील भारताच्या बाजूने येतोय. हे चार देश एकत्र आले, तर अमेरिकेच्या वर्चस्वाला नक्कीच एक मोठा धक्का बसेल. ◂(वृत्तसंस्था)

### डोवाल यांचा मॉस्को दौरा

भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार (एनएसए) अजित डोवाल नुकतेच रशिया दौऱ्यावर गेले. डोवाल द्विपक्षीय ऊर्जा आणि संरक्षण संबंध तसेच रशियन कच्च्या तेलावरील पाश्चात्य निर्बंधांवर रशियन अधिकाऱ्यांशी चर्चा करतील. डोवाल यांचा दौरा अशा वेळी होत आहे, जेव्हा पाश्चात्य देशांनी निर्बंध लादले असले तरी, भारत सातत्याने रशियाकडून कच्चे तेल खरेदी करुन अमेरिकेच्या वर्चस्वाला आव्हान देत आहेत. ■

### ब्राझीलचे अध्यक्ष मोदींशी चर्चा करणार

ब्राझीलच्या राष्ट्राध्यक्षांनीही डोनाल्ड ट्रम्प धक्का दिला आहे. अध्यक्ष लुईझ इनासियो लुला दा सिल्वा यांनी ट्रम्प यांच्या टॅरिफवर म्हटले की, ब्राझील जागतिक व्यापार संघटनेसह (डब्ल्यूटीओ) सर्व उपलब्ध संसाधनांचा वापर करून त्यांचे हित जपेल. ते ट्रम्प यांना टॅरिफवर चर्चा करण्यासाठी बोलावणार नाहीत, कारण अमेरिकन नेते बोलू इच्छित नाहीत. परंतु ते चीनचे प्रमुख शी जिनपिंग आणि पंतप्रधान मोदींशी फोनवर चर्चा करणार आहेत. ■

# २७४ पर्यटकांना वाचविण्यात यश

## उत्तरकाशी आपत्ती : मृतकांची संख्या सात, जवानांसह ४६ नागरिक बेपत्ता



अडकलेल्या नागरिकांची सुटका केल्यानंतर हेलिकॉप्टरने त्यांना सुरक्षित स्थळी नेण्यात आले

◆ **उत्तरकाशी, ७ ऑगस्ट**

उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली गावात झालेल्या ढगफुटीत आतापर्यंत सात जणांचा मृत्यू झाला, तर भारतीय लष्कर आणि एनडीआरएफने २७४ नागरिकांना वाचविण्यात यश मिळविले. नैसर्गिक आपत्तीत लष्कराच्या जवानांसह ४६ नागरिक बेपत्ता आहे.

जिल्हा दंडाधिकारी प्रशांत आर्य यांनी गुरुवारी सांगितले की, घटनेच्या तिसऱ्या दिवशीदेखील बचावकार्य सुरू असून आतापर्यंत २७४ नागरिकांना वाचविण्यात यश आले, तर लष्कराच्या जवानांसह ४६ जण अजूनही बेपत्ता आहे. गुरुवारी मातीच्या ढिगाऱ्यातून आणखी दोन मृतदेह सापडल्यानंतर मृतांची संख्या सात झाली आहे. ढगफुटी आणि भूस्खलनामुळे विस्थापित झालेल्या दोनशेपेक्षा अधिक नागरिकांना धारली येथून माटली येथे तयार करण्यात आलेल्या शिबिरात पाठविण्यात आले. उत्तरकाशी येथे जखमींवर उपचार सुरू असून मुख्यमंत्री धामी यांनी रुग्णालयात दाखल असलेल्या नागरिकांची भेट घेतली आणि त्यांच्या प्रकृतीची माहिती घेतली. बुधवारी शंभर लोकांना तर गुरुवारी १३५ नागरिकांना ढिगाऱ्यातून सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले, त्यापैकी १०० लोकांना उत्तरकाशी येथे नेण्यात आले आहे आणि ३५ लोकांना डेहराडून येथे सुरक्षितपणे पाठवण्यात आले. ◂(वृत्तसंस्था)

### महाराष्ट्रातील १२३ पर्यटक सुरक्षित

आपत्ती व्यवस्थापन सचिवांनी सांगितले, की गंगोत्री आणि इतर भागातून २७४ लोकांना हर्षिल येथे आणण्यात आले आहे आणि सर्वजण सुरक्षित आहेत. यामध्ये गुजरातमधील १३१, महाराष्ट्रातील १२३, मध्य प्रदेशातील २१, उत्तर प्रदेशातील १२, राजस्थानातील ६, दिल्लीतील ७, आसाममधील ५, कर्नाटकातील ५, तेलंगणातील ३ आणि पंजाबमधील एका जणांचा समावेश आहे. सर्वजण पूर्णपणे सुरक्षित आहेत आणि त्यांना उत्तरकाशी, डेहराडून येथे आणले जात आहे. ■

### लष्कराचे हेलिकॉप्टर मदतीसाठी तैनात

लष्कराची दोन चिनूक हेलिकॉप्टर मदतीसाठी तैनात करण्यात आले. अडकलेल्या प्रवाशांना माटली हेलिपॅडवर सुरक्षितपणे आणले जात आहे. लष्कर, आयटीबीपी, एनडीआरएफ, एसडीआरएफ, पोलिस आणि महसूल पथके सतत शोध आणि बचाव कार्यात गुंतलेली आहेत. बीआरओचे पथक भूस्खलनामुळे बाधित झालेल्या रस्त्यांची डागडुजी आणि कोसळलेल्या पुलाचे बांधकाम करण्यासाठी युद्धपातळीवर काम करीत आहे. ■

# इक्बाल मिर्चीच्या सहकाऱ्याला अटक

◆ **मुंबई, ७ ऑगस्ट**

ईडीने जप्त केलेला चित्रपटगृहाचा भूखंड १५ कोटी रुपयांना विकण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी पोलिसांनी ड्रग्ज तस्कर इक्बाल मिर्चीच्या एका सहकाऱ्याला अटक केली आहे. आरोपी अब्दुल कादिर अली मोहम्मद (७५) याला बुधवारी दक्षिण मुंबईतील व्हीपी रोड पोलिसांनी अटक केली, असे अधिकाऱ्यांनी गुरुवारी सांगितले.

गिरगावमधील इक्बाल मिर्चीशी संबंधित असलेले न्यू रोशन टॉकीज थिएटर २०२० मध्ये अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) जप्त केले होते. अब्दुल कादिर अली मोहम्मदने चित्रपटगृह पाडून भूखंड विकण्याचा प्रयत्न केला. या संदर्भात ईडीच्या कर्मचाऱ्यांनी अलीकडेच तक्रार दाखल केली होती, असे त्यांनी सांगितले. त्यानंतर अब्दुलविरुद्ध भारतीय न्याय संहिताच्या संबंधित कलमांखाली फसवणूक, अतिक्रमण आणि गैरव्यवहाराच्या आरोपाखाली गुन्हा दाखल करण्यात आला. जप्ती असूनही, अब्दुलने गत वर्षी चित्रपटगृह पाडले व आपली मालकी असल्याचा दावा केला. त्याने मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर येथील एका व्यावसायिकाला १५ कोटी रुपयांना हा भूखंड विकण्याचा करार केला आणि काही रक्कम घेतली, असे ते म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

# रशियाकडून भारतापेक्षा दुप्पट तेल खरेदी करणाऱ्या देशांवर अत्यल्प शुल्क

### डोनाल्ड ट्रम्प यांचा दुटप्पीपणा

◆ **नवी दिल्ली, ७ ऑगस्ट**

भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्यामुळे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दंड म्हणून भारतावर २५ टक्के अतिरिक्त आयात शुल्क (टॅरिफ) लादले. आधी जाहीर केलेले २५ टक्के शुल्क लागू होण्यास १४ तास बाकी असताना, ट्रम्प यांनी हा नवा आदेश जाहीर केला आहे. मात्र, जे देश भारतापेक्षा दुप्पट तेल रशियाकडून खरेदी करतात त्यांच्यावर अत्यल्प कर लावला आहे.

दरम्यान, भारत आता जागतिक स्तरावर सर्वाधिक अमेरिकन टॅरिफचा सामना करत आहे. भारताबरोबर ब्राझीलवरही अमेरिकेने ५० टक्के आयात शुल्क लागू करत असल्याची घोषणा केली आहे. वरच्या श्रेणीतील काही देशांवर अमेरिकेने भारतापेक्षा कमी आयात शुल्क लावले आहे. स्वित्झर्लंड वर ३९ टक्के, कॅनडा व इराकवर ३५ टक्के आणि चीनवर केवळ ३० टक्के आयात शुल्क लावले आहे.

अमेरिका ही भारताची सर्वात मोठी बाजारपेठ आहे. २०२४ मध्ये अमेरिकेने भारताकडून ८७ अब्ज डॉलर्स किंमतीच्या वस्तू खरेदी केल्या. याच काळात भारताने अमेरिकेकडून ४१ अब्ज डॉलर्सच्या वस्तू आयात केल्या आहेत.

दरम्यान, भारताने अनेकदा युक्तिवाद केला आहे की पाश्चात्य देश निर्बंध व आर्थिक दंड लावताना दुजाभावाने वागत आहेत. हंगेरीसारखे युरोपियन युनियनचे सदस्य असलेले देश रशियाकडून थेट पाइपलाइद्वारे कच्चे तेल आयात करत आहेत. परंतु, त्यांच्यावर कारवाई केली जात नाही. परंतु, रशियाकडून तेल आयात केलं म्हणून भारतावर दंडात्मक कारवाई केली जात आहे. भारतावर ५० टक्के आयात शुल्क लादत असताना अमेरिकेने रशियाकडून सर्वाधिक तेल खरेदी करणाऱ्या चीनला मात्र थोडी सूट दिली आहे. कारण अमेरिका सध्या चीनकडून ३० टक्के आयात शुल्क वसूल करत आहे. चीन हा रशियन ऊर्जेचा सर्वात मोठा ग्राहक असूनही अमेरिकेने चीनकडून कुठलाही दंड आकारलेला नाही. ◂(वृत्तसंस्था)

# पंतप्रधान मोदी ठरविणार उपराष्ट्रपतिपदाचा उमेदवार

**रालोआ सांसदीय पक्षाच्या बैठकीत निर्णय**

**निवडणूक आयोगाने जारी केली अधिसूचना**

**नवी दिल्ली, ७ ऑगस्ट**

उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीतील रालोआच्या उमेदवाराचे नाव निश्चित करण्याचा अधिकार रालोआ संसदीय पक्षाच्या आज झालेल्या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील सत्तापक्ष नेते जे.पी. नड्डा यांना देण्यात आला. संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांच्या अध्यक्षतेखाली संसदभवनात आज रालोआ संसदीय पक्षाची बैठक झाली. या बैठकीत गृहमंत्री अमित शाह, राज्यसभेतील सत्तापक्षनेते जे.पी. नड्डा, जदयुचे राजीवरंजन उर्फ ललनसिंह, शिवसेनेचे डॉ. श्रीकांत शिंदे, लोजपा रामविलास पासवान गटाचे चिराग पासवान आणि तेलगू देसमचे लवू श्रीकृष्ण देवरायलू आदी नेते उपस्थित होते. उपराष्ट्रपतिपदासाठी मोदी आणि नड्डा जो उमेदवार ठरवतील, तो रालोआतील सर्व घटक पक्षांना मान्य असेल असा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. जगदीप धनकड यांनी तडकाफडकी राजीनामा दिल्यामुळे उपराष्ट्रपतिपदाची निवडणूक घ्यावी लागत आहे. निवडणूक आयोगाने आज या निवडणुकीची अधिसूचना जारी केली.



९ सप्टेंबरला ही निवडणूक होणार असून अधिसूचना जारी झाल्यामुळे आजपासून या निवडणुकीचे अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु झाली. २१ ऑगस्टपर्यंत अर्ज भरले जाणार असून २२ ऑगस्टला अर्जाची छाननी होणार आहे. २५ ऑगस्टपर्यंत अर्ज मागे घेता येतील. ९ सप्टेंबरला मतदान होणार असून त्याच दिवशी सायंकाळी मतमोजणीनंतर निकाल जाहीर केला जाईल.

# देशाला मजबूत सरकार, पंतप्रधानांची गरज : ठाकरे

**नवी दिल्ली, ७ ऑगस्ट**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प रोज आपल्या देशाची खिल्ली उडवत आहेत पण आपण त्यांना एका शब्दानेही उत्तर देत नाही, आपले परराष्ट्र धोरण पूर्णपणे अपयशी ठरले असल्याचा आरोप शिवसेना उबाठाचे नेते उध्दव बाळासाहेब ठाकरे यांनी आज केला. देशाला मजबूत सरकारची गरज असल्याचे ते म्हणाले. संजय राऊत यांच्या निवासस्थानी आज सकाळी आयोजित पत्रपरिषदेत ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्ला चढवला. एकनाथ शिंदेही सध्या दिल्लीत आले आहेत, याकडे लक्ष वेधले असता, त्याच्या आरोपावर प्रतिक्रयाव्यक्त करण्याएवढे ते मोठे नाही.

गद्दार हा गद्दारच असतो, आपल्या मालकांना भेटायला ते दिल्लीत आले असतील तर त्यावर मी काय बोलणार?, असे ठाकरे म्हणाले. राज ठाकरे यांच्या मनसेसोबतच्या युतीबाबत प्रश्न विचारले असता, यासंदर्भातील कोणताही निर्णय घ्यायला आम्ही समर्थ आहोत, आमचे आम्ही पाहून घेऊ, असे ते म्हणाले. यावेळी आदित्य ठाकरे, संजय राऊत, अनिल देसाई, प्रियांका चतुर्वेदी आणि अरविंद सावंत हे नेते उपस्थित होते.

# डोनाल्ड ट्रम्पनाही हवे बिहारचे रहिवासी प्रमाणपत्र!

## समस्तीपूरमध्ये अर्ज आल्याने प्रशासनाची धावपळ

◆ **समस्तीपूर, ७ ऑगस्ट**

बिहारच्या समस्तीपूर जिल्ह्यात डोनाल्ड ट्रम्प यांच्या नावाने रहिवासी दाखल्यासाठी आलेला ऑनलाइन अर्ज महसूल विभागाने फेटाळला आहे. यानंतर जिल्हा प्रशासनाने या संदर्भात एफआयआर नोंदवण्याचे आदेश दिले आहेत, जेणेकरून गैरप्रकार करणाऱ्या व्यक्तीला शोधून अटक करता येईल.

एका निवेदनात प्रशासनाने म्हटले आहे की, २९ जुलै रोजी डोनाल्ड ट्रम्प यांच्या नावाने रहिवासी दाखल्यासाठी अर्ज करण्यात आला होता आणि महसूल विभागाच्या संबंधित अधिकाऱ्याने ४ ऑगस्ट रोजी तो फेटाळला. अर्जात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांचा फोटो होता आणि ते जिल्ह्यातील हसनपूर गावातील रहिवासी असल्याचे नमूद करण्यात आले होते.

याचबरोबर गैरप्रकार करणाऱ्याने इंटरनेटवर संशोधन करून अर्ज केला होता. कारण पालकांची नावे फ्रेडरिक क्राइस्ट ट्रम्प आणि मेरी ॲन मॅकलिऑड अशी देण्यात आली होती, जी अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या खऱ्या वडिलांचे आणि आईचे नाव आहे.

निवडणूक आयोगाने जून महिन्यात मोठ्या प्रमाणात मतदार याद्यांचे पुनर्निरीक्षण सुरू केल्यापासून राज्यातील ही अशा प्रकारची चौथी घटना आहे. अलिकडेच पाटण्याच्या ग्रामीण भागात 'डॉग बाबू', तर नवादा येथे 'डोगेश बाबू' या नावाने अर्ज प्राप्त झाले आहेत. पूर्व चंपारण जिल्ह्यात एका भोजपुरी अभिनेत्रीचा फोटो असलेला 'सोनालिका ट्रॅक्टर' या नावाने अर्ज करण्यात आला होता. वरील सर्व प्रकरणांमध्ये अर्ज नाकारण्यात आले असून संबंधित पोलिस ठाण्यांमध्ये एफआयआर दाखल करण्यात आले आहेत.

समस्तीपूर जिल्हा प्रशासनाने असेही म्हटले आहे की, गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन, योग्य तपास आणि कारवाईसाठी समस्तीपूरच्या सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ◂(वृत्तसंस्था)

# मध्य प्रदेशात २८३ हिंदू मुली लव्ह जिहादमध्ये अडकल्या

**विधानसभेत मुख्यमंत्री यादव यांची माहिती**

**७३ अल्पवयीन मुलींचा समावेश**


**भोपाळ, ७ ऑगस्ट**

मध्य प्रदेशमध्ये २८३ हिंदू मुलींना फूस लावून त्यांचे मुस्लिम युवकांसोबत लग्न लावल्याचा प्रकार समोर आला. यात १७३ आरोपींना अटक करण्यात आले. विशेष असे की, यातील ७३ मुली अल्पवयीन होत्या. या प्रकरणात स्टुडंट इस्लामिक मूव्हमेंट ऑफ इंडिया अर्थात् सिमीसारख्या दहशतवादी संघटनांनी हिंदू मुलींना जाळ्यात अडकवण्यासाठी आरोपींना कोट्यवधींचा निधी मिळाल्याचे तपासात उघड झाल्याचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांनी विधानसभेत सांगितले. राज्य विधानसभेत भाजप आमदार आशिष गोविंद शर्मा यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या लेखी उत्तरात मुख्यमंत्री डॉ. यादव म्हणाले की, राज्यात मागील पाच वर्षांत लव्ह जिहादची अनेक प्रकरणे समोर आल्यानंतर सरकारने चौकशीसाठी विशेष तपास पथक अर्थात् एसआयटी स्थापन केली. एसआयटीने केलेल्या तपासात राज्यातील २८३ हिंदू मुली लव्ह जिहादमध्ये अडकल्याचे उघड झाले. यातील ७३ मुली अल्पवयीन होत्या. त्यांना वेगवेगळे आमिष



दाखवून अडकविण्यात आले आणि त्यांचे मुस्लिम युवकांसोबत लग्न लावण्यात आले. मालवा- निमार भागात सर्वाधिक हिंदू मुली लव्ह जिहादला बळी पडल्या. सिमीसारख्या दहशतवादी संघटनांनी आरोपींना हिंदू मुलींना अडकवण्यासाठी कोट्यवधी रुपये दिल्याचे तपासात समोर आले. त्यानंतर पीडित मुलींना मदत करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली.

# अतिरिक्त टॅरिफचा फटका कुठल्या क्षेत्रांना?





| क्षेत्र | निर्यात | भागीदारी |
|---|---|---|
| हिरे | ६.७ अब्ज डॉलर | ४४.५ टक्के |
| दागिने | ३.५ अब्ज डॉलर | १५.६ टक्के |
| कापड | ५.९ अब्ज डॉलर | १४ टक्के |
| इलेक्ट्रॉनिक्स | ७.५ अब्ज डॉलर | ६.७ टक्के |
| फार्मा | १३ अब्ज डॉलर | ५.३ टक्के |
| मशीन | २.६ अब्ज डॉलर | ३.१ टक्के |

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर अतिरिक्त २५ टक्के टॅरिफ लादण्याच्या आदेशावर सही केली आहे.यापूर्वी ट्रम्प यांनी ३० जुलै रोजी भारतावर २५ टक्के टॅरिफ लादण्याची घोषणा केली होती आणि आता अतिरिक्त २५ टक्के टॅरिफ लादण्यात आले आहे.



### आर्थिक नुकसान होण्याची शक्यता ?

डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतलेल्या या निर्णयाचा फटका टेक्सटाईल, फार्मा, ऑटो, स्टील आणि ॲल्युमिनियम, सौर उपकरणं, आयटी सर्व्हिसेस या क्षेत्रांना फटका बसू शकतो. ऑटो पार्ट्स, टेक्स्टाईल आणि इलेक्ट्रॉनिक्स सारख्या उद्योगांना टॅरिफचा फटका बसू शकतो. स्टील, केमिकल आणि फार्मा उद्योगांनाही मोठा फटका बसू शकतो, ज्यामुळे त्यांना मोठ्या नुकसानीचा सामना करावा लागू शकतो अशी चिन्हं आहेत.

### कापड व्यवसायासमोर सर्वात मोठे आव्हान

डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्णयाचा सर्वाधिक फटका कापड व्यवसायाला बसण्याची चिन्हं आहेत. भारतात अर्ध्याहून अधिक आयातीत अमेरिकेन कॉटनचा उपयोग होतो. भारतातील टेक्स्टाइल व्यवसायावर सध्याच्या घडीला १० ते १२ टक्के टॅरिफ आहे. आता ५० टक्के टॅरिफ द्यावा लागणार असल्याने भारतीय कापड व्यापाऱ्यांना मोठा दणका बसणार आहे.

### फार्मा आणि ऑटो क्षेत्रालाही फटका

फार्मा म्हणजेच औषध कंपन्यांनाही वाढलेल्या टॅरिफचा मोठा फटका बसणार हे उघड आहे. फार्मा उत्पादनांना जर टॅरिफमधून सूट मिळाली नाही तर औषधांच्या किंमतीत वाढ होणार हे सूर्यप्रकाशाइतके लख्ख सत्य आहे. तसंच या वाढलेल्या टॅरिफमुळे ऑटो सेक्टरलाही मोठा फटका बसणार आहे.

### रत्ने आणि दागिन्यांच्या किंमतीतही वाढ होणार?

रत्नं आणि दागिन्यांनाही फटका बसण्याची चिन्हे आहेत. कारण या वस्तूंवर सध्या २७ टक्के टॅरिफ आहे. त्यावर आणखी २५ टक्के अतिरिक्त टॅरिफ द्यावा लागणार आहे. त्याचा परिणाम प्रॉफिट मार्जिनवर होऊ शकतो. सौर उपकरणांच्या आणि इतर साधनांच्या किंमतींवरही परिणाम होऊ शकतो. त्याचप्रमाणे आयटी सर्व्हिसेस, एफएमसीजी, टेलिकॉम, रिअल इस्टेट, बँक इन्शुरन्स, कॅपिटल गुड्स यांच्यावरही अतिरिक्त टॅरिफचा गंभीर परिणाम होण्याची चिन्हे आहेत.

# राजस्थान, मध्य प्रदेशात भूकंपाचे धक्के

◆ **भोपाळ, ७ ऑगस्ट**

राजस्थान आणि मध्यप्रदेशात गुरुवारी सकाळी १०:०७ वाजता भूकंपाचे धक्के जाणवले. रिश्टर स्केलवर भूकंपाची तीव्रता ३.९ इतकी नोंदविण्यात आली. भूकंपाचे केंद्र राजस्थानच्या प्रतापगडमध्ये जमिनीच्या खाली १० किमी होते, अशी माहिती राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने दिली आहे. या घटनेत कोणतीही जीवित अथवा मालमत्तेची हानी झालेली नाही.

राजस्थानच्या मल्हारगड तहसील आणि पिपलियामंडीच्या आसपासच्या गावांमध्येही भूकंपाचे धक्के जाणवले, ज्यामुळे लोकांमध्ये घबराट पसरली. मध्य प्रदेशातील मंदसौर जिल्ह्यातील पिपलियामंडी आणि मल्हारगड भागातही या भूकंपाचा परिणाम दिसून आला. मंदसौरला लागून असलेल्या राजस्थानमधील प्रतापगड येथेही भूकंपाचे धक्के जाणवले. नई आबादी, सदर बाजार, अरेपाटी, वॉटर वर्क्स, बडा बाग कॉलनी, मानपूर आणि प्रतापगड शहरातील इतर भागातही भूकंपाचे धक्के जाणवले. ◂(वृत्तसंस्था)

# गरजू, पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार : बावनकुळे

**छत्रपती संभाजीनगर, दि. ७ ऑगस्ट**

राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा विषय लांबणीवर पडला नसून निवडणूक काळात भाजपाने कर्जमाफीचे आश्वासन दिले होते, ते पूर्ण करणार आणि गरजू व पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळेल, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकारांना सांगितले.

महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले, 'योग्य शेतकऱ्यांना कर्जमाफी' देण्यावर सरकार भर देत आहे. त्यासाठी एक समिती नेमण्यात आली आहे, ती शेतकऱ्यांचे सर्वेक्षण करणार असून, त्या सर्वेक्षणानंतर गरजू आणि पात्र शेतकऱ्यांनाच कर्जमाफीचा लाभ मिळेल. कर्जमाफी ही 'मेरिट'वर झाली पाहिजे. ज्यांना खऱ्या अर्थाने मदत हवी आहे, अशा शेतकऱ्यांचा विचार केला जाईल. समाजातील सर्वात शेवटच्या घटकाला मदत करणे हे सरकारचे उद्दिष्ट आहे. समितीचा अहवाल आल्यानंतर कर्जमाफीबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल. गुंठेवारीमध्ये अडकलेल्या घरमालकांना दिलासा देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे सांगत बावनकुळे म्हणाले, तुकडेबंदी कायद्यामुळे ज्या मिळकतींची नोंदणी होत नाही, अशा घरमालकांच्या समस्यांवर लक्ष दिले जात आहे. संभाजीनगर आयुक्तांना २०११ पूर्वीच्या गुंठेवारीतील बांधकामांची यादी तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जास्त आकारणी केली असल्यास ती कमी करून सर्वसामान्यांना दिलासा देण्याचा विचार असल्याचेही त्यांनी सांगितले. महसूल विभागातील अनेक जागांवर झालेली अतिक्रमणे, वर्ग-२ जमिनी वर्ग-१ मध्ये रूपांतरित करणे आणि पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमणे काढणे यांसारख्या विषयांवर काम सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# ‘ट्रम्प’ आणि ‘पिपाणी’

भारताच्या वाढत्या सामर्थ्याला शह देण्याच्या प्रयत्नांतून भारतावर निर्बंध लादण्याचे किंवा करयुद्ध थोपविण्याचे अमेरिकेचे प्रयत्न नवे नाहीत. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जारी केलेल्या भारतविरोधी करनीतीचे म्हणूनच जगाला आश्चर्य वाटलेले नाहीच; उलट ट्रम्प यांच्या अर्थनीतीच्या ज्ञानाचा पंचनामाच सर्वत्र सुरू झाला आहे. खुद्द अमेरिकेतही विदेश नीतीचे जाणकार आणि जागतिक राजनीतीच्या संकेत व सभ्यतेचा आदर करणाऱ्यांमध्ये ट्रम्प यांच्या आततायी भूमिकेवर टीका सुरू झाल्याने ट्रम्प यांचे आयात करअस्त्र अमेरिकेवरच बूमरँग होऊन आदळणार का, याची चर्चा आता सुरू झाली आहे. रशियाकडून केली जाणारी भारताची तेल खरेदी हे ट्रम्प यांचे खरे दुखणे नाही, तर कर्जाच्या बोज्याखाली पिचलेल्या अमेरिकेची अर्थव्यवस्था रुळावर आणण्यासाठी महसूल गोळा करण्याच्या हतबल मानसिकतेचे ते लक्षण आहे. अमेरिकेच्या तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीचे उद्योगपती एलन मस्क यांचा अमेरिकेच्या खर्च कपात विभागातील विशेष सरकारी कर्मचारी म्हणून मिळालेला दर्जा संपुष्टात आल्यानंतर ट्रम्प आणि मस्क यांच्यात रंगलेल्या वादाचे पडसाद जगभर उमटले होते. या पदावरून दूर होताच मस्क यांनी ट्रम्प यांच्या अर्थसंकल्पावर टीकेची झोड उठविली होती. अमेरिकेच्या उत्पन्नापैकी २५ टक्के रक्कम केवळ कर्जावरील व्याज चुकविण्यात खर्च होत आहे. ट्रम्प यांच्या आर्थिक धोरणाची वाटचाल अशीच सुरू राहिली तर अमेरिकेच्या सरकारी तिजोरीत खडखडाट झालेला असेल. शिक्षण, सामाजिक सुरक्षा, सार्वजनिक आरोग्य किंवा संरक्षणासारख्या अत्यावश्यक बाबींसाठी हाती काही राहणार नाही आणि फक्त व्याजाचे हप्ते चुकविण्यापुरतेच पैसे शिल्लक असतील, असा रोखठोक इशारा मस्क यांनी दिल्यानंतर अमेरिकेच्या आर्थिक हलाखीचे चित्र अधिकाधिक गडद होऊ लागले होते. अमेरिका हे कर्जाच्या ओझ्याखाली दबलेले राष्ट्र असून कर्जाचा हा बोजा सुमारे ३७ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचला आहे. या कर्जावरील व्याजापोटी दरवर्षी एक ट्रिलियन डॉलर्स मोजावे लागत आहेत. अमेरिकेसारखा देश दिवाळखोरीच्या कडेलोटावर उभा असल्याने जागतिक अर्थकारणास त्याच्या झळा बसणार आहेत; खुद्द अमेरिकेतही बेरोजगारीसारख्या संकटामुळे जनता भरडून निघेल, अशी भाकिते वर्तविली जात आहेत. कर्जामुळे गुंतवणुकीचा ओघ आटेल आणि आर्थिक विकास मंदावेल; सोबतच अमेरिकेतील नेतृत्वाच्या क्षमतेवरील विश्वासही संपुष्टात येणार असल्याने ट्रम्प यांच्या आततायी निर्णयांमागे प्रतिमाभंजनाचे भय हे महत्त्वाचे कारण असल्याचे उघड होऊ लागले आहे. एकूणच कर्जबाजारीपणाकडे झपाट्याने वाटचाल करणाऱ्या अर्थव्यवस्थेचा सुकाणू ज्याच्या हातात आहे, अशा ट्रम्प यांनी, जागतिक आर्थिक महासत्तांच्या रांगेतील तिसऱ्या क्रमांकाच्या दिशेने झपाट्याने वाटचाल करणाऱ्या भारताच्या अर्थव्यवस्थेस मृतावस्थेकडे चाललेली अर्थव्यवस्था म्हणणे आणि केवळ राजकीय विरोधाच्या पीतज्वराने पछाडलेल्या भारतीय विरोधी पक्षांनी ट्रम्प यांच्या सुरात आपल्या पिपाण्यांचे सूर मिसळून देशाच्या बदनामीच्या कटात सहभागी होणे यास विनोदापलीकडे अन्य कोणतेच नाव देता येणार नाही.

मस्क यांच्यासोबतचा वाद विकोपास गेल्यापासून ट्रम्प यांनी सुरू केलेल्या धोरण धडाक्यांची जगभर चर्चा सुरू आहे. भारतावर २५ टक्के आयातभार लावण्याचे व जगातील अनेक देशांवरील करवाढीचे धोरण ट्रम्प यांनी जाहीर केल्यानंतर जागतिक अर्थविश्वात खळबळ माजली असतानाच, भारताला आणखी नवा दणका देण्यासाठीच ट्रम्प यांनी बुधवारी २५ टक्के वाढीव आयात शुल्काची घोषणा केली. त्यामुळे अमेरिकेकडून भारतावर लादल्या गेलेल्या आयात शुल्काचे प्रमाण ५० टक्क्यांवर पोहोचेल व भारताकडून मोठा महसूल उकळता येईल, असा ट्रम्प यांच्या अर्थनीतीचा पाया असावा. यामुळे भारताच्या निर्यातीवर मर्यादा येऊन भारताची अर्थव्यवस्था कोलमडेल, असा त्यांचा होरा असला, तरी भारताकडून अमेरिकेत आयात केल्या जाणाऱ्या अनेक वस्तूंमुळे अमेरिकेच्या जनतेस परवडणाऱ्या दरात मिळणाऱ्या वस्तूंच्या किमती भरमसाट वाढतील हा साधा विचार करणेदेखील या आततायीपणापोटी ट्रम्प यांनी टाळले असावे. भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्याच्या मुद्द्यावरून भारताची कोंडी करण्याच्या या प्रयत्नांस दाद न देता भारताच्या हितासाठी योग्य असलेले धोरणच राबविले जाईल, असा स्पष्ट इशारा देणारा पवित्रा भारताने घेतल्याने आता ट्रम्प नीतीची अखेर कशी होणार हे पाहणे खऱ्या अर्थाने महत्त्वाचे ठरणार आहे. भारत ही जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असल्याचा निःसंदिग्ध निर्वाळा जागतिक अर्थविश्वाकडून दिला जात असताना, भारत ही मृत अर्थव्यवस्था असल्याचा हास्यास्पद दावा करणाऱ्या ट्रम्प यांच्या सुरात सूर मिसळणाऱ्या भारतातील राजकीय नेत्यांच्या हेतूवरही यामुळे प्रश्नचिन्हे उमटणार आहेत. राजकारणात कुरघोडीचा खेळ सतत सुरूच असतो. प्रतिस्पर्धी राजकीय नेत्याच्या किंवा राजकीय पक्षाच्या क्षमतेवर प्रश्नचिन्हे उमटविण्यासाठी वावड्या उठविण्याचा खेळही खेळला जातो. त्यास योग्य त्या यंत्रणेकडून वेळेनुसार चापही लावला जात असतो. भारत ही एक मृत अर्थव्यवस्था आहे, असे वक्तव्य ट्रम्प यांनी केल्यावर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीही त्याचीच री ओढली होती. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी वास्तवच उघड केले त्याचा मला आनंदच आहे. देशाचे पंतप्रधान व अर्थमंत्री वगळता सर्वांनाच हे माहीत आहे, असे सांगत त्यांनी मोदी सरकारवर नेम धरण्याचे नवे निमित्त साधले, पण काँग्रेसच्याच शशी थरूर, राजीव शुक्ला आदी अन्य काही नेत्यांच्या विवेकीपणापुढे राहुल गांधींचा हा प्रयत्न फिका पडला. पण त्याचेही गांभीर्य लक्षात न घेता, या परस्परांवरील कुरघोडीच्या ईर्ष्येपायी देशाच्या प्रगतीच्या वाटचालीवरील अडथळ्यांच्या प्रयत्नांस हातभार लावून विदेशी शक्तींना बळ देण्याचे राजकारण लज्जास्पद ठरते. विकसित भारताच्या वाटचालीच्या क्षितिजांवरच मळभ उभे करण्याचे कारस्थान सुरू असल्याची शंका येणे साहजिकच आहे. कोणा अन्य देशाच्या प्रमुखाने त्याच्या राजकीय अपरिहार्यतेपोटी व आपल्या क्षमतेचे पितळ उघडे पडू नये याचा आटापिटा करताना भारताच्या आर्थिक आणि विकासाच्या क्षमतेवर प्रश्नचिन्हे उमटवावीत आणि देशातील नेत्यांनी त्यास दुजोरा देत सुटावे, हे लज्जास्पद आहे.

ट्रम्प यांच्या भारतावरील आयात शुल्काच्या निर्णयावर अभ्यास सुरू असून देशाच्या हितापुढे अन्य कोणत्याही दबावाशी तडजोड केली जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका भारताने घेतली आहे. देशहित लक्षात घेऊन ट्रम्प यांच्या निर्णयानंतर योग्य तीच पावले उचलली जातील, अशी ग्वाही देऊन केंद्र सरकारने ट्रम्प यांच्या मृत अर्थव्यवस्थेच्या वक्तव्यास सडेतोड प्रत्युत्तरही दिले आहे. आज जगभरातील वित्तसंस्था भारताकडे एक चमकदार क्षेत्र (ब्राईट स्पॉट) म्हणून पाहात असून येत्या काही वर्षांतच भारत ही तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून उदयास आलेली असेल. तसा विश्वास भारताच्या आर्थिक वाटचालीतील पुढच्या प्रत्येक पावलासोबत उमटतो आहे. जागतिक आर्थिक विकासात भारताचे योगदान अमेरिकेहूनही अधिक असल्याचा दावा करून रिझर्व्ह बँकेनेही ट्रम्प यांच्या वक्तव्याचा संयत व सभ्य शब्दांत समाचार घेतला आहे. ट्रम्प यांच्या नव्या शुल्कवाढीच्या निर्णयानंतर आता जागतिक अर्थनीतील नवी दिशा मिळण्याची एक नवी प्रक्रिया सुरू होणार व त्या आधारावर आर्थिक सहकार्याचे मजबूत ऐक्य होण्याची नवी प्रक्रिया सुरू होणार याचे संकेत मिळू लागले आहेत. अमेरिकेच्या आर्थिक नीतीच्या परिणामांतून सावरण्याची गरज हा या प्रक्रियेचा अपरिहार्य टप्पा ठरणार आहे. केवळ आर्थिकच नव्हे, तर भू-राजकीय संदर्भही बदलणार असल्याने येत्या काही आठवड्यांत नव्या जागतिक राजनीतीची नवी समीकरणे समोर येतील तेव्हा अमेरिकेच्या अट्टहासाचे परिणाम त्या देशातही दिसू लागलेले असतील. येत्या ऑगस्टअखेरीस भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे चीनमध्ये होणाऱ्या शांघाय सहकार्य परिषदेसाठी चीनचा दौरा करणार आहेत. ट्रम्प यांच्या आयात शुल्क धोरणाच्या झळा चीनलाही बसल्या होत्या. काही काळाने ट्रम्प यांनी चीनच्या आयात शुल्कात कपात केली, पण चीनदेखील रशियाकडून तेल आयात करत असल्याने, अमेरिकेच्या डॉलरची दादागिरी कमी होत असल्याची ट्रम्प यांची खंत आहे. मुळात अमेरिका आणि रशिया यांच्यातील व्यापाराबाबत मात्र स्वतः ट्रम्प अनभिज्ञ आहेत, असे ते स्वतःच सांगतात. भारतानेच ही बाब जगासमोर उघड केल्यावर ट्रम्प यांना बचावाचा पवित्रा घ्यावा लागला, असा याचा स्पष्ट अर्थ आहे. असे असेल, तर ट्रम्प यांच्या तुताऱ्यांच्या सुरात आपल्या पिपाण्या फुंकणारे भारतातील विरोधी पक्षांचे नेते वेळ आल्यास स्वतःचा बचाव कसा करतील? ▮

## प्रासंगिक

### विजय पांढरीपांडे

# यशाची गुरुकिल्ली

आपल्याला कुणाचे बोलणे, वागणे आवडले नाही, पटले नाही की आपण रागाने ‘शट-अप’ असे म्हणतो. पण कधी आपण स्वतःच स्वतःला शट-अप म्हटले आहे का? प्रश्न विचित्र वाटेल. पण स्वतःला ताळ्यावर आणणे जास्त गरजेचे असते कधी कधी. थोडक्यात काय ते स्वतःला आरशात बघणे. एक प्रसिद्ध शेर आहे... धूळ चेहऱ्यावर होती अन् तो आरसा साफ करीत राहिला! दुसऱ्याचे कुसळ दिसते, पण आपले मुसळ दिसत नाही, अशीही म्हण आहे. प्रोफेशनल भाषेत याला ‘सेल्फ करेक्टिंग मेकॅनिझम’ म्हणता येईल.

कधी कधी सगळे जग आपल्यासाठी वाईट असते. असे वाटते सगळेच आपल्या विरोधात आहेत. आपले दोष दाखवून आपल्याला त्रास देताहेत. आपल्याला खाली बघायला भाग पाडताहेत. अशा वेळी आपला त्रागा होतो. तोल ढासळतो. मग नकळत आपले वागणे-बोलणे बदलते. अशा वेळी स्वतः स्वतःला शट-अप म्हणण्याची गरज असते. काही गोष्टी तर हळूहळू आपल्या सवयीचा भाग होऊन आपल्या आयुष्याला चिकटतात. अशा वेळी जुनी मंडळी जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही असे टोकाचे विधान करतात. खरेच इतके आपण सवयीचे गुलाम होतो का? होतो... पण निश्चय केला की, बदलणे, स्वतःच्या स्वभावाला मुरड घालणं कठीण नाही. बदल केव्हाही शक्य असतो. त्याला वयाचेदेखील बंधन नाही. फक्त इच्छाशक्ती जबरदस्त हवी.

आजकाल नात्यातले, घरातले, कुटुंबातले ताणतणाव वाढले. त्याला कारण तुटत चाललेला संवाद. म्हणजे नको तिथे बोलायचे, व्यक्त व्हायचे. सोशल मीडियावर आपले ज्ञान पाजळायचे. पण जिथे संयमाने, विवेकाने व्यक्त व्हायचे, तिथे मात्र वाद घालत बसायचे. आपल्या वागण्या-बोलण्याने घरातील वातावरण बिघडते. कामाच्या ठिकाणी तणाव निर्माण होतो. माणसे नकळत दुखावली जातात. गैरसमज निर्माण होतात, याची आपल्याला खबरबात नसते. जाणीव असली तरी पर्वा नसते. या आपल्या वागणुकीमुळे आपणच आपले नुकसान करत असतो; आयुष्य बरबाद करत असतो, हेही आपल्याला समजत नाही. दारूच्या आहारी गेलेली व्यक्ती जशी निष्क्रिय, असंवेदनशील, असंतुलित होत जाते, तसेच या अविवेकी वर्तनाने आपणही एकटे पडत जातो. कारण एक लक्षात घेतले पाहिजे की, इतरांच्या संयमालाही मर्यादा असतात. कुणी तुम्हाला किती अन् का सहन करायचे याचा विचार करा. भान ठेवा.



माझ्या आजीचे एक वाक्य मला सुभाषितासारखे आठवते. ती म्हणायची, ‘माणसाने नेहमी गोड बोलावे. गोड बोलायला पैसा खर्चावा नाही लागत.’ अगदी साधी सोपी शिकवण आहे ही. गोड बोला. कधीही कुणाला आपल्या वागण्या-बोलण्यानं दुखावू नका. आपण इतरांशी जसे वागू तसेच तेही आपल्याशी वागतील, हे लक्षात ठेवले पाहिजे. नेहमी मीच बरोबर हा अट्टाहास कामाचा नाही. दुसऱ्याच्या मताला मान द्यायला शिकले पाहिजे. आपण भलेही असहमत असू, पण विरोधासाठी विरोध ही वृत्ती नको. समंजसपणाची एक भूमिका अशी की, आधी सहमत व्हा किंवा तसा आभास निर्माण करा अन् मग आपले मत मांडा. आपली बाजू समजावून सांगा. अशा चर्चेत खेळीमेळीचे वातावरण असते. माझेच खरे या अट्टाहासाने तू तू मैं मैं असे लढाईचे समरांगण तयार होते. यातून जखमा होतात एकमेकांच्या मनाला. हे व्रण कायम राहतात. ते संबंध पूर्ववत व्हायच्या आड येतात. नवरा-बायकोचे संबंध, दोन मित्रातले संबंध, कामाच्या जागी सहकारी स्त्री-पुरुष संबंध या प्रत्येक नात्यातील गोडवा जपण्यासाठी आपण, म्हणजे प्रत्येकाने काही पथ्ये पाळणे गरजेचे आहे. आपल्याला संबंध टिकवायचे आहेत, तोडायचे नाहीत हे आपले साध्य हवे... उद्दिष्ट हवे. या आशेवरच आपले प्रत्येक पाऊल पडायला हवे. कुठेही संबंधाला तडा जातोय अशी शंका आली की, आपणच तत्काळ सावध व्हावे. एक पाऊल खुशाल मागे घ्यावे. त्याने काही बिघडत नाही. ती हार नसते. ते विजयासाठी टाकलेले दृढ पाऊल असते. बाण दूरवर जायचा असेल तर हातातील प्रत्यंचा मागे ओढावी लागते. धावण्याच्या शर्यतीत धावपटूचे एक पाऊल मागे असते. त्यामुळे आपण सुरुवातीला डिफेन्सिव्ह खेळलो तर त्यात कमीपणा नसतो. पुढच्या दृष्टीने ते फायद्याचेच ठरते.

संवादातील शांतता हा शब्दप्रयोग विचित्र वाटेल, पण न बोलताही संवाद साधला जाऊ शकतो. कवी, शायर मंडळी या मौनावर बरेच काही लिहून गेली आहेत; किंबहुना जे अनेक पानात सांगता येणार नाही ते कवितेच्या, गझलेच्या दोन ओळी सांगून जातात. बहिणाबाई सात-आठ ओळीत आयुष्याचे मोठे महत्त्वाचे तत्त्वज्ञान सांगून जाते. त्यामुळे आपण कमीत कमी बोलायला शिकले पाहिजे. दुसऱ्याचे संयमाने ऐकून घ्यायला शिकले पाहिजे. व्यक्त होताना शब्द जपून वापरले पाहिजेत. ही काळजी यासाठीही गरजेची असते. कारण आपला बोलण्याचा उद्देश कदाचित चांगलाही असेल. पण आपण वापरलेले शब्द, त्यावेळची ऐकणाऱ्याची मनःस्थिती, अवती-भवतीची त्या वेळची परिस्थिती यावरही बरेच काही अवलंबून असते. त्यामुळे दुहेरी सावधगिरी बाळगावी लागते.

कोणत्याही गैरसमजुतीचे भिजत घोंगडे ठेवण्यापेक्षा समोरासमोर बोलून असतील-नसतील ते गैरसमज संवादातून दूर करून घेणे हेही तितकेच महत्त्वाचे. चेंडू दुसऱ्याच्या कोर्टात टाकून आपण स्वस्थ बसायचे हेही धोरण चांगले नाही. खेळ सुरू राहण्यात गंमत असते अन् खेळ म्हटला की हार-जीत आलीच. तीही खेळीमेळीच्या भूमिकेतून स्वीकारली पाहिजे. नेहमी दुसराच जिंकेल असे थोडीच आहे! प्रत्येकाची वेळ येतेच कधी न कधी जिंकण्याची. अर्थात यासाठी वाट बघावी लागते. कधी कधी अपेक्षेपेक्षा जास्त संयमाची गरज असते. एक पाऊल मागे, स्वतःच स्वतःला शट-अप म्हणणे, संयम ठेवून खेळणे हेच आयुष्याच्या यशाचे गमक आहे. ▮

७६५९०८४५५५

## वेध

### रेवती जोशी-अंधारे

# कॉपी-पेस्ट... सैयारा!

चित्रपटसृष्टी भारतीयांच्या मनात राहते. मूकपट, बोलपट, लघुपट, सिंगल स्क्रिन, मल्टिप्लेक्सेस आणि आता ओटीटी अशा प्रत्येक प्रकारातील दर्जेदार कलाकृतींनी लोकांच्या मनात अढळपद प्राप्त केले आहे. भारताच्या सांस्कृतिक जीवनातील बदलांचे प्रतिबिंब सिनेमात दिसते आणि त्याउलटही घडतेच. बॉलिवूडच्या प्रेक्षकांना स्वप्न विकणाऱ्या यशराज फिल्म्सच्या ‘सैयारा’चे गारुड युवा पिढीवर चढले आहे. कोरड्या जेन झीच्या डोळ्यांत अश्रू आणणारा सैयारा हा ‘अ मूमेंट टू रिमेंबर’ या कोरियन चित्रपटाचा रिमेक असल्याची चर्चा थांबत नाहीये. दररोज वेगवेगळ्या माध्यमातून सैयाराच्या कॉपी-पेस्टची कथा नव्याने व्हायरल होतेय.

कोरोना टाळेबंदीदरम्यान हिंदी किंवा इंग्रजीमध्ये डब केलेल्या कोरियन टीव्ही मालिकांकडे भारतीय प्रेक्षकांचं लक्ष वळले. नेटफ्लिक्सची सर्वात यशस्वी मालिका ‘स्क्विड गेम’ ही कोरियनच आहे. यापूर्वी पॅरासाईट, क्रॅश लॅण्डिंग ऑन यू, इट्स ओके टू नॉट बी ओके, द क्विन्स क्लासरूम आणि ‘के-ड्रामाज’ हे चित्रपट भारतात लोकप्रिय आहेत. दुसरीकडे भारतीय सिनेसृष्टीची परंपरा जगप्रसिद्ध आहे. त्यातही प्रेमकथा आणि ती रंगविणारी युगुलगीतं, म्हणजे समस्त भारतीयांचा जिगर-कलेजा! दुःखान्त प्रेमकथा भारतीय प्रेक्षकांची दुखती नस आहे. पण, अस्सल कलाकृती बनविण्याचे भारतीय दिग्दर्शक-निर्मात्यांचे कौशल्य संपुष्टात आलेय की काय? असा प्रश्न सैयाराच्या यशानंतर निर्माण झाला आहे.

२००४ मध्ये कोरिया आणि जपानमध्ये ‘ब्लॉक बस्टर अ मोमेंट टू रिमेम्बर’ हा दक्षिण कोरियन रोमँटिक चित्रपट प्रदर्शित झाला. सैयारा हा ‘अ मोमेंट टू रिमेम्बर’चा कॉपी असल्याची चर्चा आहे. गंमत म्हणजे या चित्रपटाची कथा ‘प्युअर सोल’ नावाच्या जपानी टीव्ही मालिकेवर बेतलेली होती. २०१२ मध्ये तुर्कीमध्ये ‘इविम सेन्सिन’ नावानं या चित्रपटाचा अधिकृत रिमेकही बनवण्यात आलाय. सैयाराच्या निर्मात्यांनी कदाचित भारतीय प्रेक्षकांचा आवाका जोखला नसावा. कारण, मग त्यांनी तीन भिन्न भाषा आणि प्लॅटफॉर्म्सवर प्रदर्शित झालेल्या चित्रपटाचा हाफ रिमेक बनवून त्याला भारतीयांच्या भावनांचा तडका देण्याची चूक त्यांनी केली नसती. दोन्ही चित्रपट पाहिलेल्या काही कलंदर प्रेक्षकांनी दोन्ही चित्रपटातील सारखी दृश्ये टिपून त्यांना सोशल मीडियावर व्हायरल केली आहेत. मूळ चित्रपटावरून आम्ही प्रेरणा घेतली, असा दावाही केला जाईल.

दुःखदायक प्रेम, थरार आणि सुपरहीट गाणी म्हणजे मोहित सुरीचे चित्रपट! सुरीने २००५ मध्ये भट्ट फिल्म्सच्या ‘जहर’ या चित्रपटातून दिग्दर्शक म्हणून प्रवास सुरू केला. हा चित्रपट हॉलिवूडच्या ‘आऊट ऑफ टाईम’ (२००३) पासून प्रेरित होता. कोरियन चित्रपटांशी त्यांचं नातं २००७ मध्ये आलेल्या ‘आवारापन’ या चित्रपटापासून सुरू झालं. चित्रपटाची कथा दक्षिण कोरियन हिट चित्रपट ‘अ बिटरस्वीट लाईफ’ पासून प्रेरित होती. मोहित सुरीचा सुपरहिट ‘मर्डर २’ हा कोरियन चित्रपट ‘द चेझर’पासून तर, आशिकी-२ हा हॉलिवूड चित्रपट ‘अ स्टार इज बॉर्न’ पासून आणि ‘एक व्हिलन’मध्ये ‘आय सॉ द डेव्हिल’ या कोरियन चित्रपटाची प्रेरणा होती.

भारतीय प्रेक्षकांच्या गळी जुन्या कथा उतरवणारा मोहित सुरी पहिला आणि एकमेव नाही. बॉलिवूडवर वर्षानुवर्षे कोरियन चित्रपटांचा प्रभाव आहे. दिग्दर्शक संजय गुप्ता यांनी कोरियन क्लासिक मानल्या जाणाऱ्या ‘ओल्ड बॉय’वर आधारित संजय दत्त-जॉन अब्राहमचा ‘जिंदा’ बनवला. त्यानंतर ‘७ डेज’वर आधारित इरफान-ऐश्वर्याचा ‘जज्बा’, सलमानचे ‘राधे’ आणि ‘भारत’ हे चित्रपट ‘द आऊटलॉज’ आणि ‘ओड टू माय फादर’ हे कोरियन चित्रपटांचे रिमेक होते.

बहुतेक कोरियन चित्रपट आणि मालिका भावनांचं एक संपूर्ण जग निर्माण करतात. कोरियन टीव्ही मालिका किंवा ‘के-नाटक’ बहुतेकदा तीव्र भावना आणि मानवी नातेसंबंधांवर केंद्रित असतात. आई-मुलीचं नातं, पहिलं प्रेम किंवा प्रौढत्वातील प्रेम! भारतीय प्रेक्षक या भावनांशी सहज जुळवून घेतात. सैयाराची हाऊसफुल्लची पाटी इतर निर्मात्यांनाही या कोरियन लाटेचा फायदा घेण्याकडे आकर्षित करणार आहे. दरम्यान, दिग्दर्शक आनंद राय आणि दक्षिणेचा सुपरस्टार धनुषचा २०१३ मध्ये आलेल्या रांझणा चित्रपटाने एका नव्याच वादाला तोंड फोडले आहे. एआयचा वापर करून या चित्रपटाच्या शेवट बदलून नवा व्हिडीओ व्हायरल केला आहे. या प्रकरणी आता न्यायालयात धाव घेण्याचा कलाकारांचा विचार आहे. येणाऱ्या काळात प्रेक्षक एखाद्या चित्रपटाचा शेवट, सुरुवात किंवा मधले एखादे दृश्य अगदी त्यांना हवे तसे बदलून घेतील आणि यासाठी कोणाची परवानगी घेण्याचीही गरज उरणार नाही. एकूणच हा प्रकार आपल्या मनोरंजन क्षेत्रापुढे असलेल्या नवीन आव्हानांचा शंखनाद आहे. ▮

९८५०३३९२४०

## दखल

### मोरेश्वर बडगे

# फडणवीसांनी गेलेली हत्तीण खेचून आणली

गेली काही दिवस राज्यातले राजकारण, राजकीय बातम्या बॅकफूटवर आहेत. चर्चा आहे ती एका महादेवी नावाच्या हत्तिणीची. चर्चा आहे ती मुंबईतल्या कबुतरखान्यांची. ही हत्तीण आणि ही कबुतरं हायकोर्टाच्या एका आदेशाने अडचणीत आली. कबुतरांच्या विष्ठेमुळे आरोग्याला धोका होतो, असा विषय पुढे आल्याने हायकोर्टाने सारे कबुतरखाने बंद करायला मुंबई महापालिकेला सांगितले. हत्तिणीचा मुद्दा थोडा वेगळा आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यात नांदणी येथील जैन मठातील या हत्तिणीला गुजरातमधील ‘वनतारा’ पशुसंग्रहालयात पाठवण्यात आले. मठामध्ये तिच्या तब्येतीकडे दुर्लक्ष होते असा आरोप झाला. पुढे चाललेल्या खटलेबाजीत हायकोर्टच नव्हे, तर सर्वोच्च न्यायालयानेही तिला पुनर्वसन केंद्रात न्यायला सांगितले तेव्हा कोल्हापूर जिल्ह्यात मोठे जनआंदोलन उभे झाले. हत्तीला जैन धर्मात पवित्र श्रद्धास्थानी मानले जाते. ही हत्तीण तर वयाच्या तिसऱ्या वर्षांपासून तिथे होती. कोल्हापूरकरांना तिचा लळा लागला होता. लाडिकपणे लोक तिला ‘माधुरी’ म्हणायचे. तुम्हाला राजेश खन्नाचा तो सुपरहिट ‘हाथी मेरे साथी’ चित्रपट आठवत असेल. थोडीफार तसलीच ही स्टोरी आहे. माधुरीला परत आणा म्हणून लोकांनी पदयात्रा काढल्या, मोर्चा निघाला. एका हत्तिणीसाठी तब्बल १५ दिवस कोल्हापूर जिल्हा प्रचंड अस्वस्थ होता. जामनगरचे हे पशू कल्याण केंद्र अंबानी यांच्या मालकीचे आहे. त्यामुळे विरोधकांनाही आयता राजकीय मुद्दा मिळाला. आमचे उद्योग गुजरातला पळवता. आता हत्तीही पळवायला लागले, अशी भावना लोकांमध्ये जोर मारू लागली. धार्मिक आणि भावनिक पातळीवरून ही हत्तीण पाहता पाहता राजकारणाचा केंद्रबिंदू बनली. अस्मितेचा मुद्दा बनलेल्या या हत्तिणीवरून पश्चिम महाराष्ट्रातील राजकारण तापले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका समोर आहेत. राजकारण्यांचाही रक्तदाब वाढला असणार; पण काय करणार? सुप्रीम कोर्टाचा आदेश निघाला होता.

सर्वोच्च न्यायालयानेच सांगितले तिथे मुख्यमंत्री आणि त्यांचे सरकार काय करू शकत होते? देवेंद्र फडणवीस यांना उगाच ‘चाणक्य’ म्हणत नाहीत. नांदणीचे मठवाले त्यांच्याकडे आले तेव्हा त्यांनी आपल्या पद्धतीने हा विषय हाताळला. चमत्कार झाला. जनभावना ठाऊक असताना महादेवीला घेऊन जाणारे ‘वनतारा’वाले आता तिला परत करायला तयार झाले आहेत. नांदणीच्या मठानजीक जागतिक दर्जाचे हत्ती पुनर्वसन केंद्र उभारण्यात येईल. तेथे तिच्या तब्येतीची काळजी घेतली जाईल. राज्य सरकारच्या या प्रस्तावासाठी मदत करण्याची तयारी ‘वनतारा’ने दाखवली आहे. पण तिच्या सुटकेचा आदेश सुप्रीम कोर्टाकडून आणावा लागेल. ज्यांनी तिला नेले तेच घेऊन जातो म्हणत असतील तर कोर्टालाही अडचण असण्याचे कारण नाही. कोल्हापूरकरांचा हा मोठा विजय आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी पुढाकार घेतला नसता तर हे शक्य झाले नसते. फडणवीसांच्या जागी दुसरा कोणी असता तर सुप्रीम कोर्टाचा मामला म्हणून हात वर केले असते. फडणवीसांनी तसे केले नाही. ते स्वतः कायद्याचे पदवीधर आहेत. त्यातूनही त्यांना ही दृष्टी लाभली असावी. लोकांचा दबाव, सरकारही विरोधात अशा परिस्थितीत ‘वनतारा’च्या व्यवस्थापनाला वेगळा विचार करणे भाग पडले. त्यांनी तशी तयारी दाखवल्याने लवकरच महादेवी हत्तीण स्वगृही आलेली असेल. महादेवीचा ताबा घेण्याचा आमचा कुठलाही प्रयत्न नव्हता अशी सारवासारव आता ‘वनतारा’वाल्यांनी चालवली आहे. तसे नव्हते तर मग काय होते? देशातल्या अनेक मोठ्या मंदिरांकडे स्वतःचे हत्ती आहेत. त्यांची काळजी ते घेतात. मग ‘वनतारा’ला महादेवीचं का हवी होती हे कोडे आहे. गडचिरोली जिल्ह्यातील कमलापूर येथे हत्ती केंद्र आहे. तिथले हत्ती पळवण्याचा खूप प्रयत्न या लोकांनी केला. मात्र गावकऱ्यांनी तो हाणून पाडला. इतर अनेक राज्यातून ‘वनतारा’ने असे अनेक हत्ती आणल्याचे बोलले जाते. त्यासाठीचे त्यांचे तंत्र ठरले आहे असे बोलले जाते. सुरुवातीला ‘पेटा’ या पशू कल्याण संस्थेकडून तक्रारी येतात. नंतर उच्चस्तरीय समिती बसवली जाते. मग मामला कोर्टात जातो. महादेवीलाही अशाच पद्धतीने कोल्हापूरहून नेले गेले काय? महादेवी ही पाळीव हत्तीण आहे. ती जंगलात राहू शकत नाही, ही गोष्ट हे मठवाले ओरडून ओरडून सांगत होते. ‘वनतारा’ने त्याकडे दुर्लक्ष केले. महाराष्ट्र सरकार मध्ये पडले तेव्हा ‘वनतारा’ ती हत्तीण परत करायला कशी तयार झाली? कोल्हापूरकरांच्या मनातला संशय दूर करण्यासाठी ‘वनतारा’ला पुढे यावे लागेल.



असाच विषय कबुतरखान्यांचा आहे. एकट्या मुंबईमध्ये तब्बल ५१ कबुतरखाने आहेत. यातले काही तर १००-१५० वर्षे जुने आहेत. कुठलीही तक्रार नाही. दादरचा कबुतरखाना तर ‘हेरिटेज’ म्हणजे ऐतिहासिक वारसास्थळ म्हणून जाहीर झाला आहे. अनेक वर्षांपासून कबुतर इथे येतात. आताच्या बंदीनंतरही दाणे टाकायला येणाऱ्यांची संख्या मोठी आहे. धार्मिक भावनेतून हे सुरू आहे. ताडपत्री घालून महापालिकेने दादरचा कबुतरखाना बंद केला तेव्हा जैन समाज आक्रमक झाला. ताडपत्री फाडून लोक घुसले. कबुतरखाना बंद झाला हे लोकांना समजते. मात्र त्या कबुतरांना हे कसे सांगणार? थवेच्या थवे या भागात उडताना दिसतात. त्यांना दाणे टाकल्याने बुरशीचा संसर्ग होऊन आरोग्याला धोका पोचतो. कबुतरांच्या पिसांमुळे तसेच विष्ठेमुळे श्वासाचे आजार होतात, असा एक वैद्यकीय अहवाल पुढे आल्याने या कबुतरांवर संकट आले आहे. इतकी वर्षे काही झाले नाही मग आताच बंदी का? असा कबुतरप्रेमींचा सवाल आहे. हाही विषय फडणवीस यांच्याकडे आला आहे. ते कसा सोडवतात त्याकडे कबुतरप्रेमींचे लक्ष आहे. एरवी आपण बरे आणि आपला व्यापार बरा अशा मानसिकतेत जगणाऱ्या जैन समाजाची आक्रमकता अचंबित करणारी आहे. कबुतरखाना वाचवण्यासाठी जैन समाजाने घेतलेला आक्रमक पवित्रा हा नक्कीच चर्चेचा विषय आहे. राज्यात जैन धर्मीयांचे अनेक लहान-मोठे समुदाय आहेत. मराठीभाषी जैन समाजही मोठ्या संख्येने आहे. हा समाज प्रामुख्याने कोल्हापूर, सांगली, पुणे आणि मराठवाड्याच्या काही भागात विखुरला आहे. मुंबईमध्ये प्रामुख्याने गुजराती जैन आढळतात. व्यापार-उद्योगात पुढे असलेला जैन समाज आतापर्यंत राजकारणात कधीही आक्रमक तर सोडा, सक्रियही नव्हता. मुळात हा समाज शांत, संयमी आणि अहिंसक आहे. प्राण्यांबद्दल प्रेमभाव हा या समाजाचा मोठा स्वभावगुण म्हणावा लागेल. परंतु, अलिकडे हा समाज भूमिका घ्यायला लागला आहे. ठाणे जिल्ह्यातील मीरा-भाईंदरमध्ये मराठी बोलायला नकार दिला म्हणून एका व्यापाऱ्याला मारहाण करण्यात आली होती. त्याच्या निषेधार्थ तेथील व्यापाऱ्यांनी काढलेल्या मोर्चात जैन समाजातील व्यापाऱ्यांचा पुढाकार होता. या समाजाच्या कॉलनीमध्ये मांसाहार करणाऱ्यांना परवानगी नाकारल्याच्या तक्रारी अधूनमधून कानावर येतात. ताडदेव भागातील मासळी बाजाराविरोधात तिथल्या लोकांनी हायकोर्टात धाव घेतली आहे. जैन समाजाच्या या सक्रियतेची त्यामुळे चर्चा तर होणारच. त्यात काही वाईटही नाही. एखादा समाज चांगल्या गोष्टीसाठी आवाज उठवतो तेव्हा एकूणच समाजाचा जिवंतपणा अधिक उठून येतो. ▮

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

### राज्यातील कुपोषणाची समस्या केव्हा सुटणार?

ज्या महाराष्ट्रातील मेळघाटसारख्या स्थळांना कुपोषित जिल्हे म्हणून ओळखले जायचे तेथे आता साधनसंपत्ती भरपूर आहे. अशा राज्यातील अनेक महानगरे आणि जिल्ह्यात मध्यम व तीव्र कुपोषित बालकांची चिंता वाढली आहे. कुपोषण वाढीची कारणे तपासताना प्रथम सामाजिक विषमता, अन्न साखळीतील विस्कळीतपणा, अकार्यक्षम प्रशासन आणि लोकशिक्षणाची कमतरता हे सर्वांगीण घटक एकमेकांशी गुंतलेले स्पष्टपणे दिसून येतात. झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या लाखो कुटुंबांना ना पुरेशी आरोग्यसेवा उपलब्ध आहे ना स्वच्छ पिण्याचे पाणी, ना पोषणयुक्त अन्न. या कुटुंबांमध्ये शिक्षणाची पातळी खालावलेली असल्याने पौष्टिक आहाराची जाणीवच नसते. वाढती महागाई, बेरोजगारी आणि अनियमित उत्पन्न या सगळ्यामुळे मुलांना सकस आहार देणे आवाक्याबाहेरचे झाले आहे. शासकीय योजनांचा लाभ मिळवण्यासाठी लागणारी कागदपत्रे, आधार कार्ड, बँक खात्यांचे तपशील, यामध्ये अनेक कुटुंबे अडकून पडतात. अंगणवाड्यांमध्ये खाद्यान्न व पूरक पोषण पुरवठ्याचे वेळापत्रक विस्कळीत असते. अन्नाचा दर्जा अतिशय निकृष्ट असतो, तर कधी कधी अन्नच उपलब्ध नसते. बालकांच्या वाढीवर लक्ष ठेवणारे आरोग्यसेवक अपुरे असतात आणि जे असतात ते अपूर्ण प्रशिक्षण घेतलेले असतात. शासनाच्या पोषण अभियानांना निधी दिला जातो. परंतु त्या निधीचा वापर वेळेत व पारदर्शकपणे होत नाही. जिल्हा आणि तालुका पातळीवर निधी अडवून ठेवण्याचे, चुकीच्या लाभार्थींची नोंद करण्याचे प्रकार खुलेआम आढळतात. याद्वारे खऱ्या गरजूंपर्यंत पोषण योजना पोहोचत नाहीत. आदिवासी आणि दुर्गम भागात ही स्थिती अधिकच भीषण असते. येथील लोकांना शासनाच्या योजनांची माहिती नसते, ते फार वेळा सरकारच्या यंत्रणांपासून दूरच राहतात. आरोग्य तपासणी शिबिरे दुर्गम भागात पोहोचत नाहीत, त्यामुळे बालकांचे कुपोषण ओळखलेच जात नाही. उपासमारीच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या या समाजघटकांना केवळ शासकीय योजनांनी नाही, तर सामूहिक प्रयत्नांची पोषण देण्याची आवश्यकता आहे. बालकांचा शारीरिक, बौद्धिक, भावनिक विकास थांबतो. ती मुले आजारांना बळी पडतात. त्यामुळे कुपोषण ही केवळ आरोग्याची नाही तर विकासाची आणि आर्थिक प्रगतीची गंभीर समस्या आहे. राज्य शासनाने यावर दीर्घकालीन उपाययोजना प्रभावशाली प्रामाणिकपणे राबविण्याची गरज आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

## वाचक पत्रे

### स्वच्छतेसाठी पुढे या...

नागपुरात सोनेगावच्या हरिकृष्ण मंदिर परिसरात हल्ली सकाळी फिरायला जाणाऱ्यांची संख्या बरीच वाढली आहे. प्रवेशद्वाराच्या बाहेर फूड स्टॉल्स पण सज्ज असतात. ज्येष्ठ नागरिक समूहाचे वाढदिवस येथे साजरे केले जातात. तेथे डॉ. अभिषेक सांबरे व ग्रुपसोबत जाण्याचा योग आला. मात्र, तेथे पसरलेल्या कचऱ्यावरून लक्षात आले की, तेथे दारू पार्ट्या पण होत असाव्यात. इथे कचरापेटीची सोय कुठेच दिसली नाही. यासाठी मनपाला सल्ले देण्याऐवजी मी सामूहिक पातळीवर शक्य असलेले उपाय सुचवू इच्छिते. मनपा या ठिकाणी शिल्लक तिकीट ठेवून आवश्यक सोयी त्यातून उपलब्ध करू शकते. उदा. प्रवेशद्वारावर सीसीटीव्ही कॅमेरे लावून त्याद्वारे नागरिकांनी सोबत नेलेले डिस्पोजेबल किंवा प्लॅस्टिक मटेरियलची नोंदणी करणे, परिसराच्या आत ठरावीक अंतरावर कचरा पेटीची व्यवस्था करून प्रत्येकाला त्याचा वापर करायला भाग पाडणे.

**सुनीता मंजिरी इनामदार**/नागपूर

### स्वावलंबी, दीनदयालनगरात दूषित पाणी

स्वावलंबी आणि दीनदयाल नगरात गेल्या अनेक दिवसांपासून नागरिकांना घाणेरडे दुर्गंधियुक्त आणि आरोग्यास हानिकारक पाणीपुरवठा केला जात आहे. या गंभीर समस्येकडे महानगरपालिका प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. अशी बातमी दिनांक ६ ऑगस्टच्या तरुण भारतात वाचण्यात आली. सध्या पावसाळा सुरू आहे. पावसाळ्यामध्ये मनपाने केलेल्या घरांच्या सर्वेक्षणांत शहरातील ७९८६ घरांमध्ये डास अळ्या आढळून आल्या, असे मनपाचेच वृत्त आहे. सध्या पावसाळा सुरू असल्यामुळे डासांमुळे उद्भवणारे डेंग्यू, मलेरिया व चिकुनगुनिया यासारखा आजारांचा धोका वाढण्याची शक्यता आहे. यामुळे शहरात मनपाकडून प्रभावी उपाययोजनेची गरज आहे. स्वावलंबी व दीनदयाल नगरात अनेक दिवसांपासून नळांमधून दुर्गंधियुक्त गढूळ आणि वापरण्यास योग्य नसलेले पाणी येत असून नागरिक त्रस्त झाले आहेत. नागरिक सोशल मीडियावर सातत्याने तक्रारी करत आहे. शुद्ध पाणी मिळत नसल्यामुळे आणि रोगराईचे दिवस असल्यामुळे डॉक्टरच्या सांगण्याप्रमाणे अनेक जण वॉटर कॅन विकत घेऊन पिण्याच्या पाण्याची सोय करीत आहेत. सबब, मनपाकडून या समस्येचे त्वरित निराकरण होणे आवश्यक आहे. ▮

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## सीए सुनील माहेश्वरी यांचा सर्वोत्तम अध्यक्ष म्हणून गौरव

**जालना दि. ७ ऑगस्ट-**
रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ चा वार्षिक पुरस्कार समारंभ दि. ३ ऑगस्ट रोजी जालना येथे पार पडला. या सोहळ्यात रोटे. सीए सुनील माहेश्वरी, अध्यक्ष रोटरी क्लब ऑफ सोलापूर (२०२४-२५) यांना सर्वोत्तम अध्यक्ष हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

डिस्ट्रिक्ट ३१३२ अंतर्गत महाराष्ट्रातील ११ जिल्ह्यांतील १०२ क्लब्सपैकी ही निवड करण्यात आली. या कार्यक्रमात रोटरी क्लब ऑफ सोलापूरला विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कामगिरीसाठी तीन अंतरराष्ट्रीय नामांकनासह ३१ पुरस्कार प्रदान करण्यात आले.

# शासन निधीतून अग्निशमन दल सक्षमीकरणाची गरज

### तोकड्या गाड्या, मनुष्यबळावर चालतो कारभार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**
सोलापूर शहराची लोकसंख्या आणि भौगोलिक विस्तार पाहता महापालिका अग्निशमन दलाच्या सक्षमीकरणाची गरज आहे. महापालिकेची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता शासनाकडून या दलासाठी भरीव निधीची तरतूद अपेक्षित आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

सोलापूर शहरात आगीच्या घटना अधूनमधून घडत असतात. आगीच्या लहान घटनांवर अग्निशमन दलाकडून नियंत्रण मिळवणे शक्य होते, मात्र आगीच्या मोठ्या घटना घडल्यास मात्र आग विझवणे व मदत कार्यात अनेक अडचणी येतात. तोकड्या गाड्या, उपकरणे , साधने, मनुष्यबळावर या दलाचा कारभार गत अनेक वर्षांपासून सुरू आहे. शहराची लोकसंख्या तसेच शहराचा विस्तार लक्षात घेता या दलाच्या सक्षमीकरणाची गरज आहे.

बहुमजली इमारतींना आग लागल्यास तिथे बाहेरून आग विझवण्यासाठी लागणारी हायड्रोलिक लायडर, हायड्रोलिक प्लॅटफॉर्मसारखी यंत्रणा महापालिका अग्निशमन दलाकडे नाही. सोलापुरात अलीकडे बहुमजली इमारतींचे प्रमाण वाढले आहे. हे लक्षात घेता अत्याधुनिक व सुसज्ज यंत्रणा अग्निशमन दलाकडे असणे आवश्यक आहे.अक्कलकोट रोड एमआयडीसीमध्ये १८ मे २०२५ रोजी सेंट्रल इंडस्ट्रीज या यंत्रमाग कारखान्याला भीषण आग लागून आठ जणांचा दुर्दैवी झाला होता. या घटनेच्या निमित्ताने अग्निशमन दल विभागाच्या मर्यादा अधोरेखित झाल्या होत्या. एकंदरीत अशा घटना भविष्यात घडू नये यासाठी आवश्यक प्रभावी यंत्रणा अग्निशमन दलाकडे असणे नितांत गरजेचे आहे. यासाठी लोकप्रतिनिधींनी गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. शासनाकडून भरीव निधी मिळाल्यास अग्निशमन दलाचे सक्षमीकरण शक्य आहे, अन्यथा अशा दुर्घटनांमध्ये मालमत्ता तसेच जीवितहानी मोठ्या प्रमाणात होऊ शकते.



### अशी आहे सध्याची यंत्रणा

महापालिकेच्या अग्निशमन दलाकडे सध्या एकूण १० गाड्या असून त्यामध्ये एक मिनी फायर फायटर वाहन, एक रेस्क्यू व्हॅन , दोन फोम टेंडर फायर फायटर गाड्या , पाच वॉटर टेंडर यांचा समावेश आहे.सोलापूर शहरात रविवार पेठ, भवानी पेठ, सावरकर मैदान, होटगी रोड व अक्कलकोट रोड एमआयडीसी अशा एकूण ५ ठिकाणी अग्निशामक केंद्रे आहेत. सोलापूर शहराच्या सुमारे १३ लाख लोकसंख्येच्या अनुषंगाने ही अग्निशमन यंत्रणा तोकडी आहे.

### 'डीपीसी'कडे चार कोटींचा प्रस्ताव

महापालिका अग्निशमन दल विभागाला शहराच्या तुलनेत लागणाऱ्या गाड्या तसेच उपकरणांसाठी सुमारे चार कोटींचा निधी लागणार आहे. या संदर्भातील प्रस्ताव महापालिका प्रशासनाकडून जिल्हा नियोजन मंडळाकडे पाठवण्यात आला आहे, अशी माहिती महापालिका अग्निशन दल विभागाकडून देण्यात आली. सध्या शहरात पाच अग्निशमन केंद्रे असून शहराच्या तुलनेत ही संख्या १० इतकी असणे गरजेचे आहे. याबाबत महापालिका प्रशासनाने आवश्यक कार्यवाही करण्याची गरज आहे.



## जातीवाचक शिवागीळ, मारहाण करणाऱ्या आरोपींवर अ‍ॅट्रॉसिटी दाखल करा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**
पुण्यातील कोथरूड येथे महिलेला मदत केल्याच्या कारणावरून तीन दलीत सामाजिक कार्यकर्त्या महिलांना त्यांच्या घरी जाऊन अवैधरित्या ताब्यात घेऊन जातीवाचक शिवीगाळ आणि अश्लील भाषा वापरून मारहाण करणाऱ्या आरोपी पोलिसांवर अ‍ॅट्रॉसिटी कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा या मागणीसाठी भीमसंघर्ष तरुण मंडळाचे संस्थापक सोलापूर शहर काँग्रेसचे उपाध्यक्ष संजय गायकवाड यांच्या शिष्टमंडळाने प्रभारी जिल्हाधिकारी कुलदीप जंगम यांना निवेदन दिले.

या प्रकरणी पीडित महिला दि.०१ ऑगस्ट २०२५ पासून संबंधित पोलिसांवर अ‍ॅट्रॉसिटी कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी सातत्याने करत आहेत. परंतु अद्यापही संबंधित पोलिसांवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

आरोपी पोलिसांवर तात्काळ अ‍ॅट्रॉसिटी कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा. जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत आम्ही गप्प बसणार नाही असा इशाराही यावेळी देण्यात आला. यावेळी महिला अध्यक्ष प्रमिला तूपलवंडे, सागर उबाळे, सुभाष वाघमारे, ज्योती गायकवाड, अंकुश बनसोडे, राहुल वाघमारे, राहुल गायकवाड, करण कांबळे, सिद्धार्थ गायकवाड, राहुल जाधव, व्यंकटेश बोमेन, मधुकर गाजूल आदी उपस्थित होते.



## खून खटल्यात निर्दोष आरोपीने पोलीस अधिकाऱ्यांविरुध्द केलेला खटला फेटाळला

**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**
खुनाच्या आरोपावरुन अटक झालेल्या आरोपीने निर्दोष सुटल्यानंतर खटल्याचा तपास करणाऱ्या पोलीस अधिकारी व फिर्यादी विरुध्द न्यायदंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात खटला दाखल केला होता. अटकेमुळे व खटल्यामुळे झालेली बदनामी , नावलौकिकाचे झालेले नुकसान याबद्दल तपास करणारे पोलीस अधिकारी व पोलीस ठाण्यात फिर्यादी दिलेल्या संबंधित आरोपीला (फिर्यादीस) इंडियन पिनल कोड १८२ (एखाद्या सरकारी व्यक्तीला खोटी माहिती देणे जेणेकरून दुसऱ्याला इजा पोहोचावी २११ म्हणजे खोटा खटला करणे जेणेकरून दुसऱ्याला त्रास व्हावा ४२७ म्हणजे दुस-याच्या मालमत्तेचे नुकसान करणे ४९९, ५०० म्हणजे दुस-याची बदनामी करणे या आरोपाखाली शिक्षा व्हावी म्हणून न्यायदंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात खटला दाखल केला होता. हा खटला न्यायदंडाधिकाऱ्यांनी फेटाळला होता. न्यायदंडाधिकाऱ्यांच्या निकालाविरुध्द आरोपीनी सत्र न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावर याचिकेची सुनावणी जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज शर्मा यांचेसमोर होऊन त्यांनी निर्दोष सुटलेल्या आरोपीची याचिका फेटाळून लावून न्यायदंडाधिकाऱ्यांच्या निकालावर शिक्कामोर्तब केले.

खून खटल्यातील निकालपत्रात न्यायालयाने निर्दोष सोडलेल्या आरोपीला खोटेपणाने गुंतवले आहे असे नमुद केलेले नाही. आरोपीस सत्र न्यायालयाने संशयाचा फायदा देऊन निर्दोष सोडले आहे. त्यामुळे आरोपीस खोटेपणाने गुंतवले आहे असे म्हणता येणार नाही, असा युक्तिवाद तपास करणारे पोलीस अधिकारी व खून खटल्यातील मूळ फिर्यादीतर्फे न्यायालयात करण्यात आला. या प्रकरणी पोलीस अधिकारी व खुन खटल्यातील मूळ फिर्यादीतर्फे अ‍ॅड. धनंजय माने, अ‍ॅड. जयदीप माने, अ‍ॅड. प्रणित जाधव यांनी काम पाहिले. निर्दोष सुटलेल्या आरोपीने तपास करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांविरुध्द व फिर्यादीविरुध्द न्यायालयात फौजदारी खटला दाखल करण्याची ही पहिलीच घटना.

## कास्ट्राईब कर्मचारी महासंघाची बैठक

**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**
कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, जिल्हा शाखा सोलापूर संघटनेची बैठक जिल्हाधिकारी यांचे सोबत आयोजित करण्यात आली होती.

बैठकीच्या सुरुवातीला जिल्हाध्यक्ष मनिष सुरवसे यांनी प्रस्तावना करून नुकतेच हजर झालेले निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांचा सत्कार करुन बैठकीस सुरुवात करण्यात आली. या बैठकीमध्ये महसूल कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नावर चर्चा करुन सरळ सेवा भरती मधील मागासवर्गीयांचा अनुशेष तात्काळ भरण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याचे आश्वासन दिले. यावेळी कास्ट्राईब कर्मचारी महासंघ राज्य कार्याध्यक्ष गणेश मडावी यांच्याबरोबरच महासंघाचे जिल्हा सचिव अरविंद जेटीथोर, संघटक लक्ष्मण गायकवाड, कोषाध्यक्ष विजयकुमार लोंढे, जिल्हा परिषद शाखेचे अध्यक्ष अरुण क्षिरसागर, सिव्हिल शाखेचे सचिन सोनवणे, पाटबंधारे शाखेचे शरण अहिवळे, शिक्षक संघटनेचे अध्यक्ष सिध्दार्थ जाधव, दिव्यांग शाखेचे अध्यक्ष मच्छिंद्र अंगुले, महसूल शाखेचे प्रशांत सुरे, विजयकुमार इंजेवाड आदी पदाधिकारी उपस्थित होते.


### टीसी हरवली आहे

**रोहन शाहीर गायकवाड**
मु.पो. तामलवाडी, ता. तुळजापूर, जि. धाराशिव यांची एलसी (दाखला) सोलापूर-तुळजापूर प्रवास करताना हरवली आहे. कोणास सापडली असेल तर कृपया खालील नंबरवर संपर्क करावा.
**मो.नं. ७०८३२०४३८१.**



### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम जनतेस विशेषतः सोलापूर शहर व जिल्ह्यातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन** :- डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी मौजे डोणगाव येथील शेतजमीन गट नं. १२२/१/अ/१ यासी क्षेत्र १ हे. ४० आर पैकी अरूण शिवप्पा आमले यांच्या मालकीची असलेली शेतजमिन यासी क्षेत्र ० हे. ७० आर यासी आकार ० रु. ७२ पैसे शेतजमीन आतील तदंगभूत वस्तुसह व वहिवाटीच्या सर्व हक्कासह.

वर वर्णन केलेली शेतजमीन ही अरुण शिवप्पा आमले यांच्या मालकीची असून, ती त्यांनी आमचे अशिल यांना खरेदीखताने विक्री करण्याचे ठरविलेले आहे. सबब, वर नमूद खरेदी व्यवहार करण्याबाबत कोणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार असल्यास अगर इतर कुठल्याही प्रकारचा हक्क व अधिकार कोणत्याही दस्ताच्या आधारे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द होताच ५ दिवसांच्या आत खालील वकिलाच्या नमूद पत्यावर लेखी हरकत नोंदवावी मुदतीत कोणाचीही न आल्यास आमचे अशिल हे वर नमूद शेतजमीनीबाबत लवकरच व्यवहार पुर्ण करतील मग त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार मुळीच तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली आहे. ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली तारीख ०१/०८/२०२५

**सही/-**
**श्री. नंदकुमार व्ही. दुरगुडे**
**ॲडव्होकेट बी.ए., एलएल.बी.**
**रा.नं. ९७, उत्तर कसबा, पत्रा तालीम,**
**सोलापूर-४१३००७ मो.नं. ९९२२३६७५३६**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**


### 'खालिद का शिवाजी' चित्रपट वादाच्या भोवऱ्यात

**मुंबई :** 'खालिद का शिवाजी' शिवाजी वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. चित्रपटातील काही संवादांवरून अनेक हिंदुत्ववादी संघटनांकडून या चित्रपटाचा तीव्र विरोध केला जात आहे. चित्रपटाला वाढता विरोध पाहता, सिनेचे दिग्दर्शक आणि निमर्ति यांनी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्यांनी एक पत्रक जाहीर करून वादग्रस्त संवाद काढून टाकण्याची प्रक्रिया सुरू केल्याचे स्पष्ट केले आहे. सिनेच्या आशयामुळे कोणाच्या भावना दुखावाव्यात, असा आमचा हेतू नव्हता. त्यामुळे संबंधित दृश्ये आणि संवाद पुन्हा एकदा तपासले जात असून, आक्षेपार्ह भाग हटवला जाणार आहे,


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**वार्षिक देखभाल करार निविदा सूचना क्रमांक**
**GEM/2025/B/651521,**
**दिनांक : 06/08/2025.**
भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने डीआरएम(एम) चे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून सीलबंद निविदा मागवत आहे. कामाचे नाव आणि परिसर : सोलापूर विभागातील आयओएच शेड सोलापूर येथे ईओटी क्रेनच्या व्यापक वार्षिक देखभाल कराराचे कंत्राट काम जीईएमद्वारे तीन वर्षांच्या कालावधीसाठी. निविदा प्रणाली: सिंगल पॅकेट सिस्टम. कामाची अंदाजे किंमत: रु. 7,55,804.16. निविदा फॉर्मची किंमत : शून्य. निविदा फॉर्म जिथून खरेदी करता येईल त्या कार्यालयाचा पत्ता : डीआरएम(एम) चे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर. जमा करावयाची बयाणा रक्कम: रु. 15,177/-. काम पूर्ण करण्याचा कालावधी: काम सुरू झाल्यापासून तीन वर्षे. निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ: 30/08/2025 सकाळी 9:00 वाजता. निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: 30/08/2025 सकाळी 9:30 वाजता. वेबसाइट तपशील आणि सूचना फलक निविदेची संपूर्ण माहिती जिथे पाहता येईल ते ठिकाण: www.GeM.gov.in
**वरिष्ठ डीएमई / सोलापूर**
**मध्य रेल्वे**
AK/Sur-62
धोकादायक आणि स्फोटक वस्तूंसह प्रवास करणे हा दंडनीय गुन्हा आहे.



**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना**
**निविदा सूचना क्रमांक**
**SUR/L/T/2024/28R3.**
भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, जनरल, मध्य रेल्वे, सोलापूर, रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-टेंडर आमंत्रित करत आहेत. कामाचे नाव: सोलापूर विभागाच्या छतावरील डिझाइनच्या एलएचबी प्रकारच्या एसी कोचवर बसवलेल्या विविध मेकच्या एसी पॅकेज युनिटचा दोन वर्षांच्या कालावधीसाठी वार्षिक देखभाल करार. (पुनर्निमंत्रण). अंदाजे किंमत : 2,17,65,593.69. बयाणा रक्कम : 2,58,800/-. पूर्ण कालावधी : 24 महिने. ऑफरची वैधता : 90 दिवस. वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ: 30/08/2025 दुपारी 14:00 वाजता. बोली सुरक्षा खर्च www.ireps.gov.in वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे भरावा लागेल.
**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (जी)**
**सीआर, सोलापूर**
Akar/Sur-61
धोकादायक आणि स्फोटक वस्तूंसह प्रवास करणे हा दंडनीय गुन्हा आहे.


# सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स: एकात्मिक शिक्षणदृष्टीकोनातून २१व्या शतकातील उद्योजकांचे घडवणार प्रेरणास्थान

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन अंतर्गत ७ फेब्रुवारी १९९९ रोजी स्थापन झालेल्या सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स, पुणे ही संस्था यंदा अभिमानाने २७ वर्षांचा यशस्वी शैक्षणिक प्रवास साजरा करत आहे. गेल्या दोन दशकांहून अधिक काळात गुणवत्ता, नवकल्पना आणि सामाजिक बांधिलकीची प्रतीक बनली आहे, जी विद्यार्थ्यांना २१व्या शतकातील गरजांसाठी सक्षम बनवते.

विद्यार्थ्यांचे करिअर समृद्ध करणे, समग्र, बौद्धिक आणि शाश्वत विकासासाठी जीवन वाढवणे' हे संस्थेचे ब्रीदवाक्य, मूल्याधिष्ठित, व्यावसायिक आणि समग्र शिक्षणाच्या साक्ष आहे. संस्कार, संस्कृतीची जोपासना करीत डिजिटली व प्रॅक्टिकली विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा हेच सूर्यदत्तचे उद्दिष्ट आहे. भारतीय शिक्षण क्षेत्रात यशस्वीरीत्या आमूलाग्र बदल घडवून आणणाऱ्या व्यक्तींपैकी प्रो. डॉ. संजय चोरडियांचे नाव अग्रणी आहे.

### शाळेपासून पदव्युत्तर शिक्षणापर्यंतचा व्यापक विस्तार

■ सूर्यदत्त अंतर्गत ३० हून अधिक संस्थांचा समावेश असून यामध्ये शाळा, महाविद्यालये, प्रशिक्षण केंद्रे आणि व्यावसायिक शिक्षण संस्थांचा समावेश आहे. ही संपूर्ण साखळी 'KG ते PG' आणि त्याहीपलीकडे शिक्षण देते. यापैकी सुमारे २० संस्थांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (SPPU), महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (MUHS), कुलगुरू कवी कालिदास संस्कृत विद्यापीठ (KKSU), डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नीकल युनिव्हर्सिटी (DBATU), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (YCMOU) मान्यता प्राप्त आहे. तसेच CBSE, MSBTE, MSBSVET इत्यादींचा समावेश होतो. याशिवाय, AICTE, PCI, BCI, विविध स्किल डेव्हलपमेंट कौन्सिल्सच्याकडूनही मान्यता प्राप्त आहे.

### भविष्यासाठी सक्षम शिक्षण केंद्र

■ सूर्यदत्त मध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स, ब्लॉकचेन, फिनटेक, टेक्नॉलॉजी, सायबरसुरक्षा, एव्हिएशन इ. क्षेत्रातील कौशल्याधारित आणि तंत्रज्ञानसंपन्न अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. ८० हून अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सामंजस्य करार, तसेच सिंगापूरमधील AI साठीचे Centre of Excellence यांसोबत सामंजस्य करार आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरचा अभ्यास आणि नोकरी संधी उपलब्ध होतात. दुबई, सिंगापूर, मलेशिया, यूके, यूएस, कॅनडा, ऑस्ट्रेलिया यांसारख्या देशांतील पर्यायी अभ्यास सहली विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन देतात.




■ **स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व व्यक्तिमत्त्व विकास :** सूर्यदत्तमधून UPSC, MPSC, NEET, MBBS, NDA, न्यायसेवा इ. स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन दिले जाते. याशिवाय फ्रेंच, जर्मन यांसारख्या परदेशी भाषा, सॉफ्ट स्किल्स व व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षण दिले जाते.

■ **नवीन राष्ट्रीय शैक्षणिक NEP धोरणाचे चार स्तंभ प्रवेश, समता, गुणवत्ता आणि जबाबदारी;** हे तत्त्वज्ञान सूर्यदत्त संस्थेच्या स्थापनेपासूनच त्याच्या कार्यामध्ये प्रतिबिंबित झाले आहे. सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी कसेही असो, प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा संस्थेचा कटाक्ष आहे.

■ **सामाजिक बांधिलकीतून नेतृत्व :** सूर्यदत्त Edu-Socio Connect द्वारे सामाजिक बांधिलकीचे उपक्रम राबविले जाते. दिवंगत रतनबाई आणि बन्सीलालजी चोरडिया यांच्या प्रेरणेतून शेतकऱ्यांसाठी, दिव्यांग, सार्वजनिक कर्मचारी, लष्कर अधिकारी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, निष्ठावान कर्मचाऱ्यांसाठी मोफत कौशल्य शिक्षण व प्रशिक्षणही दिले जाते.

■ **विविध विक्रम, पुरस्कार व मान्यतांमधून सन्मान :** ८० हून अधिक स्वयंसेवी संस्थांद्वारे जनजागृती, करिअर मार्गदर्शन व समाजोन्नती कार्यक्रम राबवले जातात. सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार कार्यक्रमात पं. भीमसेन जोशी, डॉ. बीकेएस अय्यंगार यांच्यासारख्या महान व्यक्तींना गौरवण्यात आले आहे. सूर्यदत्त ने ७००० किलो महा मिसळ, २४ तासांचे शांत वाचन ( रीडाथॉन ), योग व हास्य उपचार अशा अनोख्या उपक्रमांतून 12 + वर्ल्ड रेकॉर्ड्स नोंदवले आहेत.

■ **स्टार्टअप उभारणीत पुढाकार :** संस्थेमार्फत इनोव्हेशन आणि इनक्युबेशन सेंटरची निर्मिती करण्यात आली असून, विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीस बळ मिळण्यासाठी संस्थेच्या वतीने प्रयोगशाळा स्थापण्यात आल्या आहेत.

■ **विश्वासार्ह प्लेसमेंट मधील सातत्य :** उमेदवारांच्या शाश्वत वाढीसाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्य विकासावर भर देणारी ही c विद्यार्थ्यांना आघाडीच्या राष्ट्रीय -आंतरराष्ट्रीय क्षेत्रात करिअरचे पर्याय उपलब्ध करून देते.



**प्रो. डॉ. संजय बी. चोरडिया**
संस्थापक अध्यक्ष : सूर्यदत्त एजुकेशन फाऊंडेशन

### तंत्रज्ञानाची प्रगती अनुभवत 'सूर्यदत्त' कायमच आघाडीवर

तंत्रज्ञानाची प्रगती आपण अनुभवत आहोत . 'एआय'च्या क्रांतीने सर्व क्षेत्रांचा चेहरामोहराच बदलला आहे. या पार्श्वभूमीवर शैक्षणिक संस्थांनाही हे नवे बदल स्वीकारून, त्यांच्या उपयुक्ततेनुसार स्वतःच्या ढाच्यात बदल करावा लागतो. याबाबतीत 'सूर्यदत्त' कायमच आघाडीवर असते.

### वैशिष्ट्ये

- डिजीटल इन्फ्रास्ट्रक्चर
- ए आय इनोव्हेशन इन्क्युबेशन अ‍ॅन्ड स्टार्टअप इनेबल्ड कॅम्पस
- इंटर - मल्टीडिसीप्लनरी एनएलपी कम्प्लाइड कॅम्पस
- आधुनिक शिक्षण साधनांसह प्रत्येक वर्ग खोली
- संगणक/ इंटरनेट रूम
- मोबाईल लॅब / अ‍ॅड लॅब
- रिसर्च सेंटर
- सेमिनार हॉल, कॉन्फरन्स हॉल, ऑडिटोरियम, ॲम्पीथिएटर
- इनडोअर-आऊटडोअर गेम्स, जिम, योगा अँड् मेडिटेशन हॉल, कॅफेटेरिया



ग्लोबल कॉन्क्लेव्ह ऑन चॅलेंजेस'ला प्रख्यात उद्योगपती टोनीनो लँबोर्गिनी यांची उपस्थिती




सुर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स, पुणे आणि नॅशनल फार्मसी वेल्फेअर असोसिएशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित फार्मसी क्षेत्रातील उत्कृष्टता, ऐतिहासिक फार्मोत्सव २०२५ पुरस्कार समारंभ.


# अक्कलकोट नगरपरिषद, अक्कलकोट

**सन २०२५-२६ करिता वार्षिक फेर निविदा २**

**जा.क्र.२०२५/न.प.अ.कोट/अभिलेख/संकलन/कावि-७२९/** **दिनांक ०७/०८/२०२५**

| अ. न. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | बयाणा रक्कम | निविदा फार्म फी |
|---|---|---|---|---|
| ३ | नगरपरिषद कार्यालयाकडील विविध नोंदवही, पावती पुस्तके छपाई करणे | ३,००,०००/- | ५,०००/- | ५००/- |

१. कोरे निविदा फॉर्म संबंधित विभागात रोखीने फी भरून दि. ०९/०८/२०२५ ते दि. २०/०८/२०२५ रोजी नगरपरिषद कार्यालयात मिळतील.
२. बयाणा रक्कम दि. २०/०८/२०२५ रोजी पर्यंत लेखा विभागात रोखीने भरून त्याची पावती निविदा सोबत जोडणे आवश्यक आहे.
३. मोहोरबंद निविदा दि. २०/०८/२०२५ रोजी दुपारी ४.०० पर्यंत कार्यालयीन वेळेत स्वीकारल्या जातील. मोहोरबंद निविदा दोन लिफाफा पध्दतीने दाखल करणे आवश्यक आहे. एका लिफाफ्यात तांत्रिक कागदपत्रे व दुसऱ्या लिफाफ्यात भरलेले निविदा फॉर्म देणेचे आहे.
४. निविदेतील दर हे वाहतूक GST, शासनाचे सर्व कर, रॉयल्टी, भराई उतराई, पोहोच करणे ई.सर्व बाबीसह देणेचे आहे.
५. साहित्य पुरवठादाराकडे संबंधित पुरवठ्याबाबत अधिकृत डिलर, सबडिलर, स्टॉकिस्ट असल्याबाबत आवश्यक कागदपत्रे व दुकाने निरीक्षक यांचेकडील नोंदणीचा दाखला ई. निविदेसोबत सादर करावे.
६. कोणतीही निविदा कोणतेही कारण न देता स्वीकारणे अगर सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार नगरपरिषद राखून ठेवत आहे.
७. टेंडर संबंधीच्या अटी व शर्ती टेंडर फॉर्मसोबत देण्यात येतील.
८. इतर माहिती संबंधित विभागात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

स्थायी निदेश क्रं. ०४/२०२३ नुसार कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष हितसंबंध / हिस्सा नसल्याबाबतचे प्रतिज्ञा पत्र निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे.

**सही/-**
**(रमाकांत डाके)**
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
**नगरपरिषद अक्कलकोट**



## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि. अर्ज नं. ९०/२०२५
पुढील नेमलेली दि. ०९/०९/२०२५
निशाण नं. ५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु.डि. सो. यांचे कोर्टात**

१) **कु. सोहम पांडूरंग शिंदे,**
वय - १७ वर्षे, धंदा - शिक्षण,
रा. खडकोणी ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **कु. रोहन पांडूरंग शिंदे,**
वय - १५ वर्षे, धंदा - शिक्षण,
रा. सदर अर्जदार नं. १ व २ चे
अपाक आजोबा म्हणून उत्रेश्वर लक्ष्मण शिंदे,
वय - ८४ वर्षे, धंदा - शेती, रा. सदर
— **अर्जदार**

विरुध्द

**मनिषा पांडूरंग शिंदे,**
वय - ४० वर्षे, धंदा - मजूरी,
रा. खडकोणी, ता. बार्शी, जि. सोलापूर
ह.मु. द्वारा गोरख आजबे, रा. गवंडी गल्ली,
खर्डा, ता. जामखेड, जि. आहिल्यानगर
— **सामनेवाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार नं. १ व २ हे मयत पांडूरंग यांची मुले व सा. वाली हे मयत पांडूरंग उत्रेश्वर शिंदे यांची पत्नी आहे. यातील अर्जदार नं. १ व २ हे अज्ञान असून अपाक आजोबा उत्रेश्वर लक्ष्मण शिंदे हे आहेत. यातील अर्जदार नं. १ व २ यांचे वडिल व सा.वाली हिचे पती मयत पांडूरंग उत्रेश्वर शिंदे हे दि. १६/०६/२०२४ रोजी मयत झाले आहेत. मयत पांडूरंग उत्रेश्वर शिंदे यांना अर्जदार नं. १ व २ व सा.वाली हेच कायदेशीर वारस असून त्यांच्या शिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत पांडूरंग उत्रेश्वर शिंदे यांचे नावे डि सोलापूरे सब डि व ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्यु.पल हद्दीतील मिळकत सर्व्हे नं. ५३३ याचा जुना गट नं. ११७१/६ चा नविन गटनं. ११७७/६ या जमिनीमधील प्लॉट नं. ४ यांचे क्षेत्रफळ २८८.१२ चौ.मी. १९५.२९ चौ.मी. क्षेत्रफळ असा संपूर्ण खुला प्लॉट अशी मिळकत आहे. यातील पांडूरंग उत्रेश्वर शिंदे हे मयत झाल्यानंतर यातील अर्जदार हे सदर मिळकतीबाबत वारस नोंदणी करण्याकरीता तलाठी कार्यालय, बार्शी येथे गेले असता सदर अधिकारी यांनी त्यांना मयत पांडुरंग उत्रेश्वर शिंदे यांचे कायदेशीर वारस असलेबाबतचे वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. म्हणून त्यांनी सदरचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता यातील अर्जदाराचा सदरचा अर्ज आहे,

त्याअर्थी सदर अर्जदार व सा.वाली यांचे व्यतिरिक्त मयत पांडूरंग उत्रेश्वर शिंदे यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ०९/०९/२०२५ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना व सा. वाली यांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल. हे जाहिर प्रसिध्दीकरण कोर्टाचे सही व शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे दि. ३०/०७/२०२५

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय**
**क. स्तर बार्शी**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**व. स्तर बार्शी**

## महत्त्वाचे

### दुलीप करंडकात गिलकडे उत्तर विभागाचे नेतृत्व

**नवी दिल्ली :** भारतीय कसोटी संघा कर्णधार शुभमन गिलची गुरुवारी २८ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या दुलीप करंडकासाठी उत्तर विभागाच्या संघाचा कर्णधार म्हणून निवड करण्यात आली.



इंग्लंडविरुद्ध पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेत त्याने एका तरुण संघाचे नेतृत्व केले होते. रोहित शर्मा, विराट कोहली व आर. अश्विनच्या निवृत्तीनंतर कसोटी कर्णधारपदाची सूत्रे स्वीकारणारा २५ वर्षीय गिल इंग्लंड दौऱ्यातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्यांपैकी एक होता. भारताने अॅण्डरसन-तेंडुलकर चषक मालिकेत मालिकेत २-२ अशी बरोबरीत साधली. इंग्लंड दौऱ्यानंतर गिलची उत्तर विभागाच्या कर्णधारपदी नियुक्ती झाल्यामुळे तो लवकरच स्थानिक क्रिकेटमध्ये परतेल. २८ ऑगस्ट रोजी दुलीप करंडकात उत्तर विभागाचा सामना पूर्व झोनशी होईल, तर अंतिम सामना ११ सप्टेंबर रोजी होणार आहे. उत्तर विभाग संघ : शुभमन गिल (कर्णधार), अंकित कुमार (उपकर्णधार), शुभम खजुरिया, आयुष बदोनी, यश धुल, अंकित कलसी, निशांत सिंधू, साहिल लोत्रा, मयंक डागर, हरदीप सिंग, हरदीप सिंह, युवराज सिंह राणा, अंशुल कंबोज, औकिब नबी, कन्हैया वाधवन (यष्टिरक्षक).

### आशियाई सर्फिंगमध्ये भारतीय महिलांचे आव्हान संपुष्टात

**चेन्नई :** आशियाई सर्फिंग स्पर्धेच्या चौथ्या दिवशी गुरुवारी कमली मूर्ती आणि सृष्टी सेल्वमच्या बाहेर पडण्याने भारताचे ओपन महिला गटातील अभियान संपले. कमलीने ५.५७ गुण मिळवत तिसऱ्या फेरीच्या हीटमध्ये जपानच्या सुमोमो सातो (११.४७ गुण) आणि चीनच्या सिकी यांग (७ गुण) यांच्या मागे तिसरे स्थान पटकावले. तिसऱ्या फेरीच्या हीटमध्ये, सृष्टीने थायलंडच्या इसाबेल हिग्ज (१२), तैपेईच्या वान-यू चेन (५.६७) आणि फिलीपिन्सच्या निल्बी ब्लँकाडा (५) यांच्या मागे ३.०३ गुणांसह चौथे स्थान पटकावले. यापूर्वी, ओपन महिला रेपेचेज फेरीच्या दुसऱ्या फेरीने भारतासाठी आशेचा किरण दाखवला.

### नेरोका एफसी-भारतीय नौदल लढत बरोबरीत

**इम्फाळ :** १३४ व्या ड्युरंड चषक फुटबॉल स्पर्धेच्या गट एफ सामन्यात नेरोका एफसी आणि भारतीय नौदलाने गुरुवारी येथे एक-एक गुण मिळवत संघर्षपूर्ण गोलशून्य बरोबरी साधली. अनेक अर्धशतके आणि आशादायक क्षण असूनही, दोन्ही संघांना मध्यक्षेत्रातील लढाई आणि बचावात्मक संघटन यावर उच्च असलेल्या सामन्यात अंतिम स्पर्श मिळाला नाही. नेरोकाचे मुख्य प्रशिक्षक ग्यान मोयोन यांनी इम्फाळ डर्बीमधून त्यांच्या सुरुवातीच्या एकादशात तीन बदल केले, ४-२-३-१ फॉर्मेशनमध्ये बदल केला. जेटली सोरोखैबाम गोलरक्षक म्हणून आला. गोटिमायुम मुक्तासनाला मध्यक्षेत्राची भूमिका सोपवण्यात आली व ब्राझिलियन लुकास दा सिल्वा बचावात उतरला. भारतीय नौदलाच्या डेनी सिंगने सहाव्या मिनिटाला उजव्या पायाने विंगमधून केलेल्या स्ट्राइकसह पहिला प्रयत्न केला, परंतु गोलरक्षक जेटली सोरोखैबामने डावीकडे खाली डायव्ह करून आरामदायी बचाव केला.

### राष्ट्रीय कनिष्ठ महिला हॉकीत महाराष्ट्राचा विजय

**काकीनाडा :** आंध्र प्रदेशमध्ये सुरु असलेल्या कनिष्ठ महिला राष्ट्रीय हॉकी अजिंक्यपद स्पर्धेच्या विभाग अ लीग सामन्यांमध्ये गुरुवारी छत्तीसगड आणि महाराष्ट्राने आपापले सामने जिंकले, तर पंजाबने चंदीगडविरुद्ध बरोबरी साधली. महाराष्ट्राने आंध्र प्रदेशवर ५-१ असा विजय मिळवला, संजना रायकवार (२२, ५२) आणि सानिका चंद्रकांत माने (१७, ५७) यांनी प्रत्येकी दोन गोल केले.

---


**भारत अ विरुद्धच्या चार दिवसीय सामने**

# ऑस्ट्रेलिया अ संघात कोन्स्टास, मॅकस्विनी

**◆ सिडनी, ७ ऑगस्ट**

ऑस्ट्रेलियाचे सलामीवीर सॅम कोन्स्टास आणि नॅथन मॅकस्विनी यांची गुरुवारी सप्टेंबरमध्ये लखनौमध्ये होणाऱ्या बॉर्डर-गावस्कर चषक २०२६-२७ मालिकेच्या पृष्ठभूमीवर भारताला जाणाऱ्या अ संघात निवड करण्यात आली.

कोन्स्टासने गत भारत-ऑस्ट्रेलिया मालिकेत मॅकस्विनीची जागा घेतली होती, परंतु वेस्ट इंडीजवर वर्चस्व गाजवल्यानंतरही कॅरेबियनमध्ये निराशाजनक कामगिरी करूनही तो वरच्या क्रमांकावर आपले स्थान मिळवू शकला नाही.१९ वर्षीय कोन्स्टास हा अ संघात निवडलेला एकमेव सध्याचा कसोटी खेळाडू आहे, तर इतर कॅप्ड खेळाडूंमध्ये मॅकस्विनी, कूपर कॉनोली व फिरकी गोलंदाज टॉड मर्फीचा समावेश आहे.



सॅम कोन्स्टास

सात कसोटी सामन्यांमध्ये खेळलेल्या मर्फीने २०२२-२३ मध्ये भारत दौऱ्यात बॉर्डर-गावस्कर चषकाच्या चारही सामन्यांपैकी प्रत्येकी एक सामना खेळला होता, यात ऑस्ट्रेलियाने १-२ असा पराभव पत्करला होता व १४ बळी घेतले होते.

उपखंडात अनेक अद्वितीय आव्हाने आहेत. फलंदाजी व गोलंदाजीसह वेगवेगळ्या कौशल्यांचा वापर करण्याची संधी प्रदान करतो. या परिस्थितीत वारंवार अनुभव घेतल्याने खेळाडूंना भविष्यातील उपखंड दौऱ्यांसाठी त्यांच्या खेळाची प्रभावी पद्धत आणि समज विकसित करण्यास मदत होईल, असे ऑस्ट्रेलियाचे निवड समितीचे अध्यक्ष जॉर्ज बेली यांनी म्हटले आहे. ऑस्ट्रेलियन अ संघात जेसन संघा व मॅथ्यू रेनशॉलाही स्थान देण्यात आले आहे. कानपूरमध्ये होणाऱ्या तीन सामन्यांसाठी संघाला मात्र वन-डे संघात स्थान देण्यात आले आहे. दोन चार दिवसीय सामने १६ ते १९ सप्टेंबर आणि २३ ते २६ सप्टेंबर दरम्यान लखनौमध्ये खेळवले जातील, तर तीन वन-डे सामने अनुक्रमे ३० सप्टेंबर, ३ व ५ ऑक्टोबर रोजी होतील.



नॅथन मॅकस्विनी

**ऑस्ट्रेलिया अ संघ :** चार दिवसीय सामन्यासाठी- झेव्हियर बार्टलेट, कूपर कॉनोली, जॅक एडवर्ड्स, ॲरोन हार्डी, कॅम्पबेल केलावे, सॅम कोन्स्टास, नॅथन मॅकस्वीनी, लान्स मॉरिस, टॉड मर्फी, फर्गस ओनील, ऑलिव्हर पीक, जोश फिलिप, कोरी रोचीचिओली, लियाम स्कॉट.

**ऑस्ट्रेलिया अचा वन-डे संघ :** कूपर कॉनोली, हॅरी डिक्सन, जॅक एडवर्ड्स, सॅम इलियट, जेक फ्रेझर-मॅकगर्क, ॲरोन हार्डी, मॅकेन्झी हार्वे, टॉड मर्फी, तन्वीर संघा, लियाम स्कॉट, लाची शॉ, टॉम स्ट्रेकर, विल सदरलॅण्ड, कॅलम विडलर.

◀(वृत्तसंस्था)

---

# दुखापतीमुळे फलंदाजीसाठी न जाण्याचा विचारही मनात आला नव्हता : ख्रिस वोक्स

**◆ लंडन, ७ ऑगस्ट**



पाचव्या कसोटीच्या शेवटच्या दिवशी भारताविरुद्ध खांद्याच्या दुखापतीमुळे फलंदाजीसाठी न जाण्याचा विचार मी कधीही केला नव्हता, असे इंग्लंडचा अष्टपैलू खेळाडू ख्रिस वोक्स म्हणाला.

भारताने पाचवी कसोटी थोडक्यात जिंकली. शेवटच्या विकेट पडताना वोक्स डाव्या हाताला स्लिंगमध्ये स्वेटर गुंडाळून मैदानात उतरला.

सर्वांसाठी हे करणे आपले कर्तव्य आहे, परंतु तराही इंग्लंडने सामना गमावला याबद्दल मी अजूनही दुःखी आहे, असे वोक्स म्हणाला. दुखापतीमुळे तुझी कारकीर्द धोक्यात आली होती का असा प्रश्न विचारला असता त्याने हे उत्तर दिले.

दुखापत कशी आहे, याची आपल्याला कल्पना नाही, परंतु आपण केवळ स्वतःसाठी खेळत नाही, तर आपण काहीतरी मोठ्या गोष्टींचा भाग आहे, एवढेच मला ठाऊक होते, असे पुढील स्कॅनची प्रतीक्षा करणारा वोक्स म्हणाला.

संघ व सहकारी तसेच त्यांनी केलेले सर्व कष्ट व त्याग, घरच्या मैदानावर सामने पाहणारे लोक. या प्रत्येकासाठी ते करणे हे आमचे कर्तव्य आहे, असे तो म्हणाला. मला अजूनही खूप वाईट वाटते, खरोखरच निराशा वाटते, की आपण ही परीकथा समजू शकलो नाही. पण जिंकण्यासाठी १०० धावा लागल्या असत्या तरीही मी कधीही मैदानावर न जाण्याचा विचार केला नाही, असे तो म्हणाला.

उभे राहून कौतुकाने स्वागत करणे चांगले वाटले, पण त्याचा फारसा अर्थ नाही. काही भारतीय खेळाडू आदर दाखवण्यासाठी आले, पण इतर कोणताही खेळाडूही असेच करू शकला असता. नऊबळी गेले असताना तुम्ही ते थांबवू शकत नव्हता, असे तो म्हणाला.

चौथ्या दिवसापासून इंग्लंडचे सहाय्यक प्रशिक्षक मार्कस ट्रेस्कोथिक यांच्यासोबत आपण एकहाती फलंदाजीचा सराव सुरू केला होता हे वोक्सने उघड केले.पण ते खूप वेदनादायक होते, असे तो म्हणाला.

इंग्लंडच्या या वरिष्ठ खेळाडूने भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिल व उपकर्णधार ऋषभ पंतचेही कौतुक केले. पंतने दुखापतग्रस्त पायाने फलंदाजी करण्याचे धाडस दाखवले होते. दोन्ही खेळाडूंनी मालिकेत चांगली कामगिरी केली आहे, असेही तो म्हणाला.

◀(वृत्तसंस्था)

---

# ॲलेक्झांडर इव्हेरेव्हला नमवून कॅरेन खाचानोव्ह अंतिम फेरीत



**◆ टोरंटो, ७ ऑगस्ट**

रशियाच्या अकराव्या मानांकित कॅरेन खाचानोव्हने अव्वल मानांकित जर्मनीच्या ॲलेक्झांडर इव्हेरेव्हला ६-३, ४-६, ७-६ (४) असे पराभूत केले आणि नॅशनल बँक ओपन टेनिस स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला.

आजचा सामना खूपच चुरशीचा होता, हा एक अतिशय आव्हानात्मक, अतिशय मानसिक, अतिशय शारीरिक सामना होता. मला चिवट झुंज द्यावी लागली, असे खाचानोव्ह म्हणाला. अलिकडच्या काळात काही सोप्या सामन्यांमध्ये पराभव झाल्यानंतर विजय मिळवल्याबद्दल मी खूप आनंदी आहे, असेही तो म्हणाला.

एटीपी टूरमध्ये सात वेळा विजेता असलेला २९ वर्षीय खाचानोव्ह दुसऱ्या मानांकित टेलर फ्रिट्झ व चौथ्या मानांकित बेन शेल्टन यांच्यातील ऑल-अमेरिकन दुसऱ्या उपांत्य फेरीतील विजेत्याशी सामना करेल.

२०१७ चा विजेता आणि २४ टूर जेतेपदांसह इव्हेरेव्ह जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे. २०२३ चा विजेता जॅनिक सिनर व दुसऱ्या क्रमांकाचा कार्लोस अल्काराझ हार्ड-कोर्ट स्पर्धेतून बाहेर पडल्याने त्याला अव्वल मानांकन मिळाले.

◀(वृत्तसंस्था)

---

# लवलीनाचा बीएफआय पदाधिकाऱ्यावर गैरवर्तनाचा आरोप

### आयओए चौकशी समितीची लवकरच बैठक

**◆ नवी दिल्ली, ७ ऑगस्ट**

टोकियो ऑलिम्पिक कांस्य विजेती बॉक्सर लवलीना बोर्गोहेनने राष्ट्रीय मुष्टियुद्ध महासंघाचे कार्यकारी संचालक कर्नल अरुण मलिक यांच्याविरुद्ध 'अनादरपूर्ण आणि लिंगभेदपूर्ण वर्तना'चा आरोप केला आहे. या आरोपाचा तपास करण्यासाठी भारतीय ऑलिम्पिक संघटना (आयओए) चौकशी समितीची लवकरच बैठक बोलावणार आहे. आरोपांची चौकशी सुरू आहे आणि लवकरच अहवाल सादर केला जाईल, असे भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या (साई) अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय, भारतीय क्रीडा प्राधिकरणाचे (साई) महासंचालक, टीओपीएस (टार्गेट ऑलिम्पिक पोडियम स्कीम-टॉप्स) विभाग, भारतीय ऑलिम्पिक संघटना (आयओए) आणि भारतीय मुष्टियुद्ध महासंघ (बीएफआय) यांना उद्देशून केलेल्या औपचारिक तक्रारीत, लवलीनाने आरोप केला आहे की, मलिकने ८ जुलै रोजी झालेल्या झूम बैठकीत तिचा अपमान केला आणि तिच्या कामगिरीला कमी लेखले.

या कॉलवर, लोव्हलिनाने विनंती केली की आभासी बैठकीत उपस्थित असलेल्या तिच्या वैयक्तिक



प्रशिक्षकाला राष्ट्रीय शिबिरात परवानगी द्यावी तसेच प्रशिक्षकाला आपल्यासोबत युरोपमध्ये प्रशिक्षणासाठी जाण्याची परवानगी द्यावी, अशी विनंती लवलीनाने केली होती. मात्र हे बीएफआय धोरणाविरुद्ध आहे. या बैठकीत तिच्या या प्रस्तावावर कर्नल अरुण मलिक यांनी आक्रमकपणे प्रतिक्रिया दिली आणि तिच्याशी अपमानास्पद पद्धतीने बोलले. 'त्यांनी मला स्पष्टपणे सांगितले की गप्प बस, डोके खाली कर आणि आम्ही सांगतो तसे कर. त्याचे शब्द केवळ अनादरपूर्ण नव्हते, तर लिंग-भेदभाव आणि हुकूमशाही वर्चस्वाचा भयानक सूर देखील होता. विशेषतः राष्ट्राला सन्मान मिळवून देणाऱ्या महिलेला असे वर्तन भोगावे लागू नये, असे लवलीना बोर्गोहेनने आपल्या तक्रारीत म्हटले आहे. हा केवळ वैयक्तिक अपमान नव्हता, तर हा रिंगमध्ये आणि बाहेर दोन्ही ठिकाणी उंच उभे राहण्याचे स्वप्न पाहणाऱ्या प्रत्येक महिला खेळाडूवर हल्ला होता, असेही तिने तक्रारीत म्हटले आहे.

या प्रकरणाची 'निष्पक्ष आणि जलद चौकशी' करावी व 'जर ही कृती स्वीकारार्ह वर्तनाचे उल्लंघन करत असल्याचे आढळून आले तर आवश्यक शिस्तभंगाची कारवाई' करावी अशी मागणी तिने केली.

तथापि, मलिकने स्पष्टपणे या आरोपांना नकार दिला आहे. लवलीनाच्या विनंतीचा विचार करण्यात आला व आदरपूर्वक त्या नाकारण्यात आल्या, कारण त्या मुष्टियुद्ध महासंघाच्या धोरणांशी विसंगत आहेत, असे मलिक म्हणाले.

◀(वृत्तसंस्था)

---

# व्हिक्टोरिया एमबोको अंतिम फेरीत

### मॉण्ट्रियल टेनिस

**◆ मॉण्ट्रियल, ७ ऑगस्ट**

कॅनेडियन किशोरी व्हिक्टोरिया एमबोकोने नवव्या मानांकित एलेना रायबाकिनाचा १-६, ७-५, ७-६ (४) असा पराभव करत नॅशनल बँक ओपन टेनिस स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला.

१८ वर्षीय एमबोकोने रायबाकिनाचा फटका मॅच पॉइंटवर पाठवल्यामुळे गोंधळ उडाला. तिसऱ्या सेटमध्ये एमबोकोने मॅच पॉइंट वाचवला व टायब्रेकरसाठी रायबाकिनाला दोनदा ब्रेक लावला. हा एक अविश्वसनीय सामना, मला



पाठिंबा दिल्याबद्दल सर्वांचे आभार, असे एमबोकोने फ्रेंचमध्ये प्रेक्षकांना सांगितले.

दुसऱ्या उपांत्य फेरीत तिचा सामना जपानी स्टार नाओमी ओसाकाशी होईल. ओसाकाने डेन्मार्कच्या १६व्या मानांकित क्लारा टॉसनवर ६-२, ७-६ (७) अशी विजय मिळविला. जगात ८५ व्या क्रमांकावर असलेली एमबोको आपले पहिले डब्ल्यूटीए टूर जेतेपद मिळवण्याच्या प्रयत्नात आहे व ओपन एरामध्ये घरच्या मैदानावर स्पर्धा जिंकणाऱ्या एकमेव कॅनेडियन खेळाडू म्हणून फेय अर्बन (१९६९) आणि बियांका अँड्रीस्कू (२०१९) यांच्यात सहभागी होण्याचा प्रयत्न करत आहे.

◀(वृत्तसंस्था)

### नाओमी ओसाकाचा क्लारावर विजय

जपानच्या नाओमी ओसाकाने डेन्मार्कच्या क्लारा टॉसनला हरवून नॅशनल बँक ओपन टेनिस स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. माजी प्रथम विश्वमानांकित ओसाकाने उपांत्य लढतीत क्लाराला ६-२, ७-६(७) असे हरविले. या विजयामुळे आता ओसाकाचा सामना १८ वर्षीय स्थानिक आवडती व्हिक्टोरिया एमबोकोसोबत होणार आहे. फेब्रुवारी २०२१ मध्ये ऑस्ट्रेलियन ओपननंतर २७ वर्षीय ओसाका डब्ल्यूटीए टूरवरील तिच्या पहिल्या जेतेपदासाठी झुंजणार आहे. चार वेळा ग्रॅण्ड स्लॅम विजेती ओसाका सध्या जगात ४९ व्या स्थानावर आहे.

---



पुमास युएनएएम विरुद्धच्या लीग्स चषक फुटबॉल सामन्यापूर्वी इंटर मियामीचा लियोनेल मेस्सी (डावीकड) पत्नी अँटोनेला रोकुझो (उजवीकडे) बसलेला

### मेस्सीच्या अनुपस्थितीत इंटर मियामीचा विजय

**◆ फोर्ट लॉडरडेल, ७ ऑगस्ट**

लियोनेल मेस्सीच्या अनुपस्थितीत त्याचे जुन्या मित्रांनी केलेल्या प्रभावी कामगिरीच्या बळावर इंटर मियामीने २०२५ लीग्स चषक स्पर्धेतील सामन्यात पुमास यूएनएएमला ३-१ ने हरवून स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

रॉड्रिगो डी पॉलने इंटर मियामीसाठी पहिला गोल केला, लुईस सुआरेझने एक गोल केला आणि दोन सहाय्य केले. टाडेओ अलेंडेनेही इंटर मियामीसाठी गोल केला. व इंटर मियामीने चेस स्टेडियमवर लीग्स चषकाच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

मेस्सीच्या उजव्या पायाच्या वरच्या पायाला किरकोळ स्नायू दुखापतीमुळे खेळला नव्हता. मेस्सीने मैदानावरील सुटमधून पनीसमवेत सामना पाहिला. सामन्यादरम्यान तो आपल्या जुन्या मित्रांना आणि सहकाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी उभा राहिला.

◀(वृत्तसंस्था)

# सुपर चषक फुटबॉल सप्टेंबरमध्ये खेळवण्याचा प्रस्ताव

### आयएसएलबद्दल शंका कायम

**◆ नवी दिल्ली, ७ ऑगस्ट**

या हंगामात इंडिया सुपर लीग फुटबॉलच्या (आयएसएल) तारखेबद्दल आणि स्वरूपाबद्दल शंका कायम असली तरी आयएसएल क्लबना पुरेशा संख्येने स्पर्धात्मक सामने मिळावेत यासाठी अखिल भारतीय फुटबॉल महासंघाने (एआयएफएफ) गुरुवारी सप्टेंबरच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात सुपर चषक फुटबॉल स्पर्धा खेळवण्याचा प्रस्ताव मांडला.

एआयएफएफने सर्व इंडियन सुपर लीग क्लबच्या प्रतिनिधींसोबत झालेल्या बैठकीत हा प्रस्ताव मांडला. त्यांनी लीग आयोजक आणि राष्ट्रीय महासंघामधील मास्टर राइट्स करार (एमआरए) नूतनीकरणाच्या





अनिश्चिततेमुळे आयएसएलचा आगामी हंगाम स्थगित केल्यानंतर अलीकडेच त्यांच्या चिंता व्यक्त केल्या आहेत.

आयएसएल क्लबना पुरेसे स्पर्धात्मक सामने मिळावेत यासाठी सुपर चषक फुटबॉल स्पर्धा सप्टेंबरच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात सुरू करावी, असा एआयएफएफने प्रस्ताव मांडला आहे.

एआयएफएफ व सर्व १३ आयएसएल क्लबनी एकत्रितपणे राष्ट्रीय हितासाठी हा निर्णय घेतला. आम्ही ७ ते १० दिवसांत पुन्हा भेटू आणि अंतिम निर्णय घेऊ, असे एआयएफएफचे अध्यक्ष कल्याण चौबे म्हणाले. मोहन बागान सुपर जायण्ट्स, ईस्ट बंगाल आणि ओडिशा एफसीचे प्रतिनिधी आभासी पद्धतीने बैठकीत सहभागी झाले. इतर सर्व १० आयएसएल क्लबचे प्रतिनिधी नवी दिल्लीत प्रत्यक्ष बैठकीला उपस्थित होते. या हंगामात आयएसएल होण्याची आशा आहे. जरी ते थोडे उशिरा झाले असले तरी काही बदलांसह स्पर्धा आयोजित करू शकतो, पण ते नंतर ठरवले जाईल व याबाबत अजून निर्णय झालेला नाही, असे चौबे यांनी सांगितले. भारत ९ आणि १४ ऑक्टोबर रोजी एएफसी आशियाई कप पात्रता फेरीत सिंगापूरशी खेळेल आणि सुपर कप या राष्ट्रीय संघांच्या सामन्यांपूर्वी संपण्याची शक्यता आहे.

◀(वृत्तसंस्था)

---

# १७ वर्षांखालील आशियाई चषक पात्रता फेरी

## भारताच्या ड गटात इराण, पॅलेस्टाईन, चीन तैपेई, लेबनॉन

**◆ नवी दिल्ली, ७ ऑगस्ट**

आगामी एएफसी १७ वर्षांखालील आशियाई चषक २०२६ पात्रता फेरी स्पर्धेसाठी गुरुवारी क्वालालम्पूर येथील एएफसी हाऊसमध्ये या स्पर्धेचा ड्रॉ काढण्यात आला. यात यजमान भारताला एएफसी इराण, पॅलेस्टाईन, चीन तैपेई व लेबनॉनसोबत गट ड मध्ये स्थान देण्यात आले आहे. अहमदाबादच्या द एरिना येथे २२ ते ३० नोव्हेंबर दरम्यान पात्रता फेरीच्या गट ड चे सामने आयोजन केले जाणार आहे.

भारत पात्रता फेरीची सुरुवात पॅलेस्टाईनविरुद्ध (२२ नोव्हेंबर) लढतीने करेल आणि त्यानंतर चीन तैपेई (२६ नोव्हेंबर), लेबनॉन (२८ नोव्हेंबर) आणि इराण (३० नोव्हेंबर) यांच्याशी सामना करेल.

या ड्रॉमध्ये ३८ संघांना सात गटांमध्ये विभागण्यात आले. प्रत्येकी सहा संघांपैकी तीन आणि पाच संघांपैकी चार संघ असेल. ते पात्रता फेरीत सिंगल राऊंड-रॉबिन सेंट्रलाइज्ड लीग फॉरमॅटमध्ये भाग घेतील. यात सात गट विजेते अंतिम



फेरीच्या २१ व्या आवृत्तीत प्रवेश करतील, तिथे ते फिफा अंडर १७ विश्वचषक २०२५ मधील नऊ एएफसी प्रतिनिधींसोबत सहभागी होतील. जे संघ आपोआप पात्र ठरले आहेत, त्यात कतार, उझबेकिस्तान, सौदी अरब, दक्षिण कोरिया, उत्तर कोरिया, जपान, ताजिकिस्तान, संयुक्त अरब अमिरात व इंडोनेशियाचा समावेश आहे.

पात्रता फेरीच्या ड्रॉसाठी, मागील तीन आवृत्त्यांमधील त्यांच्या अंतिम क्रमवारीवरून मिळवलेल्या गुण प्रणालीवर आधारित ३८ संघांना सहा विभागात मानांकन देण्यात आले.भारताला विभाग २ मध्ये मानांकन देण्यात आले व ड्रॉपूर्वी वेगळ्या यजमान गटामध्ये ठेवण्यात आले होते, जेणेकरून ते इतर यजमानांसारख्याच गटात ड्रॉ होणार नाहीत याची खात्री करता येईल.

१७ आशियाई चषक सौदी अरब २०२६ ७ ते २४ मे २०२६ दरम्यान होणार आहे आणि त्यात अव्वल आठ संघ कतारमध्ये होणाऱ्या १७ विश्वचषक २०२६ साठी पात्र ठरतील.

२०२५ च्या स्पर्धेसाठी पात्रता फेरी गमावल्यानंतर, भारत पुनरागमन करून इतिहासात १० व्यांदा स्पर्धेच्या आगामी आवृत्तीत सहभागी होण्याचे ध्येय ठेवेल.

**वेळापत्रक**

२२ नोव्हेंबर: पॅलेस्टाईन विरुद्ध भारत, २६ नोव्हेंबर: भारत विरुद्ध चीन तैपेई, २८ नोव्हेंबर: भारत विरुद्ध लेबनॉन, ३० नोव्हेंबर: आयआर इराण विरुद्ध भारत.

गटवारी अशी- गट अ: चीन पीआर, बांगलादेश, बहरीन, ब्रुनेई दारुस्सलाम, तिमोर-लेस्टे, श्रीलंका. गट ब : येमेन, लाओस, किर्गिझ प्रजासत्ताक, कंबोडिया, गुआम, पाकिस्तान. गट क : व्हिएतनाम, मलेशिया, सिंगापूर, हाँगकाँग, उत्तर मारियाना बेटे, मकाऊ. गट ड : इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराण, भारत, पॅलेस्टाईन, चीन तैपेई, लेबनॉन. गट इ : ऑस्ट्रेलिया, इराक, फिलीपिन्स, जॉर्डन, भूतान. गट फ : थायलंड (ह), कुवेत, तुर्कमेनिस्तान, मंगोलिया, मालदीव. गट ग : ओमान, अफगाणिस्तान, म्यानमार, सीरिया, नेपाळ.

◀(वृत्तसंस्था)

---

# भारताचा सामना उझबेकिस्तान, किर्गिस्तानशी

## १७ वर्षांखालील महिला आशियाई चषक फुटबॉल

**◆ नवी दिल्ली, ७ ऑगस्ट**

बिश्केक येथे होणाऱ्या एएफसी १७ वर्षांखालील महिला आशियाई कप चीन २०२६ पात्रता फेरीत भारताचा सामना गट ग मध्ये उझबेकिस्तान आणि किर्गिस्तानशी होणार आहे. गुरुवारी क्वालालम्पूर येथील एएफसी हाऊस येथे हा ड्रॉ काढण्यात आला.

या ड्रॉमध्ये २७ संघांना आठ गटांमध्ये विभागण्यात आले- प्रत्येकी चार संघांपैकी तीन आणि तीन संघांपैकी पाच गट आहे. ते १३ ते १७ ऑक्टोबर दरम्यान सिंगल राऊंड-रॉबिन सेंट्रलाइज्ड लीग स्वरूपात पात्रता फेरीत भाग घेतील.

१३ ऑक्टोबर रोजी भारताचा सामना किर्गिस्तान प्रजासत्ताकशी आणि १७ ऑक्टोबर रोजी उझबेकिस्तानशी होईल.

आठ गट विजेते १० व्या आवृत्तीच्या अंतिम फेरीत पोहोचतील, जिथे त्यांना २०२५ च्या फिफा १७ वर्षांखालील महिला विश्वचषकातील चार एएफसी प्रतिनिधी - उत्तर कोरिया, जपान, दक्षिण कोरिया आणि चीन - सोबत सामील करून १२ जणांची मजबूत संघरचना तयार करावी लागेल. गत आवृत्तीपेक्षा चार अधिक आहे.

पात्रता फेरीच्या ड्रॉसाठी, २७ संघांना मागील तीन आवृत्त्यांमधील त्यांच्या अंतिम क्रमवारीवरून मिळवलेल्या गुणांच्या आधारे चार गटांमध्ये सीडिंग देण्यात आले. भारताला गट १ मध्ये मानांकन देण्यात आले.

एएफसी १७ वर्षांखालील महिला आशियाई चषक चीन २०२६ स्पर्धा ३० एप्रिल ते १७ मे २०२६ दरम्यान होईल आणि त्यात अव्वल चार संघ फिफा अंडर १७ महिला विश्वचषक मोराक्को २०२६ स्पर्धेसाठी पात्र होतील.

भारताने शेवटचा आशियाई चषक २००५ स्पर्धेत भाग घेतला होता. यंग टायग्रेसेस पात्रता फेरीच्या मार्गाने प्रथमच खंडीय टप्प्यासाठी पात्रता मिळवून इतिहास रचण्याचे ध्येय ठेवतील.

**गटवारी अशी -** गट अ: फिलीपिन्स, मलेशिया, ताजिकिस्तान, सीरिया. गट ब : इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराण, लेबनॉन, कुवेत, सौदी अरब. गट क : इंडोनेशिया, म्यानमार, मंगोलिया, मकाऊ. गट ड : व्हिएतनाम, हाँगकाँग, चीन, गुआम. गट इ : ऑस्ट्रेलिया, सिंगापूर, उत्तरी मारियाना बेटे. गट फ : थायलंड (ह), नेपाळ, तुर्कमेनिस्तान. गट ग : भारत, उझबेकिस्तान, किर्गिझ प्रजासत्ताक. गट ह : बांगलादेश, चीन तैपेई, जॉर्डन.

◀(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...

### हिंदुत्व हे राष्ट्रीयत्व झाले पाहिजे : शरद पोंक्षे
### भारत विकास परिषदेतर्फे बार्शीत व्याख्यान

**बार्शी, दि.७ ऑगस्ट**

भारत विकास परिषद शाखा बार्शीच्यावतीने आयोजित स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विचार व राजकारण सद्यस्थिती या विषयावर आयोजित व्याख्यानाप्रसंगी हिंदुत्व हे राष्ट्रीयत्व झाले पाहिजे, असे विचार जेष्ठ अभिनेते व नामांकित व्याख्याते शरद पोंक्षे यांनी व्यक्त केले. देशाचा विकास करायचा असेल तर शिक्षण व सुरक्षा व्यवस्था भक्कम असावी लागते, असेही मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी



भारतमाता व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन पोंक्षे व कु. वर्षा कुलकर्णी यांचे हस्ते करण्यात आले. वंदे मातरम या राष्ट्रीय गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर सुलाखे हायस्कूलचे प्राचार्य स्वामीराव हिरोळीकर यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या संन्यस्त खडग या नाटकातील दिव्य स्वातंत्र्य रवी हे पद गायिले. भारत विकास परिषदेचे अध्यक्ष संतोष जोशी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुणे शरद पोंक्षे यांचा स्वागतपर सत्कार भारत विकास परिषदेचे अध्यक्ष संतोष जोशी, सचिव वंदना कुलकर्णी, प्रकल्प प्रमुख दिपक बेंद्रे, लखन बाफना यांचे हस्ते करण्यात आला. त्यांना भारत विकास परिषदेच्यावतीने सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. या सन्मानपत्राचे वाचन दिपक बेंद्रे यांनी केले. मंत्रालय मुंबई येथे सहाय्यक कक्ष अधिकारीपदी नियुक्त झालेली वर्षा कुलकर्णी हिचाही प्रमुख अतिथी शरद पोंक्षे यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. भारत विकास परिषद परिवारामध्ये नव्याने सभासद झालेल्या सदस्यांचा भारत विकास परिषदेच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल काळे व सौ. कोमल बेदमुथा यांनी केले तर आभार प्रदर्शन लखन बाफना यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लखन बाफना, उमेश ठोंबरे, वैभव कुलकर्णी, सौ सुवर्णा बाफना, ईश्वरी जोशी, सौ. प्रमोदिनी कोठारी, सौ. वंदना कुलकर्णी, सौ. मेघा काळे, खर्डेकर सर, अतुल गुंडेवार, सौ. अनुजा गुंडेवार, आदित्य जोशी यांनी परिश्रम घेतले.



### उपळे दुमाला येथील वखारिया विद्यालयास क्रीडा साहित्य भेट

**बार्शी, दि.७ ऑगस्ट**

तालुक्यातील उपळे दुमाला येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित वखारिया विद्यालयास प्रा. सुरेश लांडगे यांचेकडून क्रीडा साहित्य भेट देण्यात आले. प्रा.सुरेश लांडगे यांनी आपल्या सेवानिवृत्तीच्या शेवटी आपण समाजोपयोगी कार्यासाठी खर्ची पडावे देशाची भावी पिढी सक्षम, तंदुरुस्त आणि निरोगी बनावी, त्यांचे हाती मोबाईल ऐवजी खेळ साहित्य दिले तर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार होतील. या उच्च भावनेतून संस्थेच्या १६ शाखांना प्रत्येकी १० हजार ५०० रुपयांचे क्रीडा साहित्य भेट दिले. याप्रसंगी संस्थेचे सचिव पी.टी. पाटील, खजिनदार जयकुमार शितोळे, व्ही.एस. पाटील, प्रा. सुरेश लांडगे, शिक्षण शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिखरे सर, बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. कारंडे सर, श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेख सर, कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशीचे प्राचार्य कदम सर उपस्थित होते. वखारिया विद्यालयाचे मुख्याध्यापक दयानंद रेवडकर सर, क्रीडा विभाग प्रमुख एन.एन. महाले यांनी संस्था पदाधिकारी यांचे हस्ते क्रीडा साहित्याचा स्वीकार केला. यावेळी मुख्याध्यापक दयानंद रेवडकर सर यांनी प्रा.सुरेश लांडगे यांचे आभार मानले.

### विवाहितेचा विनयभंग; एकाविरुध्द गुन्हा

**मंगळवेढा, दि.७ ऑगस्ट**

मेडिकल औषधे घेवून जाणाऱ्या एका ३० वर्षीय विवाहित महिलेस तु मला खूप आवडतेस तू माझ्याशी बोलत जा, माझ्या सोबत येत जा असे म्हणून डाव्या हाताला धरुन मनास लज्जा वाटेल असे कृत्य केल्या प्रकरणी सचिन दादा चौगुले याच्या विरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.

# श्रीपूरच्या 'कर्मयोगी'कडून पोळ्यासाठी ७५ रु.चा हप्ता

### प्रशांत परिचारक : शेतकऱ्यांचा पोळा सण केला गोड

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.७ ऑगस्ट-**

श्रीपूर (ता. माळशिरस) येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याने गत वर्षी गाळपासाठी आलेल्या ऊसाचा दुसरा हप्ता ७५ रु. प्रमाणे जाहीर करून त्याची रक्कम सभासद शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केली असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक यांनी दिली.

पोळा सण हा शेतकऱ्यां साठी महत्वाचा असतो



मा.आ.श्री.प्रशांतराव परिचारक चेअरमन | मा.श्री.कैलास खुळे व्हा.चेअरमन | डॉ.यशवंत कुलकर्णी कार्यकारी संचालक

ही भावना लक्षात घेवून कारखान्याचे संस्थापक कै. सुधाकरपंत परिचारक नेहमी या सणासाठी शेतकऱ्यांच्या हातात चार पैसे असावेत या साठी आग्रही असत त्यामुळे सातत्याने शेतकऱ्यांना पोळा सणासाठी ऊसाचा हप्ता दिला जातो. तोच आदर्श व परंपरा आम्ही पाळत असल्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक यांनी सांगितले. याप्रसंगी कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी कारखान्याने यापूर्वी २७०० रु. प्रतिटना प्रमाणे हप्ता दिला असून आता ७५ रु. चा हप्ता दिल्याने २७७५ रु अदा करणेत आले असून एफ आर पी पेक्ष ही रक्कम जादा असल्याचे सांगितले. याप्रसंगी संचालक दिनकरभाऊ मोरे, युटोपिऊनचे चेअरमन उमेश परिचारक, दिलिपराव चव्हण, ज्ञानदेव ढोबळे, तानाजी वाघमोडे, बाळासाहेब यलमार, भगवान चौगुले, लक्ष्मण धनवडे, भास्कर कसगावडे, भैर वाघमारे , गंगाराम विभूते, सुदाम मोरे , विजय जाधव, हनुमंत कदम, किसन सरवदे , दाजी पाटील, दिलिप गुरव, सिताराम शिन्दे, शामराव साळुंखे, राणू पाटील, उपस्थित होते.

> **१५ हजार हेक्टर क्षेत्राची ऊसाची नोंद**
> गळीत हंगाम २०२५ / २६ साठी १५ हजार हेक्टर क्षेत्राची ऊसाची नोंद झाली असून १२ ते १४ लाख मे. टन ऊसाचे गाळप होण्याचा अंदाज असून सर्व असाचे वेळेत गाळप होण्याच्या दृष्टीने व्यवस्थापन प्रयत्नशिल असून ऑफ सिझनची कामे प्रगती पथावर आहेत .
> **- डॉ. यशवंत कुलकर्णी, कार्यकारी संचालक**



# वेळापूरमध्ये लंपी रोगाचा वाढता प्रादुर्भाव

**▸▸वाड्या वस्त्यांवर जाऊन औषधोपचाराची वेळापूर सरपंच बनसोडे यांची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.७ ऑगस्ट-**



माळशिरस तालुक्यातील वेळापूर परिसरात लंपी त्वचारोगाने पुन्हा एकदा जनावरांमध्ये थैमान घालण्यास सुरुवात केली आहे. या संसर्गजन्य रोगामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, जनावरांचे जीव वाचवण्यासाठी तातडीने उपाययोजना राबवण्याची गरज निर्माण झाली आहे.



या पार्श्वभूमीवर वेळापूर ग्रामपंचायतीचे सरपंच रजनीश बनसोडे यांनी पशुसंवर्धन विभागाकडे मागणी करत स्पष्ट केले की, मायनर फाटा, शेरी, मुंगूसकर वस्ती, गायकवाड वस्ती, मदने वस्ती, चव्हाणवाडी, आडत मळा, मेहत्रे मळा, बनकर वस्ती यांसह इतर वाड्यावस्त्यांमध्ये थेट जाऊन लंपी बाधित व संशयित जनावरांवर औषधोपचार करावेत. तसेच प्रतिबंधात्मक लसीकरण करून या रोगाचा प्रसार रोखावा.

गोवंश वाचवणे आणि शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळणे अत्यावश्यक असून, यासाठी प्रशासन आणि पशुवैद्यकीय विभागाने युद्धपातळीवर काम करणे गरजेचे आहे, असे सरपंच बनसोडे यांनी सांगितले.

त्यांनी जनजागृती, वेळेवर औषधोपचार आणि लसीकरण हेच लंपी रोग थोपवण्याचे प्रभावी उपाय असल्याचे नमूद केले. स्थानिक शेतकरी वर्गानेही प्रशासनाकडून अधिक मदतीची अपेक्षा व्यक्त केली आहे. पशुवैद्यकीय अधिकारी लवकरात लवकर उपचार करतील, अशी अपेक्षा नागरिक करीत आहेत.

# मोहोळ तालुक्यात आश्लेषा नक्षत्राच्या पावसाने खरीप हंगामातील पिकास जीवदान

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ,दि.७ ऑगस्ट-**

मोहोळ तालुक्यात मे महिन्यात समाधान कारक पाऊस पडल्यामुळे शेतकऱ्यांनी सुमारे ८२३२ हेक्टर क्षेत्रापैकी ७७२३ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली होती. त्यापैकी सोयाबीन ३२२० हेक्टर, मका २४०८ हेक्टर, तुर ९५५ हेक्टर आणि उडीद ९२५ हेक्टर क्षेत्रावर पेरण्या झाल्या होत्या.

त्यानंतर पावसाने सुमारे महिनाभर दडी मारल्याने हलक्या जमिनीतील पिके धोक्यात आली होती. दरम्यान ५ ऑगस्ट रोजी झालेल्या पावसाने मोहोळ शहर व इतर तालुक्यात पिकाला पुन्हा चांगले दिवस येऊ लागले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यात समाधान व्यक्त केले जात आहे.

तालुक्यात सरासरी : ५५ ० मिमी सरासरी पाऊस पडतो. त्यापैकी १ जून ते ६ ऑगस्ट या दरम्यान सरासरी १३० मिलिमीटर पावसाची नोंद झाली. चालू वर्षी जूनच्या अगोदर पडलेल्या पावसामुळे खरीप पिकासाठी लाभदायी ठरला आहे. मोहोळ नरखेड देगाव वाळूज, यलमवाडी, एकुरके,



बोपले, डिकसळ, मसले चौधरी, भांबेवाडी, मोरवंची, घाटणे, मलिकपेठ, आदी भागात मंगळवारी व बुधवारी जोरदार पाऊस झाल्याने जीवदान मिळाले आहे . त्यामुळे शेतकरी सुखावला आहे. तालुक्यात अनेक ठिकाणी जुलैमध्ये झालेल्या पावसामुळे मशागत करून शेतकरी वर्गाने मोठ्या प्रमाणात लागवड केली होती. ओल असल्यामुळे उगवणही चांगली झाली परंतु बऱ्याच दिवस पाऊस न झाल्याने पिके सुकू लागली होती. काही ठिकाणी दुबार पेरण्या झाल्या . अनेक ठिकाणी सोयाबीन गुडघ्या इतके झाल्या असून *या पावसाने खरीपाच्या एकूणच पिकांना जीवदान मिळेल आणि दुबार पेरणीचा खर्च टळेल या भावनेने शेतकरी वर्ग सुखावला आहे

# 'सिल्व्हर ज्युबिली'मध्ये विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.७ ऑगस्ट-**

येथील सिल्व्हर ज्युबिली हायस्कूलमध्ये मॉर्निंग क्लब, बार्शीच्यावतीने सामाजिक उपक्रम अंतर्गत ६० गरजू आणि होतकरु विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटपाचा कार्यक्रम नुकताच पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रशासकीय सभापती विजयनाना राऊत यांच्या हस्ते झाले.



या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. सिल्व्हर ज्युबिली हायस्कूलच्या प्रांगणात आयोजित या कार्यक्रमला माजी नगरसेवक संदेश काकडे, शाळेचे मुख्याध्यापक अनिरुद्ध चाटी, पर्यवेक्षिका सौ. अनुराधा विश्वेकर, सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ. म्हमाणे यांच्यासह शिक्षकवृंद आणि शाळेतील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप करताना त्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह दिसून आला.

मॉर्निंग क्लब, बार्शीने हा उपक्रम आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि मेहनती विद्यार्थ्यांना शिक्षणात प्रोत्साहन देण्यासाठी हाती घेतला आहे. गणवेश मिळाल्याने विद्यार्थ्यांचा आत्म विश्वास वाढेल आणि त्यांचा शैक्षणिक प्रवास सुलभ होईल, असा या उपक्रमामागील हेतू आहे. विजय नाना राऊत यांनी आपल्या भाषणात मॉर्निंग क्लबच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. शिक्षण हे प्रत्येक मुलाचे मूलभूत हक्क आहे. अशा उपक्रमांमुळे गरजू विद्यार्थ्यांना आधार मिळतो आणि समाजात सकारात्मक बदल घडतो, असे ते म्हणाले. मॉर्निंग क्लब, बार्शी गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात सक्रिय आहे. शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक विकासासाठी क्लबने अनेक उपक्रम राबवले आहेत.

यापूर्वीही क्लबने शालेय साहित्य वाटप, वृक्षारोपण आणि रक्तदान शिबिरांसारखे उपक्रम यशस्वीपणे राबवले आहेत. या गणवेश वाटप कार्यक्रमानेही त्यांच्या सामाजिक कार्याला नवी उंची प्राप्त झाली आहे. गणवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी मॉर्निंग क्लब आणि शाळेच्या प्रशासनाचे आभार मानले. नवीन गणवेश मिळाल्याने आम्हाला शाळेत येण्यासाठी अधिक उत्साह वाटतो, अशी भावना एका विद्यार्थ्याने व्यक्त केली. शाळेचे मुख्याध्यापक अनिरुद्ध चाटी यांनीही या उपक्रमाचे स्वागत केले. मॉर्निंग क्लबने आमच्या शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना गणवेश देऊन त्यांचे मनोबल वाढवले आहे. यामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रवास अधिक सशक्त होईल, असे त्यांनी सांगितले.

हा गणवेश वाटपाचा उपक्रम सिल्व्हर ज्युबिली हायस्कूल आणि मॉर्निंग क्लब, बार्शी यांच्या सहकार्याने यशस्वी ठरला असून, यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल नवीन आशा आणि उत्साह निर्माण झाला आहे.

# आपत्ती काळात मदतीसाठी सेवा भारतीचा रविवारी प्रशिक्षण वर्ग

### पंढरपुरात प्रशिक्षण वर्गाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा-**
**करकंब, दि.७ ऑगस्ट-**

पंढरपूर व बारामती जिल्हा सेवाभारती शाखेमार्फत आपत्ती व्यवस्थापनाच्या माहितीबद्दल एक दिवसीय प्रशिक्षण वर्ग रविवार दि. १०ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आला आहे.



आपत्तीच्या वेळी मदतीसाठी धावून जाणाऱ्या स्वयंसेवकांना तसेच नागरिकांना शास्त्रीय व आधुनिक पद्धतीने प्रशिक्षित करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे पंढरपूर जिल्हा सेवा भारतीचे अध्यक्ष ड.माधव मिरासदार यांनी सांगितले.१८ ते ४५ वयोगटातील महिला व पुरुष स्वयंसेवकांस तसेच नागरिकांसाठी खुल्या असलेल्या या वर्गात पूरस्थिती नियंत्रण,आग नियंत्रण,प्राथमिक उपचार अशा महत्त्वाच्या विषयांवर तज्ज्ञ प्रशिक्षक मार्गदर्शन करणार आहेत. समाजासाठी उपयोगी ठरणाऱ्या प्रशिक्षित स्वयंसेवकांची फळी तयार करण्याचा या उपक्रमामागे हेतू असून अधिकाधिक नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

प्रशिक्षण वर्ग रविवार दि.१०ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत कर्मयोगी विद्यानिकेतन विद्यालय पंढरपूर येथे होणार आहे. या उपक्रमासाठी किरण चव्हाण पंढरपूर ९०९६२००३७९, संदीप देशपांडे बारामती ७७९८५६४५२१, महेंद्र येलपले ७०३०३७०९०९, अजय पुरंदरे ९८२२७०३९३०, प्रसन्न कुलकर्णी ९८२३५८०५८५ यांच्याशी इच्छुकांनी संपर्क साधावा असे आयोजकांनी आव्हान केले आहे.

# कामती, बुद्रुकवाडी ग्रामपंचायतीची विभागीय आयुक्तांकडून तपासणी

**संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत मोहोळ तालुक्यातील कामती खुर्द व माढा तालुक्यातील बुद्रुकवाडी या ग्रामपंचायतीची विभागीय अप्पर आयुक्त (विकास) दिपाली देशपांडे, सहायक आयुक्त (विकास) रविंद्र कणसे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, कार्यकारी अभियंता प्रविण पाटील, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के, सहाय्यक गटविकास अधिकारी विजयकुमार देशमुख, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, सहायक प्रशासन अधिकारी शैलेश सराफ, कनिष्ठ सहायक विशाल भुरकुंडे, सरपंच सविता किरण माळी, उपसरपंच दीपक काटकर, जिल्हा प्रशिक्षण समन्वयक शंकर बंडगर, क्षमता बांधणी सल्लागार महादेव शिंदे, इंजिनियर योगेश कुंभार, विस्तार अधिकारी नागसेन कांबळे, विस्तार अधिकारी ठक्का, समूह समन्वयक प्रशांत शिंदे उपस्थित होते. ग्राम पंचायत अधिकारी मंजुश्री कारंडे यांनी गावात राबविलेल्या विविध



उपक्रमाची माहिती दिली.

प्रास्तविक सोलापूर दूध संघाचे व्हाईस चेअरमन दीपक माळी यांनी केले. कामती बुद्रुक व बुद्रुकवाडी येथील शाळेतील व अंगणवाडीस भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. ग्राम पंचायतीमध्ये फिरून पायी चालत पाहणी केली. शाळा स्वच्छतागृह, वैयक्तिक स्वच्छतागृह, सार्वजनिक स्वच्छतागृह, परसबागा, सांडपाणी व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन, महिला बचत गटांनी केलेली विविध उपक्रम मासिक पाळी व्यवस्थापनासाठी ग्रामपंचायतीने राबविलेले उपक्रम व या विविध कामांची पाहणी अप्पर आयुक्त दिपाली देशपांडे यांनी केले.

**आरोग्यासाठी लक्ष द्या**

कामती गावात महिलांसाठी सॅनिटरी नॅपकीन वाटप, माझी वसुंधरा अंतर्गत राबविलेले विविध उपक्रमाचे कौतुक अप्पर आयुक्त दिपाली देशपांडे यांनी केले. महिलासाठी सार्वजनिक ठिकाणी सॅनिटर नॅपकीन साठी व्हेडींग मशीन बसविण्याच्या सुचना केल्या. पाणी गुणवत्तेसाठी काळजी घेण्याच्या सुचना दिल्या. महिलांच्या आरोग्या कडे प्राधान्याने लक्ष द्या असेही त्यांनी सांगून अद्ययावत लायब्ररी करण्याच्या सूचना दिल्या.

### अनधिकृत प्रवाशांकडून कोटींचा दंड वसूल

**सोलापूर, दि.७ ऑगस्ट**

मध्य रेल्वेने अनधिकृत प्रवाशांवर कडक कारवाई करण्यात आली असून आर्थिकवर्ष एप्रिल ते जुलै २०२५ या कालावधीत तिकीट तपासणी पथकांनी विनातिकीट/वैध तिकीट नसलेल्या सोलापूर विभागात ८५ हजार प्रकरणांमधून ४ कोटी १८ लाख आणि मुख्यालयात ९१ हजार प्रकरणांमधून ६ कोटी ५८ लाख रुपयांचा दंड वसुल करण्यात आला.

प्रवाशांना सुरक्षित, सुकर व आरामदायक प्रवास सुविधा देण्याच्या आपल्या प्रयत्नांचा भाग म्हणून, मध्य रेल्वे नियमितपणे मेल-एक्सप्रेस, पॅसेंजर, विशेष ट्रेनमध्ये तसेच मुंबई व पुणे विभागातील उपनगरी ट्रेनमधील सर्व विभागांमध्ये व्यापक तिकीट तपासणी मोहीम राबवते, जेणेकरून विनातिकीट प्रवासावर नियंत्रण ठेवले जाते. अनधिकृत प्रवासावर नियंत्रण ठेवण्यासाठी, मुख्यालय तसेच सर्व विभागांत तपासण्या केल्या जातात. यामध्ये स्थानक तपासणी, अचानक धाड तपासणी, किल्लाबंदी तपासणी, व्यापक तपासणी आणि मेगा तिकीट तपासणी मोहिमा यांचा समावेश आहे.

# देशाच्या राजकारणात लवकरच बदल : ॲड. आंबेडकर

### मनोज जरांगे व लक्ष्मण हाके यांची मासलीडर होण्यासाठी धडपड

### शरद पवार भाजपाचे हस्तक असल्याचीही केली टीका

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ७ जुलै -**

शरद पवार हे भाजपाचे हस्तक असल्याने येत्या पंधरा दिवसात देशाच्या राजकारणात अनेक बदल होणार असल्याचा खळबळजनक दावा वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केला. या बरोबरच अमेरिकेतील ट्रम्प सरकारने भारतावर ५० ते ७० टक्के कर लावल्यामुळे मोदी सरकार आर्थिक दिवाळीखोरीच्या उंबरठ्यावर असून यामुळे लवकरच देशाची आर्थिक शिस्त बिघडणार असल्याचे सुतोवाच देखील यावेळी बोलताना त्यांनी केले.

कोरोना काळामध्ये विठ्ठल रुक्मिणी मंदिर बंद होते, ते उघडण्यात यावे यासाठी ॲड. आंबेडकर यांनी आंदोलन केले होते. त्यामुळे ॲड. आंबेडकरांसह अनेकांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते. या प्रकरणाची न्यायालयात सुनावणी सुरू असून ॲड. आंबेडकर यांनी न्यायालयात उपस्थित राहावे यासाठी न्यायालयाने त्यांना समन्स बजावले होते. त्यामुळे ॲड. आंबेडकर हे गुरुवारी (ता.७) पंढरपुरात दाखल होवून येथील न्यायालयात उपस्थित राहिले.

दरम्यान न्यायालयीन कामकाजानंतर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, कोरोना



संपत आल्यानंतर सर्व बाजारपेठ्या सुरू झाल्या होत्या. मात्र राज्यातील मंदिरे सुरू करण्यात आली नव्हती. यामुळे मंदिराचे दरवाजे उघडावेत अशी मागणी भाविकांतून होत होती. त्याकडे प्रशासन व शासन दुर्लक्ष करत होते. त्यामुळे राज्यात विविध तीन ठिकाणी मंदिरासाठी आपण आंदोलन केले होते. मात्र पंढरपुरात आंदोलन केल्यामुळे न्यायालयाकडून समन्स बजावण्यात आले आहे. आपण न्यायालयाचा आदर करीत असल्याने न्यायालयात उपस्थित राहिलो आहे असे त्यांनी सांगितले.

शरद पवार हे भाजपाचे हस्तक असल्याने येत्या पंधरा दिवसात देशाच्या राजकारणात अनेक बदल होणार असल्याचा खळबळजनक दावा वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष अँड. प्रकाश आंबेडकर यांनी केला.

यावेळी बोलताना आंबेडकर म्हणाले की,देशात सध्या आर्थिक आणीबाणी सारखी परिस्थिती आहे. त्याला मोदी सरकारच जबाबदार आहे. मोदी सरकारकडून आर्थिक धोरण चुकीच्या पद्धतीने देशात राबविले जात असल्याचा त्यांनी आरोप केला. ट्रम्प सरकारने भारतावर ७०टक्के टँक्स लावला आहे. हा रशियाकडून केल्या जाणाऱ्या तेलाच्या खरेदीमुळे लागला आहे. रशिया देखील आपल्या विरोधात आहे. आपल्या शेजारचे बहुतेक देश हे आपल्या विरोधात असल्याचे त्यांनी सांगितले. सिंदूर ऑपरेशन हे देखील अपयशी ठरल्याचा दावा यावेळी त्यांनी केला.

ॲड आंबेडकर यांनी पंढरपूर येथे राजकीय तसेच सामाजीक परिस्थितीसंदर्भात केलेल्या या वक्तव्याने राज्यात चर्चा होणार हे निश्चित मानले जात आहे.

> **मासलिडर होण्यासाठी दोघांची धडपड**
> मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे-पाटील तर ओबीसींना आरक्षण मिळावे यासाठी लक्ष्मण हाके आंदोलन करत असल्याचे दिसून येत आहे. मात्र या दोघांनाही त्यांच्या समाजाशी काही देणे घेणे नाही. ते दोघेही मासलिडर होण्यासाठी धडपड करीत असल्याचा आरोप यावेळी ॲड.आंबेडकर यांनी केला.
>
> **केंद्राच्या राजकारणात पंधरा दिवसात बदल**
> केंद्राच्या राजकारणामध्ये येत्या पंधरा दिवसात अनेक बदल अपेक्षित आहेत. इंडिया आघाडीत फूट पडेल. कारण शरद पवार हे भाजपाचे हस्तक असल्याचाही आरोप ॲड. आंबेडकरांनी केला.


पत्रकार डॉ. रमेश पवार, अनिल कदम, अरूण रोटे, रजनीकांत उपलंची.


सेवानिवृत्त कोर्ट रजिस्टार दौलतराव सिताफळे, उद्योजक सुनिल दावडा.


सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड. बाबासाहेब जाधव, अॅड, बसवराज सलगर, अॅड, रियाज शेख


पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे, पोलिस हवालदार भारत पाटील


महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे राहुल शंके, अमोल गोडसे, बिभिषन लोंढे


पोलिस हवालदार सतिश कदम व डॉ. कट्टे


डॉ. सूर्यप्रकाश कोठे आणि वासुदेव इप्पलपल्ली


महेश घाडगे, रविराज भोपळे, विश्वनाथ आमने, सुभाष चव्हाण, विजय शाबादे, श्री.होर्टीकर


समृध्दी कलामंचचे पदाधिकारी



प्रा. सुभाष शास्त्री, अॅड. प्रमोद शहा, सुनील व्हसाळे. गंगाधर घोंगडे


नारायण कांरजकर, अनिल कुलकर्णी, दत्तात्रय आराध्ये, रमेश बसाटे, दशरथ वडतिले, अरुण बळप, शरणप्पा शाबादे.


श्रीकांत ढेपे, नारायण पिसे, राजू होटकर


क्रीडा शिक्षक दशरथ गुरव, सिद्धेश्वर गायकवाड, प्रबुद्ध चिंचोळकर, सिद्धेश्वर ताटीपामूल, शाम गुप्ते, अब्दुला चौधरी, डॉ. उज्वल मलजी, प्रमोद चुंगे, शिवानंद सुतार.


श्री.एखंडे, सुदेश मालप, सुनील मालप, सुहास छंचुरे


चन्नेश इंडी, अजय पोन्नम


भारतीय जैन संघटना सोलापूर शाखेचे पदाधिकारी अभिनंदन विभूते, शाम पाटील, देशभूषण व्हसाळे, प्रशांत वर्धमाने, कोमल पाचोरे, अशोक भालेराव, मंजूनाथ खोबरे.


प्रमोद हंचाटे


श्री. व सौ.नलीनी चंदेले, अॅड. यू. एन. बेरिया, सुधीर खरटमल


राजीव देसाई


वृत्तपत्र लेखक मंचचे पदाधिकारी


मानसी दामले


धनंजय शहा, सीए शिरीष शहा


मरगू जाधव


सुवर्णा कांबळे


गुलाम मुजावर


अॅड. शशी कुलकर्णी





## दैनिक 'तरुण भारत' मधील संपादकीय, व्यवस्थापकीय, जाहिरात, डिटीपी, प्रिंटीग व वितरण विभागातील सर्व सहकारी.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# शिवस्मारकतर्फे देशभक्तीपर समूहगान स्पर्धा १२ व १३ ऑगस्टला

## स्पर्धेचे २८ वे वर्ष : शाळांना सहभागी होण्याचे आवाहन

**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**
श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ शिवस्मारकतर्फे १२ आणि १३ ऑगस्ट रोजी नवी पेठ येथील शिवस्मारक सभागृहात शालेय देशभक्तीपर समूहगान स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांनी पत्रकार परिषदेत दिली. स्पर्धेचे हे २८ वे वर्ष आहे. देशभक्तीपर समूहगान स्पर्धा १ ली ते थी, ५ वी ते ७ वी, ८ वी ते १० वी अशा तीन गटात होणार आहे. प्रत्येक संघात वादकाशिवाय कमीत कमी ६ व जास्तीत जास्त १० सदस्य असणे आवश्यक आहे. वाद्याची आणि साथीदारांची व्यवस्था संघांनी करावयाची आहे. स्पर्धकांना मराठी, हिंदी किंवा संस्कृत भाषेत ८ मिनिटांमध्ये देशभक्तीपर समूहगान सादर करता येईल. स्पर्धेतील प्रत्येक गटात स्वतंत्र पारितोषिके दिली जाणार आहेत. विजेत्या प्रथम संघास पाच, द्वितीयला तीन तर तृतीयला २ हजार रुपये आणि सर्व विजेत्यांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देण्यात येईल. सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र आणि सर्व सहभागी शाळांना सन्मानचिन्ह देण्यात येईल. सोमवार ११ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत शाळांनी नोंदणी करावी. माहितीसाठी शिवस्मारकचे व्यवस्थापक मल्लिनाथ व्हटकर (९८२२४९८३७३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन संचालिका माधवी कुलकर्णी यांनी केले. यावेळी सचिव गंगाधर गवसने, संचालक प्रा. देवानंद चिलवंत, धनंजय कुलकर्णी उपस्थित होते.



## महत्वाचे...

### 'मृत्यूंजय भारत' या पुस्तकाचे १३ ऑगस्टला प्रकाशन

**पुणे, दि. ७ ऑगस्ट-**
राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य भैयाजी जोशी लिखित मूळ हमारा सांस्कृतिक चिंतन या हिंदी पुस्तकाचा अनुवादित ग्रंथ मृत्यूंजय भारत १३ ऑगस्ट रोजी प्रकाशित होत आहे. भारताच्या समृद्ध सांस्कृतिक मूल्यांची ओळख करून देणाऱ्या या पुस्तकाचा अनुवाद आरती देवगावकर यांनी केला आहे. या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन टिळक रस्त्यावरील गोळवलकर गुरुजी विद्यालयाच्या गणेश सभागृहात १३ ऑगस्टला सायंकाळी ६:३० वाजता करण्यात आले आहे. प्रमुख अतिथी म्हणून रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरिजी महाराज यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन होईल. यावेळी, पुस्तकाचे लेखक भैयाजी जोशी आणि रा.स्व. संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक प्रा. नाना जाधव उपस्थित राहतील. नागरिकांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन मोरया प्रकाशनाचे दिलीप महाजन यांनी केले आहे.

### सैनिक कल्याण निधीसाठी युजर आयडी व पासवर्ड अनिवार्य

**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**
महाराष्ट्र राज्य सैनिक कल्याण विभाग, पुणे यांच्या संकेतस्थळावर www.mahasainik.maharashtra.gov.in या लिंकवर जाऊन महाराष्ट्र युनिफाईड सिटिझन डेटा हब पोर्टलवर माजी सैनिक व युद्धविधवांनी आपला युजर आयडी आणि पासवर्ड तयार करणे अनिवार्य आहे. या युजर आयडी व पासवर्ड शिवाय कल्याणकारी निधी अंतर्गत आर्थिक मदत मिळवणे शक्य होणार नाही, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर मिलिंद तुंगार यांनी कळविले आहे. यासाठी लाभार्थ्यांनी जवळच्या नेट कॅफेमध्ये जाऊन किंवा स्वतःच्या मोबाईलवर MH-UCDH पोर्टलवर लॉगिन करून युजर आयडी व पासवर्ड तयार करावा. त्यानंतर पोर्टलवर लॉगिन करून आवश्यक माहिती भरावी. पात्र लाभार्थ्यांनी आर्थिक मदतीचे प्रकरण जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात सादर करावे. जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक व युद्धविधवा यांनी ही प्रक्रिया लवकर पूर्ण करावी, असे जिल्हा सैनिक कार्यालयाच्या वतीने कळविण्यात येत आहे.

### माजी सैनिक, पत्नी व पाल्यांसाठी 'विशेष गौरव पुरस्कार' अर्ज प्रक्रिया सुरू

**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**
विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या माजी सैनिक, त्यांच्या पत्नी व पाल्यांसाठी 'विशेष गौरव पुरस्कार' देण्यात येणार असून, इच्छुकांनी २४ सप्टेंबर २०२५ पर्यंत अर्ज सादर करावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर मिलिंद देवदत्त तुंगार (नि.) यांनी केले आहे. यासाठी राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू व पुरस्कार विजेते, साहित्य, संगीत, नृत्य, नाट्य, संगणक, उद्योजकता व आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रातील उल्लेखनीय काय, देश-राज्याची प्रतिष्ठा वाढवणारे योगदान, शैक्षणिक क्षेत्रात १० वीत ९०%, १२ वीत ८५% पेक्षा अधिक गुण, पदवी/पदव्युत्तर परीक्षेत विद्यापीठात प्रथम क्रमांक, IIT/IIM/IIMS प्रवेशित विद्यार्थी. वैयक्तिक अर्ज करण्यासाठी विहित नमुन्याचा फॉर्म (डी.डी. ४०) - कार्यालयात उपलब्ध, बोनाफाईड दाखला, मार्कशीटची प्रमाणित प्रत, ओळखपत्राची छायांकित प्रत, डिसचार्ज बुकमधील फॅमिली डिटेल पानाची झेरॉक्स, बँक पासबुकची पहिल्या पानाची प्रत, आधार कार्ड प्रत, कार्याची पुष्टी करणारी प्रमाणपत्रे, वर्तमानपत्रातील प्रसिद्धी, फोटो इ.सह अर्ज सादर करावा.

### अवयव दान करणाऱ्या नातेवाईकांचा सन्मान सोहळा रविवारी

**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**
महर्षी मार्कंडेय महामुनी रथोत्सव आणि जागतिक अवयव दान दिनानिमित्त रविवार, दि. १० ऑगस्ट रोजी संध्याकाळी ४ वाजता कन्ना चौकाजवळील पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय येथील विणकर सभागृहात अवयव दान करणाऱ्या नातेवाईक दात्यांचे सन्मान सोहळ्याचे आयोजन सोलापूरातील श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन, पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय आणि पद्मशाली सखी संघमच्या वतीने करण्यात आले आहे, अशी माहिती वाचनालयाचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, फाउंडेशनचे उपाध्यक्ष नागेश सरगम व सखी संघमच्या अध्यक्षा मेघा इट्टम यांनी दिले आहे. याप्रसंगी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन फाउंडेशनने केले आहे.

# पंढरपूर कॉरिडॉरबाबत महिलांचे अनोखे आंदोलन

## पंतप्रधान व मुख्यमंत्री यांना पाठवल्या नो-कॉरिडॉरच्या राख्या

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.७ जुलै -**
ज्या लाडक्या बहिणींनी देवा भाऊच सरकार याव यासाठी देव पाण्यात ठेवले होते त्याच सरकारने आमच्या घरांवर नांगर फिरवू नये अशी मागणी करत येथील कॉरिडॉर मधील संभाव्य बाधित कुटुंबातील महिलांनी पंतप्रधानांसह मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या छायाचित्रांना रक्ताचा टिळा लावत नो कॉरिडॉर नो डीपीच्या राख्या पाठवून अनोखे आंदोलन केले.

येथील श्रीकृष्ण मंदिरा समोरील चौफाळा येथे सदर आंदोलन करण्यात आले. राज्य शासनाने जाहीर केलेल्या पंढरपूर कॉरिडॉरला





मोठ्या प्रमाणात विरोध होत असून यासाठी विविध आंदोलने देखील केली जात आहेत. कॉरिडॉर अंतर्गत बाधित होणाऱ्या कुटुंबातील महिलांनी एकत्र येत राखी पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर आजचे आंदोलन केले होते. यावेळी मोठ्या संख्येने एकत्र आलेल्या महिलांनी नो कॉरिडॉर नो डीपी चे लेबल लावलेल्या राख्या तयार केल्या होत्या. सदर राख्या पोस्टाने पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पोस्टाने पाठविण्यात आल्या. तत्पूर्वी महिलांनी पंतप्रधान, मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्री यांचे छायाचित्र असलेल्या फलकाला रक्ताचा टिळा लावला तसेच ओवाळून नो कॉरिडॉर नो डीपीच्या राख्या देखील बांधल्या. तसेच महिलांनी लाडक्या बहिणींची मागणी मान्य करा कॉरिडॉर रद्द करा, लाडक्या बहिणींना ओवाळणी कॉरिडॉरची करा बोळवणी आदी घोषणा दिल्या. याबाबत बोलताना भाजपच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष डॉ. प्राजक्ता बेणारे यांनी, लोकसभेला नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान व्हावेत म्हणून तसेच राज्यात पुन्हा देवा भाऊंचे सरकार यावे यासाठी महिलांनी भरभरून मतदान केले होते. मात्र हेच सरकार आमच्या घरावर आता वरवंटा फिरवत आहे. यास आमचा कडाडून विरोध असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली.

# चौपट मजा आणि चौपट धमाल घेऊन येतोय आता होऊ दे धिंगाणाचा चौथा सीझन

## प्रेक्षकांचा लाडका अभिनेता सिद्धार्थ जाधव आणि प्रवाह परिवार करणार भव्य खेळातून दिव्य मनोरंजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.७ ऑगस्ट-**
आता होऊ दे धिंगाणाच्या तिन्ही पर्वांना प्रेक्षकांनी भरभरुन प्रेम दिलं. रोजच्या धकाधकीच्या जीवनात निखळ मनोरंजनाचे क्षण घेऊन येणारा हा कार्यक्रम फक्त महाराष्ट्रातच नाही तर सातासमुद्रापलीकडेही आवडीने पाहिला जातो. प्रेक्षकांचा हा लाडका कार्यक्रम चौपट मजा आणि चौपट धमाल घेऊन पुन्हा धिंगाणा घालण्यासाठी सज्ज झालाय. ९ ऑगस्टपासून रात्री ९ वाजता आता होऊ दे धिंगाणाचं चौथं पर्व सुरु होत आहे. प्रत्येत पर्वात प्रेक्षकांना काहीतरी नवं देण्याचा स्टार प्रवाह वाहिनीचा प्रयत्न असतो. चौथ्या पर्वात प्रेक्षकांना थीमपार्कची जादू अनुभवता येणार आहे. थीमपार्क मध्ये ज्याप्रमाणे अद्भुत आणि अविश्वसनीय गोष्टींची सफर घडते अगदी त्याप्रमाणेच धिंगाणाचा मंच भन्नाट गेम्सच्या माध्यमातून मनोरंजनाची धमाल सफर घडवणार आहे. मागच्या पर्वात सुपरहिट ठरलेल्या स्मायली काय गायली, धुऊन टाक, गोरी गोरी पान गाते किती छान या सुपरहिट फेऱ्या नव्या ट्विस्टसोबत



या पर्वातही असणार आहेत. याच्या सोबतीला अनेक नव्या अतरंगी फेऱ्या देखिल पाहायला मिळतील. सर्वात महत्वाचं म्हणजे गेल्या तीन पर्वात ज्या फेरीची सर्वाधिक चर्चा रंगली त्या साडे माडे शिंतोडेचं भव्यदिव्य रुप या पर्वाचं प्रमुख आकर्षण ठरेल.

एनर्जेटिक सुपरस्टार आणि सर्वांचा लाडका होस्ट आणि दोस्त सिद्धार्थ जाधव या कार्यक्रमाच्या माध्यमातून पुन्हा एकदा धिंगाणा घालण्यासाठी सज्ज आहे. चौथ्या पर्वाविषयी सांगताना सिद्धार्थ जाधव म्हणाला, 'तुमचा कार्यक्रम कधी बंद होणार यापेक्षा तुमचा कार्यक्रम कधी सुरु होतोय याची जेव्हा प्रेक्षकांकडून विचारणा होते तेव्हा तेच त्या कार्यक्रमाचं यश असतं. मी स्वप्नातही विचार केला नव्हता की इतकं यश आता होऊ दे धिंगाणाला मिळेल. या कार्यक्रमाचा चौथा सीझन करताना अतिशय आनंद आणि अभिमान वाटतोय. याचं श्रेय स्टार प्रवाह वाहिनी आणि आता होऊ दे धिंगाणाच्या संपूर्ण टीमला जातंय. प्रेक्षकांप्रमाणेच मी सुद्धा या पर्वाची वाट पहात होतो. नवी ऊर्जा घेऊन हा कार्यक्रम लवकरच भेटीला येतोय. आता होऊ दे धिंगाणा म्हणजे १००% मनोरंजनाची हमी. नव्या जोशात आणि नव्या ढंगात चौथं पर्व प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी सज्ज आहे. अश्या शब्दात सिद्धार्थ जाधवने आपली भावना व्यक्त केली.'

स्टार प्रवाहच्या परिवारातल्या कलाकार मंडळींसोबत यंदाचं पर्व नव्या जोशात रंगणार आहे. दोन मालिकांच्या टीममधली सांगितीक लढत प्रेक्षकांसाठी पर्वणी असलेच पण त्यासोबतच भन्नाट टास्क आणि कलाकारांच्या पडद्यामागच्या गमती-जंमतीही या मंचावर उलगडतील. तेव्हा सिद्धार्थ जाधवचा सळसळता उत्साह आणि प्रवाह परिवाराचा धिंगाणा एकत्र अनुभवायचा असेल तर आता होऊ दे धिंगाणाचं चौथं पर्व पाहायलाच हवं. तेव्हा पाहायला विसरु नका स्टार प्रवाहचा अनोखा आणि भन्नाट कार्यक्रम 'आता होऊ दे धिंगाणा ४' ९ ऑगस्टपासून दर शनिवार आणि रविवार रात्री ९ वाजता फक्त स्टार प्रवाहवर.

# रविवारी निघणार ६८ लिंग पदयात्रा

## यंदाचे पदयात्रेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष

## ६८ लिंग भक्त मंडळ व वीरशैव व्हिजन यांचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**
६८ लिंग भक्त मंडळ आणि वीरशैव व्हिजन यांच्यावतीने श्रावणमासानिमित्त ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर यांनी स्थापन केलेल्या ६८ लिंगांचे दर्शन घेण्यासाठी रविवारी पदयात्रेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती ६८ लिंग भक्त मंडळाचे अध्यक्ष शिवानंद सावळगी यांनी दिली.

रविवार, १० ऑगस्ट रोजी सकाळी सहा वाजता श्री सिद्धेश्वर मंदिर येथून पदयात्रेला प्रारंभ होणार असून बाळीवेस येथील श्री मल्लिकार्जुन मंदिर येथे पदयात्रेचा समारोप होणार आहे. श्रावण महिन्यात शहर परिसरातील ६८ लिंगांचे दर्शन घेतल्याने १२ ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेण्याचे पुण्य लाभते, अशी सोलापूरकरांची श्रद्धा आहे. या पदयात्रेची सुरुवात १९७५ साली कै. उमाकांत सावळगी, कै. शरणप्पा मुदेबिहाळ, संगप्पा बुरकुले, पावडेप्पा धुशेट्टी यांनी केली. यंदाचे या पदयात्रेचे ५० वे वर्ष आहे. सध्या बसवराज सावळगी यांच्या नेतृत्वाखाली ही पदयात्रा काढण्यात येते.

या पदयात्रेत शहराबरोबरच दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, अक्कलकोट येथून सुमारे ३०० भाविक सहभागी होतात. या पदयात्रेची सुरुवात श्री सिद्धेश्वर मंदिर येथून होऊन डफरीन चौक, रेल्वे स्टेशन, जुनी मिल (उमानगरी), बर्फ कारखाना, छत्रपती शिवाजी



महाराज चौक, जुना पुणे नाका, सम्राट चौक, बाळीवेस, चाटी गल्ली, मीठ गल्ली, मधला मारुती, माणिक चौक, समाचार चौक, पंचकट्टा, जिल्हा परिषद, होम मैदान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पार्क चौपाटी, सुभाष चौक, चौपाड मार्गे बाळीवेस येथील श्री मल्लिकार्जुन मंदिर येथे समारोप होणार आहे. ज्या भाविकांना पदयात्रेत सहभागी व्हायचे आहे, त्यांनी ९४२०६०८७७० या क्रमांकावर संपर्क साधावा आणि पदयात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन वीरशैव व्हिजनचे संस्थापक अध्यक्ष राजशेखर बुरकुले यांनी केले आहे. पत्रकार परिषदेस वीरशैव व्हिजनचे कोषाध्यक्ष आनंद दुलंगे, उत्सव समिती अध्यक्ष विजयकुमार बिराजदार, विश्वस्त सोमेश्वर याबाजी, सहकार्याध्यक्ष राजेश नीला, सोशल मीडिया प्रमुख अमित कलशेट्टी, गंगाधर झुरळे, बद्रीनाथ कोडगे-स्वामी उपस्थित होते.

# कुचन हायस्कूलच्या मैदानात कुलदैवत मार्कंडेय यांची भव्य चित्रकृती साकारणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**
पद्मशाली समाजाचे कुलदैवत मार्कंडेय महामुनींच्या रथोत्सवनिमित्त अखिल भारतीय पद्मशाली युवजन संघमतर्फे ८ ते ११ ऑगस्ट या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. यामध्ये मार्कंडेय महामुनी यांची भव्य चित्रकृती साकारण्यात येणार आहे, अशी माहिती अ.भा. पद्मशाली युवजन संघमचे अध्यक्ष श्रीनिवास संगा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

याबाबत अधिक माहिती देताना त्यांनी सांगितले की, महाराष्ट्र पद्मशाली संघम तसेच सोलापुरातील पद्मशाली ज्ञाती संस्था, पद्मशाली शिक्षण संस्था, पद्मशाली युवक संघटना यांच्या सहकार्याने हे कार्यक्रम होणार आहेत.८ ते ११ ऑगस्ट या दरम्यान रविवार पेठ येथील कुचेन हायस्कूलच्या सव्वा एकर जागेत मार्कंडेय महामुनी यांची २६० बाय १६० फुटाची भव्य चित्रकृती साकारण्यात येणार आहे. खडी व पेंटच्या सहाय्याने चित्रकार विपुल मिरजकर यांच्यासमवेत २०० जण ही चित्रकृती साकारणार आहेत. ही चित्रकृती पद्मशाली बांधव व नागरिकांना ४० फूट उंचीवरून पाहण्याची सोय करण्यात येणार आहे. या चित्रकृतीचा विश्वविक्रम करण्यासाठी गिनीज बुकसह विविध चार आंतरराष्ट्रीय संस्थांना कळविण्यात आले आहे.

या चित्रकृती शिवाय अन्य विविध कार्यक्रम देखील होणार आहेत. या अंतर्गत शुक्रवार दिनांक



८ ऑगस्ट रोजी सायंकाळी चार वाजता कुचन हायस्कूल येथे उद्घाटन सोहळा होणार आहे. यावेळी पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव दशरथ गोप, अ.भा.पद्मशाली युवजन संघमसह पद्मशाली समाजाच्या विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. यावेळी मार्कंडेय शिलाचित्राचे उद्घाटन, भरतनाट्यम, महाआरती आदी कार्यक्रम होणार आहेत.

शनिवार दिनांक ना९ ऑगस्ट रोजी सामुदायिक मृत्युंजय मंत्र पठण, होम हवन, सामूहिक रुद्र पूजन, भक्ती संगीत रजनी, भजन संध्या, महाआरती आदी धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. यावेळी तेलंगणा पद्मशाली समाजाचे मार्गदर्शक व मध्यप्रदेश सरकारचे प्रधान सचिव नरहरी परकीपंडला, अखिल भारतीय पद्मशाली संघमचे अध्यक्ष कंदकटला स्वामी, अ. भा. पद्मशाली संघमचे सचिव व समन्वयक तुकेश भैरी,अ. भा. पद्मशाली युवजन संघमचे सरचिटणीस महेश जिंदम, प्रसिद्ध तेलगू अभिनेते व जनसेना पक्षाचे प्रचार समिती अध्यक्ष आर. के सागर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सकाळी सात ते रात्री नऊ या दरम्यान हे कार्यक्रम होणार आहेत. रविवार १० ऑगस्ट रोजी रुद्रपाठ, महारुद्राभिषेक, महामृत्युंजय होम हवन, महाआरती, सामूहिक मृत्युंजय स्तोत्रपठण, रुद्र पाठ भरतनाट्यम, महाआरती होणार आहे. सोमवार दिनांक ११ ऑगस्ट रोजी रुद्र पाठ,रुद्राभिषेक, होमहवन पूर्णाहुती, महाआरती महिलांची सामूहिक कुंकुम अर्चना तसेच रात्री दहा वाजता महाआरतीने समारोप समारंभ होणार आहे. चार दिवस चालणाऱ्या या विविध कार्यक्रमांना सर्व पद्मशाली समाज बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन संगा यांनी केले आहे.

पत्रकार परिषदेला पद्मशाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी, महाराष्ट्र पद्मशाली संघाचे अध्यक्ष भूपती कमटम, महाराष्ट्र पद्मशाली संघाचे प्रधान सचिव यशवंत इंदापुरे, सोलापूर पद्मशाली युवक संघटनेचे अध्यक्ष शेखर कटकम, अॅड.संदीप संगा, अमर बोडा, संतोष संगा, अशोक सामल, रवींद्र गोरे, चित्रकार विपुल मिरजकर, बालाजी श्रीचिप्पा आदी उपस्थित होते.

# राज्यातील १२० भाविकांचा झाला संपर्क; ३२ भावीक संपर्काबाहेर

## उत्तराखंडमध्ये अडकलेल्या सर्व भाविकांना आणणार

## राज्य आपत्कालिन विभागाकडून प्रयत्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**
उत्तराखंड राज्यात उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली परिसरात झालेल्या ढगफुटीच्या घटनेमुळे अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यांना राज्यात सुखरूप परत आणण्यासाठी राज्य शासनाच्या आपत्ती विभागाकडून युद्ध पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. आजतागायत १२० भाविकांचा संपर्क झाला असून, ३२ जण अजून संपर्काबाहेर असल्याची माहिती मंत्रालयाच्या आपत्ती विभागाने आज (दि. ७) दैनिक तरुण भारतशी संपर्क साधताना दिली.

या भाविकांना सुखरूप महाराष्ट्रात आणण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उत्तराखंड राज्याचे सचिव दिलीप जवळकर, पोलीस महानिरीक्षक निलेश भरणे यांच्याशी संपर्क साधून महाराष्ट्रातील पर्यटकांना तातडीने आवश्यक ती मदत पुरवण्याची विनंती केली आहे. प्रत्येक पर्यटकाला सुरक्षितपणे घरी परत आणणे आणि त्यांच्या कुटुंबांना दिलासा देणे हीच प्राथमिकता आहे. उत्तराखंडमध्ये अडकलेल्या पर्यटक, भाविकांच्या नातेवाईकांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहन उपमुख्यमंत्री पवार यांनी केले आहे. अडकलेल्या पर्यटकांमध्ये जवळपास १५२ पर्यटकांचा समावेश आहे. त्यांना आवश्यक ती मदत करण्यासाठी राज्य शासन तत्पर असून, पर्यटकांशी सतत संपर्क साधत आहे. उत्तराखंडच्या प्रशासनाशी सुद्धा राज्य शासन सातत्याने संपर्कात असून अडकलेल्या पर्यटकांना सुरक्षित स्थळी हलविण्यासाठी व त्यांना महाराष्ट्रात परत आणण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली यांच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत. ज्यांचा संपर्क होत आहे; त्यांना राज्यात सुखरूप आणण्यासाठी आपत्ती विभागाचे गेलेले पथक प्रयत्न करीत आहे. ज्या लोकांचा संपर्क होत नाही; त्यांचाही कसा संपर्क होईल, यासाठीही आपत्ती विभाग प्रयत्न करीत आहे.

# सत्यस्वरुप परमात्मा : श्रीमद्भागवत कथेतील तात्त्विक चिंतन : हभप डॉ. जयवंत बोधले महाराज

**बार्शी, दि. ७ ऑगस्ट-**

श्रीमद्भागवत कथेच्या पहिल्या स्कंधातील पहिलाच श्लोक अत्यंत महत्त्वाचा असून, त्याच्या शेवटच्या ओळीत सत्यम् परम धीमहि हा भाव व्यक्त करण्यात आलेला आहे. याचा अर्थ असा की, आम्ही सत्यस्वरुप परमात्म्याचे ध्यान करतो. मानवी जीवनातील कोणत्याही शुभ कार्याची सुरुवात ही मंगलाचरणाने करावी लागते. त्याप्रमाणे, श्रीमद्भागवत कथेची सुरुवातही प्रथम परमात्म्याला वंदन करुनच होते, असे डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी आजच्या १३ व्या सत्रात 'श्रीमद्भागवत कथा चिंतन' या विषयावर बोलताना सांगितले. या पहिल्या श्लोकातील धीमहि हा शब्द अनेकवचनी आहे, याचे विशेष महत्त्व आहे. कारण ही कथा सांगणारा आणि ऐकणारा दोघेही एकत्रितपणे, समष्टी स्वरुपात, परमात्म्याचे ध्यान करतात. येथे उपदेश किंवा वंदन हे केवळ एका व्यक्तीपुरते (व्यष्टी) मर्यादित नसून अनेकजण एकत्रितपणे (समष्टी) परमेश्वराला वंदन करतात. ही कथा केवळ वैयक्तिक न राहता समष्टीचा, म्हणजेच समाजाचा, उद्धार करणारी आहे. याच समष्टी-व्यष्टी संबंधातील काही तात्त्विक पैलूंवर महाराजांनी श्रोत्यांचे चिंतन घडवले. ते पुढीलप्रमाणे-



श्रावणमास प्रवचनमाला
भाग - १३

**१) व्यष्टीला सांगायचं आणि परिणाम व्यष्टीवरच होतो.**

उदाहरण- याज्ञवल्क्य आणि मैत्रेयीचे पाहता येईल. याज्ञवल्क्य आपली पत्नी मैत्रेयी हिला आत्मज्ञान देतो. हा संवाद एकाच व्यक्तीला उद्देशून आहे. परिणामी, मैत्रेयीला आत्मबोध होतो आणि तिला संसारातील वैभव नकोसे वाटते- परिणाम तिच्यावरच होतो किंवा गुरुंनी शिष्याला केलेला उपदेश म्हणजे सांगणारा एक आणि ऐकणारा एकच आहे. येथेही आपल्याला उपनिषदातील उद्धालक मुनी आणि श्वेतकेतूचे उदाहरणातून समजते.

**२) व्यष्टीला सांगायचे पण परिणाम समष्टीवर होतो.**

नचिकेताला यमाचा उपदेश होय. यमराजाने नचिकेता या बालकाला आत्मा, मृत्यू, ब्रह्म याविषयी ज्ञान दिले. ते ज्ञान उपनिषदात संकलित झाले आणि पुढे अनेक साधक, ऋषी, तत्त्वज्ञ हे विचार पुढे घेऊन गेले. त्यामुळे नचिकेताच्या माध्यमातून पूर्ण समाजावर परिणाम झाला- व्यष्टीला सांगितले, परिणाम समष्टीवर झाला.

**३) समष्टीला सांगायचे पण परिणाम मात्र व्यष्टीवर होतो.**

प्रजापतीचा आत्मविद्या उपदेश होय. इंद्र व विरोचन हे दोघेही आत्मविद्या शिकायला प्रजापतीकडे येतात. प्रजापती सर्वांकरता आत्मविद्या शिकवतात. पण इंद्रच (देवतांपैकी) खरा अर्थ समजून घेतो आणि पुढे जाऊन आत्मबोध प्राप्त करतो .सर्वांना सांगितले (समष्टी), पण परिणाम इंद्रावर (व्यष्टी) झाला किंवा व्यवहारातील उदाहरण सांगायचे झाल्यास 'सासू बोले सोने लागे ' ! सासू घरात सर्वांसमोर कडवे बोल बोलून जाते पण ते बोलणं लागत मात्र सुनेला!

**४) समष्टीला सांगायचे आणि परिणाम समष्टीवरच होतो.**

उदा: -हरिनाम सप्ताह, भागवत कथा, कीर्तन, यज्ञ वगैरे.

सर्वांना सांगितले जाते आणि एकत्रितपणे वातावरण शुद्ध होते, समाजप्रबोधन होते, भक्तिभाव वाढतो, मूल्यप्रणाली मजबूत होते. समष्टीला, परिणामही समाजावरच होतो. त्यामुळे हे चौथे लक्षण आपल्या या भागवत कथेसंदर्भात महत्त्वपूर्ण आहे, असे डॉ. जयवंत महाराज अनेक उदाहरणे देऊन श्रोत्यांना समजावून सांगतात. यानंतर, डॉ. जयवंत महाराजांनी 'ध्यान' या संकल्पनेचा सूक्ष्म विचार मांडला. त्यांनी ध्यानाचे तीन प्रकार स्पष्ट केले.

**१) प्रतीक ध्यान** - एखाद्या मूर्ती, प्रतिमा किंवा चिन्हाच्या माध्यमातून केलेले ध्यान. **२) ध्येयानुसार ध्यान** - ध्येयप्राप्तीसाठी केलेले साधनात्मक ध्यान् **३) अहंग्रह ध्यान** - आकाररुपातून निराकारापर्यंत जाण्याचा प्रवास म्हणजे अहंग्रह ध्यान. यावेळी डॉ. जयवंत महाराज श्रोत्यांना मार्गदर्शन करतात की, इंद्रियाकडून झालेले चिंतन हे विषयाला कारणीभूत ठरते. हे विषय चिंतन दु:खाला कारण आहे. हे विषय- विषय म्हणजे तरी कोण! तर काम, क्रोध, मद, मत्सर, मोह, इच्छा इत्यादींच्या संबंधाने माणसाच्या मनात निर्माण झालेले विविध विचार त्यालाच ऐनकेन प्रकारे शोक; दु:ख देतात. मात्र ब्रह्म चिंतन हे आनंदाला कारण आहे. म्हणून, चिंता निर्माण करणारे हे विषय चिंतन होय. व चिंता निवृत्त करणारे चिंतन म्हणजे ब्रह्म चिंतन होय. परमात्म चिंतन हे अद्वैतस्वरुप, निर्विषय व निराकार असते. गेल्या १२ दिवसांपासून सुरु असलेली श्रीमद्भागवत कथा हेच परमात्म चिंतन आहे. ज्याचे आपण श्रवण व मनन करीत आहोत. म्हणूनच, ही कथा आपल्याला आनंदाची अनुभूती देणारी आहे. प्रवचनाच्या अखेरीस महाराज म्हणाले की, हे ब्रह्मतत्त्व स्वगतभेदरहित, सजातीय भेदरहित आणि विजातीय भेदरहित असते. ते काल, देश, वस्तू यांच्या बंधनांत येत नाही. म्हणूनच, तेच सत्य आहे. या सत्य या शब्दातच परमात्म्याचे विविध अवतार सामावलेले आहेत. म्हणूनच व्यास महर्षी म्हणतात- सत्यम् परम धीमहि- आम्ही त्या सत्यस्वरुप परमात्म्याचे ध्यान करतो. असे हे भावपूर्ण आणि तात्त्विक चिंतन आजच्या प्रवचन सत्रात झाले.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. ८ ऑगस्ट २०२५ | नारळी पौर्णिमा, |
| विक्रम संवत् २०८२ | बंजारा तीज उत्सव प्रारंभ |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - श्रावण | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. चतुर्दशी (१४.१२) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - उत्तराषाढा (१४.२७) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - आयुष्मान (२८.०८) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - विष्टि (२५.५१) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : मुलांच्या बाबतीत कठोर निर्णय घ्यावे लागतील. अपेक्षित मित्रांची मदत मिळेल.

**वृषभ** : आपल्या भोळ्या स्वभावाचा इतर गैरफायदा तर घेत नाही ना याकडे लक्ष द्या. जास्त ताण घेऊ नका.

**मिथुन** : मनाचा दाखविलेला मोठेपणा नातेसंबंधातील तेढ कमी करणारा ठरेल.

**कर्क** : एखादी मौल्यवान वस्तूची खरेदी सर्वांच्या संमतीने होणे शक्य. घरामध्ये पूर्वी ठरलेला शुभ समारंभ पार पडेल.

**सिंह** : मोठ्या व्यवहारातून पुरेशी काळजी घेत वाटचाल करायची आहे. हितशत्रूंचा काही प्रमाणात त्रास होणे शक्य.

**कन्या** : आपल्या लहानसहान इच्छा:आकांक्षाना पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती आवक झाल्याने तुम्ही खूश असाल.

**तुळ** : एकाच वेळी नोकरी आणि घर या दोन्ही गोष्टींवर लक्ष केंद्रित करावे लागल्याने एकप्रकारचा दबाव येईल.

**वृश्चिक** : धंदा व्यवसायात कामाचा व्याप वाढेल. घरामध्ये छोट्या समारंभाच्या निमित्ताने प्रियजनांची गाठभेट होईल.

**धनु** : कोणताही टोकाचा विचार किंवा अतिरेकी कृती आपल्याच पायावर दगड पाडून घेणारी ठरेल.

**मकर** : संततीच्या दृष्टीने येणाऱ्या शुभवार्ता अभिमानास्पद ठरतील. मात्र, त्यांचे आरोग्याचे प्रश्नाबाबत वेळीच लक्ष द्या.

**कुंभ** : इतरांना न जमणारी कामे तुम्ही यशस्वीरीत्या हाताळाल. त्यामुळे वरिष्ठांची आपल्यावर मर्जी राहील.

**मीन** : एकत्रित होणाऱ्या सहली आनंददायक ठरतील. मुलांच्या हट्टापायी चैनीच्या वस्तूसाठी खर्च करावा लागेल.

# वि.गु. शिवदारे स्मृतीदिनानिमित्त विविध कार्यक्रम

## १७ ऑगस्टला किर्लोस्कर सभागृहात समारोप

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

सहकारमहर्षी कै. वि. गु. शिवदारे यांचा ८ ऑगस्ट रोजी स्मृतीदिन तर १७ ऑगस्ट रोजी जयंती आहे. यानिमित्त ८ ते १७ ऑगस्ट या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन केल्याची माहिती सिद्धेश्वर बँकेचे चेअरमन नरेंद्र गंभीरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शुक्रवार ८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात स्मृती समारोहाचा उद्घाटन सोहळा होईल. यावेळी दहावी व बारावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार स्वामी समर्थ सहकारी सूत गिरणीचे चेअरमन राजशेखर शिवदारे यांच्या अध्यक्षतेखाली व पु. अ. होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांच्या हस्ते होईल.

शनिवार ९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता फार्मसी कॉलेज ऑडीटोरीयम, शिवदारे शिक्षण संकुलात ऑगस्ट क्रांतीदिनानिमित्त 'सोलापूर मार्शल लॉ' या विषयावर प्रा. चंद्रकांत चव्हाण यांचे व्याख्यान होईल. सकाळी ११ वाजता शिवदारे कॉलेज येथे १५ वर्षाखालील मुलांसाठी 'फुटबॉल स्पर्धा' होईल. रविवार १० ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता जुळे सोलापूर शिवदारे शिक्षण संकुलातील युनिक इंग्लिश मिडीयम स्कूल येथे शालेय चित्रकला स्पर्धा होईल.

लायन्स क्लब ऑफ सोलापूर व रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ यांच्या संयुक्त विद्यमाने ११ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते दुपारी १ पर्यंत शिवदारे कॉलेज येथे रक्तदान शिबीर होईल. मंगळवार १२ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता फार्मसी कॉलेज ऑडीटोरियममध्ये महाविद्यालयीन विद्यार्थीनींसाठी हिमोग्लोबिन तपासणी शिबीर होईल. डॉ. प्रतिभा पाटील यांचे सकाळी १० वाजता 'महिलांचे आरोग्य व काळजी' या विषयावर आणि स्त्रीरोगतज्ञ डॉ. मिनल चिडगुपकर यांचे दुपारी १२ वाजता 'महिलांचे कर्करोग' या विषयावर व्याख्याने होईल. कै. वि. गु. शिवदारे प्रतिष्ठान सोलापूर सिद्धेश्वर सहकारी बँक आणि श्री. सिद्धेश्वर बँक सेवक सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार १२ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.३० वाजता हुतात्मा स्मृती मंदिर येथे 'महाराष्ट्राची हास्यजत्रा फेम कलावंत प्रसाद खांडेकर, नम्रता संभेराव, भाग्यश्री मिलिंद, भक्ती देसाई, ओंकार राउत आणि प्रथमेश शिवलकर यांचे प्रसाद खांडेकर लिखित थेट तुमच्या घरातून हे दोन अंकी नाटक सादर करणार आहेत. हे नाटक हे सर्वांसाठी विनाशुल्क असून त्याच्या प्रवेशिका सिद्धेश्वर बँकेच्या मुख्य कार्यालयात प्राप्त होतील. बुधवार १३ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता विज्ञान प्रयोग व गुरुवार दि. १४ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते दुपारी ३ पर्यंत यशोधरा प्रशाला डॉ. नूरअहमद बशीर कारंजे यांचे विज्ञान प्रदर्शन होईल.



सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी घाऊक व किरकोळ ग्राहक भांडार, सिद्धसंग प्रतिष्ठान व महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार १६ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते ११ पर्यंत फार्मसी कॉलेज ऑडीटोरियम येथे कवी संमेलन होईल. या काव्यसंमेलनात नामवंत कवींचा सहभाग असून त्यांचे संचालन जेष्ठ कवी माधव पवार हे करणार आहेत.

शनिवार १६ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता कै. वि. गु. शिवदारे स्मृती समारोह समारंभ सोहळा अंतर्गत पार पडेल. विविध स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण फार्मसी कॉलेज ऑडीटोरियम येथे होईल. समारोहप्रसंगी रविवार १७ ऑगस्ट रोजी कै. वि. गु. शिवदारे स्मृती समारोहाचा सांगता समारंभ दुपारी ४.३० वाजता किर्लोस्कर सभागृहात होईल. या पत्रकार परिषदेस सुचिता थोबडे, प्रकाश वाले, सिद्धाराम जोडभावी, व्ही. व्ही.शेटे आदी उपस्थित होते.



# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील तीन कर्मचाऱ्यांना सुरक्षा पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट -**

मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धरम वीर मीणा यांनी मंगळवारी मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे आयोजित एका कार्यक्रमात सोलापूर विभागातील ३ मध्य रेल्वे कर्मचाऱ्यांना सुरक्षा पुरस्काराने सन्मानित केले.

मागील महिन्यांत कर्तव्यादरम्यान संबंधित कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेबद्दल, अनुचित घटना टाळण्यात आणि रेल्वे ऑपरेशनमध्ये सुरक्षितता सुनिश्चित करण्यात त्यांच्या योगदानाबद्दल सुरक्षा पुरस्कार प्रदान करण्यात आले. प्रत्येक पुरस्कारात पदक, प्रशंसा प्रमाणपत्र, अनुकरणीय सुरक्षा कार्याचे प्रशस्तिपत्र आणि रोख २ हजार रुपये असे बक्षिस असते.

या पुरस्कार प्राप्त कर्मचाऱ्यांमध्ये दुधनी येथील स्टेशन मॅनेजर लिंगराज कांदे, सावळगी येथील पॉइंट्समन ललित कुमार, वाडी येथील तंत्रज्ञ शुभम भोयर यांचा समावेश आहे. दुधनी येथील स्टेशन मॅनेजर लिंगराज कांदे यांनी २८ जून रोजी मालगाडीसोबत सिग्नल एक्सचेंज करताना, त्यांना १४ व्या वॅगनच्या इंजिनमधून हँडल रॉड लटकल्याचे लक्षात आले. त्यांनी सर्व संबंधितांना पुढील स्टेशनवर ते कुठे निश्चित केले आहे याची माहिती दिली. त्यांच्या सतर्कतेमुळे संभाव्य अपघात टळला. यावेळी अतिरिक्त महाव्यवस्थापक प्रतीक गोस्वामी, प्रधान मुख्य सुरक्षा अधिकारी चंद्र किशोर प्रसाद, मध्य रेल्वेचे इतर प्रमुख विभाग प्रमुख आणि वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

# सोलापूरच्या तरुणांनी विकसित केले श्रुती एआय ॲप

## मोबाईलमधील या ॲपशी बोला अन् क्षणात मिळवा उपयुक्त माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

मोबाईलसमोर ठेवून एखादा प्रश्न विचारताच त्या प्रश्नाचे सविस्तर उत्तर आणि दैनंदिन जीवनातील संपूर्ण उपयुक्त माहिती क्षणात उपलब्ध करून देणारे shruti.ai हे एआय तंत्रज्ञानावर आधारित मोबाईल ॲप सोलापूरच्या तरुणांनी विकसित केले आहे. याबाबतची माहिती एसएसटी इंडियाचे सीइओ गणेश मद्दा यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.



या ॲपद्वारे दैनंदिन जीवनातील कोणतीही माहिती, समस्या किंवा प्रश्न या ॲपमध्ये तोंडी किंवा छायाचित्राद्वारे विचारल्यास त्यासंबंधीची आपल्या शहरासह जगभरातील अत्यंत उपयुक्त आणि विस्तृत माहिती क्षणार्धात नागरिकांना उपलब्ध होणार आहे. मुलांच्या गृहपाठापासून शेतीतील पेरणीपर्यंत, दैनंदिन जीवनात उपयोगात येणाऱ्या छोट्या-मोठ्या वस्तूंपासून थेट रेल्वे, बस, विमानाच्या वेळापत्रकांपर्यंतची उपयुक्त माहिती या ॲपद्वारे मोफत मिळणार आहे. सोलापुरातील प्रकल्प अभियंता पूजा पाटील-अथणी, अभियंता स्वप्नाली धोत्रे, गायत्री गुडूर, प्रणाली गुजर, एचआर सुरेश वन्नम, भाग्यश्री गंजी, विनायक सापा, शिरीष बेत यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या उपयुक्त एआय ॲपची निर्मिती केली आहे.नागरिकांनी प्लेस्टोर वर shruti.ai असे सर्च केल्यास हे ॲप मोफत डाउनलोड करता येईल असे एसएसटी इंडियाचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर जयंत आकेन यांनी सांगितले. अधिक माहितीसाठी ८६००१ ५३०५५ / ९२२६३ ३१९५६ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले. या पत्रकार परिषदेस प्रकल्प एसएसटी इंडियाचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर जयंत आकेन, अभियंता पूजा पाटील - अथणी, अभियंता स्वप्नाली धोत्रे, गायत्री गुडूर, प्रणाली गुजर, एचआर सुरेश वन्नम, भाग्यश्री गंजी, विनायक सापा, शिरीष बेत आदी उपस्थित होते.

# पूर्ववैमनस्यातून तरुणाला रॉडने मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट**

पूर्व वैमनस्यातून तरुणाला लोखंडी रॉडने मारहाण करण्यात आली. ही मारहाण कुमठा नाका चौकातील चहा कॅन्टीनजवळ बुधवारी सकाळी ९ च्या सुमारास झाली. निखिल नामदेव वाघमोडे (वय २१, रा. कुमठा नाका, सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. यातील जखमी निखिल आणि सचिन गायकवाड व ड्याम गायकवाड यांच्याशी वाद झाला होता. तेव्हापासून ते निखिलवर चिडून होता. दरम्यान बुधवारी सकाळी ९ च्या सुमारास निखिल हा कुमठा नाका येथील चहा कॅन्टीन येथे चहा पित असताना, त्याला लोखंडी रॉउने सचिन आणि ड्याम गायकवाड याने मारले. यात निखिलच्या डोक्याला जखम झाली आहे. तर लाथाबुकयांनी मारहाण केल्याने सर्वांगास मुकामार लागल्याने त्याला जीवन वाघमोडे यांनी उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### दारुच्या नशेत प्राशन केले किटकनाशक

सोलापूर : दारुच्या नशेत किटकनाशक प्राशन केल्याचा प्रकार मोहोळ तालुक्यातील शेजबाभ्ळगाव येथे बुधवारी दुपारी १२ च्या सुमारास घडला.भगवान मधुकर नामदे (वय ५५, रा. शेजबाभळगाव ता मोहोळ) असे किटकनाशक प्राशन केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. बुधवारी दुपारी बाराच्या सुमारास यातील भगवान याने दारु प्राशन केली होती. दारूच्या नशेत त्याने अज्ञात कारणातून किटकनाशक प्राशन केले. यात त्रास होऊ लागल्याने मुलगा अनिल नामदे याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### घराचे छत अंगावर पडून दोन महिला जखमी

सोलापूर : घराचे छत अंगावर पडल्याने दोन महिला जखमी झाल्या. ही घटना बुध्वा पेठ परिसरातील जय मल्हार चौक भागात बुधवारी सकाळी ८.३० वाजता घडली. राजश्री प्रकाश रणदिवे (वय ३०) व मंगल अशोक रणदिवे (वय ६०, रा. जय मल्हार चौक, सोलापूर) अशी जखमी महिलांची नावे आहेत. बुधवारी सकाळी ८.३० च्या सुमारास राजश्री आणि मंगल या दोघी त्यांच्या जय मल्हार चौकातील घरात होत्या. त्यावेळी अचानक घराचे छत पडले. यात राजश्री आणि मंगल या दोघींच्या सर्वांगास मुकामार लागल्याने त्यांना सकाळी ९.५० वाजता प्रकाश रणदिवे यांनी उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### शेतीच्या कारणातून मंद्रूप येथे दोघांना मारहाण



सोलापूर : दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुप परिसरात शेतीच्या कारणातून वृध्द महिलेसह दोघांना काठी, सळई तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. ही मारहाण रविवारी दुपारी तीनच्या सुमारास झाली. आप्पासाहेब दत्तात्रय माने (वय ४३) व कांताबाई दत्तात्रय माने (चय ६०, दोघे रा. मंद्रुप ता द सोलापूर) असे मारहाण झालेल्याची नावे आहेत. रविवारी ३ जुलै रोजी दुपारी ४.३० च्या सुमारास अंकुश बाबू माने, मनिषा अंकुश माने या दोघांसह इतरांनी शेतीच्या कारणातून काठी, सळई व लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात आप्पासाहेब व कांताबाई यांच्या सर्वांगास मुकामार लागल्याने ते स्वत: शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### सोशल मिडियावर तरुणीचे फोटो टाकू नको म्हणाल्याने मारहाण

सोलापूर : बहिणीशी ओळख असताना काढलेले फोटो सोशल मिडियावर टाकू नका असे म्हणाल्याने बाप लेकाला बेदम मारहाण करण्यात आली. हा प्रकार बुधवारी दुपारी बाराच्या सुमारास मंठाळकर वस्तीजवळील गणपती मंदिराजवळ घडला. अनिल भानुदास पतंगे (वय ५०) व राजू अनिल पतंगे (वय २६, रा. भवानी पेठ, सोलापूर) असे मारहाण झालेल्याची नावे आहेत. यातील जखमी यांच्या नात्यातील मुलीबरोबर मारहाण करणा-यांपैकी एकाची ओळख होती. यावेळी त्याने मुलीबरोबर फोटो काढलेले होते. ही बाब घरातील लोकांना समजल्यानंतर त्यांनी दोघांना समज दिली होती. तेव्हापासून ते एकमेकांच्या संपर्कात नव्हते.परंतु यातील अर्जुन पाटील,संदिप पाटील व इतर चार यांनी दगड तसेच काठीने मारहाण केल्याने अनिल आणि राजू पतंगे हे बापलेक जखमी झाले. ते स्वत: शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



# ए.जी. पाटील महाविद्यालयातील ८० टक्के विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ ऑगस्ट-**

नॅक मान्यताप्राप्त व आयएसओ ९००१:२०१५ प्रमाणित विजापूर रोडवरील ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील अंतिम वर्षातील मेकॅनिकल, सिव्हिल, कॉम्प्युटर आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन अभियांत्रिकी शाखांमधील ऐंशी टक्क्यांहून अधिक विद्यार्थ्यांची निवड विविध नामांकित व बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये यशस्वीरीत्या झाली आहे. या यशाच्या माध्यमातून प्लेसमेंट विभागाच्या कार्यप्रणालीची परिणाकारकता अधोरेखित झाली आहे.

या यशामध्ये सहभागी असलेल्या प्रमुख कंपन्यांमध्ये कॉग्निझंट, निर्मेप इन्फोटेक (मुंबई), क्वालिटी किऑस्क (मुंबई), स्क्वेअर सॉफ्ट (पुणे), स्मार्ट रेकॉन टेक (हैदराबाद), सी.एम.एस. कम्प्युटर्स (मुंबई), वेबटेक डेव्हलपर्स (पुणे), इलेक्ट्रोमार्क सिस्टिम्स (पुणे), वरॉक इंजिनिअरिंग (पुणे), धूत ट्रान्समिशन (पुणे), बेलराईस इंडस्ट्रीज (पुणे), मुंगी इंजिनिअर्स (पुणे), उत्तम टूल्स (पुणे), एलिएशन, ए. डी. इंजिनिअर्स (पुणे), करमतरा इंजिनिअरिंग (मुंबई), एरियल मॅपर्स (पुणे), कोलब्रो ग्रुप (मुंबई), ओईएन इंडिया (पुणे), लिनिट इंडिया, वाच्स्टम व्हेंचर्स (पुणे), न्यमेट्री टेक्नॉलॉजीज (पुणे) तसेच विविध अन्य नामवंत कंपन्यांचाही यामध्ये समावेश आहे.

''संस्थेमार्फत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सॉफ्ट स्किल्स, एप्टिट्यूड आणि टेक्निकल स्किल्स यांवर आधारित एक सर्वसमावेशक ट्रेनिंग प्रक्रिया राबवली जाते. यामध्ये मॉक इंटरव्ह्यूज, रेझ्युमे बिल्डिंग सेशन्स, कोडिंग प्रॅक्टिस आणि कंपनी - स्पेसिफिक मॉड्युल्स यांचा समावेश केला जातो. या योजनाबद्ध प्रशिक्षणामुळे आमचे विद्यार्थी उद्योगजगतातील स्पर्धात्मक वातावरणात यशस्वीरित्या आपली गुणवत्ता सिद्ध करत आहेत.'' अशी माहिती ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी प्रा. एन. पी. पाटील यांनी दिली.

या यशामध्ये डिपार्टमेंटल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट को-ऑर्डिनेटर्स प्रा. एस. जे. लिगाडे, प्रा. पी. आर. हेडगीरे, प्रा. जी. एन. दोन्तुल आणि प्रा. ए. बी. हन्नुरे यांनी अत्यंत मोलाची भूमिका बजावली. विद्यार्थ्यांना मेकॅनिकल विभाग प्रमुख डॉ. एस. बी. गदवाल, कॉम्प्युटर विभाग प्रमुख व अकॅडमिक कोऑर्डिनेटर प्रा. एस.व्ही. कुलकर्णी, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभाग प्रमुख डॉ. आर. व्ही. दरेकर, तसेच सिव्हिल विभाग प्रमुख प्रा. टी. डी. मसलेकर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष एस. ए. पाटील, ट्रस्टी एस. एस. पाटील, कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले आणि प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# रोटरी अन्नपूर्णा योजना म्हणजे सत्पात्री दानाचे उत्तम उदाहरण : पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**

रोटरीची अन्नपूर्णा योजना म्हणजे सत्पात्री दानाचे उत्तम उदाहरण असल्याचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील यांनी सोमवारी सांगितले.

रोटरी क्लब ऑफ सोलापूरच्या अन्नपूर्णा योजनेला १८ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त ड्रीम पॅलेस येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुयश गुरुकुलचे केशव शिंदे सर उपस्थित होते. यावेळी मंचावर अध्यक्षा धनश्री केळकर, सचिव निलेश फोफलिया, अन्नपूर्णा योजनेचे समिती प्रमुख ब्रिजकुमार गोयदानी उपस्थित होते.

रोटरी अन्नपूर्णा योजनेद्वारे रोटरी क्लबने १०० वृध्दांना आधार दिला आहे. आणि हे कार्य खरेच वाखाणण्याजोगे असून रोटरीच्या सामाजिक सेवेच्या बांधिलकीचे प्रतिक असल्याचे केशव शिंदे यांनी सांगितले. रोटरी क्लबचे सचिव निलेश फोफलिया यांनी आभार मानले तर संदीप जव्हेरी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. माजी अध्यक्ष सीए राज मिणियार यांनी सूत्रसंचलन केले. या सोहळ्यात प्रत्येक लाभार्थ्यांना ब्रिजकुमार गोयदानी यांच्यातर्फे टॉवेल आणि स्लिम हेल्थ क्लब यांच्यातर्फे बॅग भेट देण्यात आली. यावेळी रोटरीचे प्रांतपाल नियुक्त जयेश पटेल, सुनील माहेश्वरी, खुशाल देढीया, पारुल पटेल, डॉ. ज्योती चिडगुपकर, डॉ. सोनाली वळसंगकर कालिदास जाजू, पराग कुलकर्णी, भूपती गुंडेली, श्रीकृष्ण गलगली, भरत अय्यंगार, सुहास लाहोटी, शांता येळंबकर, आशिष मेहता, संतोष कणेकर, लक्ष्मी मिनियार, तोरल पंचमिया, प्रांजल डागा, कांचन लाहोटी , हरीश गुप्ता, मितेश पंचमीया, सूरज तापडिया, प्रशांत सिंगी, सुनिल डागा उपस्थित होते.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...




### इंग्लिश स्कूल शाळा समिती अध्यक्षपदी दिलीप जगदाळे तर उपाध्यक्षपदी प्रियंका पोरे

**वेळापूर, दि.७ ऑगस्ट-**

येथील इंग्लिश स्कूल प्रशालेतील शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी दिलीप जगदाळे, उपाध्यक्षपदी प्रियांका पोरे, सचिवपदी आर. बी. पवार तसेच सदस्यपदी बी.के. बागल, योगेश काटकर , रामचंद्र पिसे, प्रवीण वाघमारे, महेश उरणे, शंकर जाधव, समाधान मंडले, शरद कोळेकर, तसेच महिला सदस्या जयश्री देवकते, जबीन मनेरी, रेश्मा कदम, रेश्मा सावंत, मनीषा माने, धनश्री पवार यांची निवड करण्यात आली. प्रारंभी दलितमित्र स्वर्गीय कदम गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मुख्याध्यापक आर.बी. पवार यांनी प्रास्ताविक केले. यावेळी नुतन शाळा व्यवस्थापन समितीमधील नवनिर्वाचित सदस्यांचा सत्कार करण्यात आला. प्रशालेचे उपमुख्याध्यापक पी. एम. शिवशरण उपस्थित होते.



### शरणबसवेश्वर चरित्रातील पाळणा कार्यक्रमास महिलांची गर्दी

**अक्कलकोट, दि.७ ऑगस्ट-**

येथील कुंभार गल्लीतील श्री शांतलिंगेश्वर हिरेमठात श्रावणमासानिमित्ताने आयोजित कलबुर्गी श्री शरणबसवेश्वर यांच्या चरित्रावरील पौराणिक पुराणमधील पाळणा कार्यक्रमास महिलांसह भाविकांची गर्दी होती. अध्यक्षस्थानी मठाचे मठाधिपती श्री. ष. ब्र. जयगुरुशांतलिंगाराध्य शिवाचार्य महास्वामीजी हे होते. यावेळी पुराणिक वे.शिवशरणय्या स्वामी-शास्त्री, हार्मोनियम गुरुशांतय्या स्वामी, तबला बसय्या स्वामी उपस्थित होते. मठाधिपती श्री. ष. ब्र. जयगुरुशांतलिंगाराध्य शिवाचार्य महास्वामीजी म्हणाले, कलबुर्गी श्री शरणबसवेश्वर आणि त्यांचे चरित्र याबद्दल माहिती दिली. यावेळी पुराणिक यांनी रुढी परंपरा मधील पाळणा कार्यक्रमाचे महत्त्व सांगितले. गायक स्वामी यांनी श्री शरणबसवेश्वर यांच्यावरील पाळणा गीत सादर केला. प्रमोद लोकापूरे, वैशाली लोकापूरे, गंगाबाई स्वामी, शिवम्मा स्वामी, शकुंतला भमणगी, सुशिला मंगरुळे, पुतळाबाई कुंभार, सुगलाबाई कुंभार, कमलाबाई कुंभार, गंगाबाई कुंभार, पार्वती कुंभार, विजयालक्ष्मी कुंभार, जयश्री कुंभार, भाग्यश्री कुंभार, महानंदा कुंभार, लक्ष्मी कुंभार व चंद्रकला हत्ते आदी उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना प्रसाद वाटप करण्यात आला. मठाचे पुराण समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते, भक्तगण, सेवेकरी आदींनी परिश्रम घेतले.



### झिंजेवस्तीत कृषीकन्यांमार्फत शेतकरी मेळावा

**पिलीव, दि.७ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील झिंजेवस्ती येथे पाणीव येथील श्रीराम शिक्षण संस्था व महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत सुरू असलेल्या ग्रामीण कृषी जागरुकता कार्यानुभव कार्यक्रम २०२५-२६ झिंजेवस्ती येथील ग्रामपंचायत कार्यालयात कृषीकन्यांनी शेतकरी मेळाव्याच आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्रीराम कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य हरि नरके उपस्थित होते.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सदगुरु साखर कारखान्याचे मुख्य शेतकी अधिकारी सुनिल सावंत उपस्थित होते. तसेच श्रीराम कृषि महाविद्यालयाचे प्राध्यापक रामचंद्र पारसे ,तसेच झिंजेवस्तीच्या ग्रामसेविका प्रिया धुमाळ, बाबुराव पाटील, शयामतात्या मदने, युवा उद्योजक व माजी चेअरमन आनंद पाटील, तसेच झिंजेवस्ती गावातील अनेक शेतकरी बांधव यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सुनिल सावंत यांनी आडसाली ऊसाचे नियोजन याबाबत मार्गदर्शन केले.तसेच प्राचार्य हरि नरके यांनीही यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले.या मेळाव्याचे आयोजन श्रीराम महाविदयालयाच्या कृषीकन्या तृप्ती बनकर, श्रावणी भांबुरे, योगिता चोरमले, स्वरांजली एकतपुरे, संजना गोसावी, सलोनी कांबळे, भाग्यश्री सानप यांनी केले होते.




### माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या जिल्हाध्यक्षपदी योगेश सुळे

**अक्कलकोट, दि.७ ऑगस्ट-**

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या सोलापूर जिल्हा अध्यक्षपदी पुनश्च एकदा योगेश सुळे यांची निवड करण्यात आली. ही निवड माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांनी केली आहे. योगेश सुळे यांच्या निवडीबद्दल माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष स्वामीनाथ हेगडे , माहिती अधिकार पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष साहेबांना तेगेळी ,माहिती अधिकार महिला जिल्हाध्यक्ष वैशाली हवनुर , सोलापूर शहर अध्यक्ष श्रीकांत कोळी , सोलापूर संपर्कप्रमुख माणिक गोसावी , सोलापूर शहर संघटक भीमाशंकर पटणे , वर्षा मेत्रे , लक्ष्मी यादव , संदीप राचेटी, प्रवीण घाडगे, आकाश बबलाद , बसवराज गोरे , समर्थ मसुती , अनिता घोडके आदींनी अभिनंदन करून सत्कार केला. जिल्हाध्यक्ष योगेश सुळे यांनी माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघातर्फे सोलापूर जिल्ह्यातील विविध समस्यांवर व भ्रष्टाचारावर आळा घालण्यासाठी आंदोलन उभे करू असे सांगितले. शेवटी आभार सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष स्वामीनाथ हेगडे यांनी मानले.

# महाळुंगमध्ये विजेच्या धक्याने दोन महिलांसह एका गाईचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. ७ ऑगस्ट-**

महाळुंग (ता. माळशिरस) येथील ढवळे वस्तीवर विजेचा शॉक लागून दोन महिला व एका जर्सी गायीचा दुर्दैवी मृत्यू झाला.

ढवळे वस्ती येथे राहत असलेल्या विठ्ठल रेडे यांच्या कुटूंबात ही घटना घडली. याबाबतची हकीकत अशी की, मंगळवार दि ५ ऑगस्ट रोजी या परिसरात रात्रभर पाऊस पडत होता तो बुधवार दि ६ ऑगस्टच्या पहाटेपर्यंत चालूच होता. नित्य नियमाप्रमाणे रेडे कुटुंबातील रसिका या झोपेतून उठल्यावर




गायीच्या गोठ्यात गेल्या परंतू त्यांना गाय खाली पडलेल्या अवस्थेत दिसली म्हणून त्यांनी तिला उठवण्याचा प्रयत्न केला परंतू रात्रभर पडलेल्या पावसाने शॉर्ट सर्किट होऊन वीज प्रवाह गोठ्यात उतरला होता त्यातच गायीचा मृत्यू झाला होता. विज प्रवाह उतरलेला लक्षात न आल्याने रशिका (वय ५७ वर्ष) यांनाही शॉक लागला व त्यांचा तेथेच मृत्यू झाला. यानंतर त्यांची सुन सुवर्णा अमोल रेडे (वय २७ वर्ष) यांनाही सासुबाई अजून कशा आल्या नाहीत हे पाहण्या साठी गेल्या असत्या त्यांना ही वीज उतरल्याचा अंदाज आला नाही त्यामुळे त्यांचाहा शॉक लागून मृत्यू झाला या घटनेने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेचा तपास अकलूज पोलीस स्टेशनचे तपास अधिकारी दीपक भोसले करीत आहेत.

# दारु पिण्यास पैसे न दिल्याने दोन भावांना मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.७ ऑगस्ट-**

येथील टिळक चौक परिसरात दारु पिण्यासाठी पैसे न दिल्याच्या कारणावरुन तिघांनी दोघा भावांना मारहाण करत जखमी केल्याची घटना रात्रीच्या सुमारास घडली. या प्रकरणी राधे विजय शिंदे (वय २०, रा. झाडबुके मैदान, बार्शी) यांनी तिघांविरुद्ध बार्शी पोलिसांत फिर्याद दिली आहे.

फिर्यादी राधे शिंदे हे त्यांचा भाऊ प्रेम अजित शिंदे, शुभम अवघडे व रोहन कांबळे यांच्यासह भगवंत पेट्रोल पंप येथून पायी घरी जात असताना, टिळक चौक परिसरातील आर्यन झोंबाडे, पांड्या काकडे आणि किरण शेंडगे हे तिघेजण त्यांच्या जवळ आले. त्यांनी फिर्यादी राधे यांना शिवीगाळ करत दारु पिण्यासाठी पैसे देण्याची मागणी केली. त्यास नकार दिल्याने आर्यन झोंबाडे याने राधे शिंदे यांच्या डोक्यात दगड मारुन गंभीर जखमी केले. या मारहाणीत राधे शिंदे व त्यांचा भाऊ प्रेम शिंदे हे दोघे जखमी झाले असून सध्या त्यांच्यावर हिरेमठ हॉस्पिटल, बार्शी येथे उपचार सुरु आहेत. दोघेही पूर्णपणे शुद्धीत असून त्यांनी बार्शी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

# ब्राह्मण महासंघाची महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी जाहीर

- शेतकरी आघाडी प्रदेशाध्यक्षपदी प्रकाश कुलकर्णी
- जिल्हाध्यक्षपदी प्रमोद गोसावी तर महिला आघाडी जिल्हाध्यक्षपदी पद्मजा काळे





**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.७ ऑगस्ट-**

अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाने महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणीचे २३ जिल्हाध्यक्ष आणि जवळपास ३० जिल्ह्यांचे पदाधिकारी जाहीर केले. अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. गोविंद कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांनी या नियुक्त्या जाहीर केल्या.

सोलापूर जिल्ह्यातील प्रकाश कुलकर्णी यांच्यावर शेतकरी आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तर सोलापूर जिल्हाध्यक्षपदी पत्रकार प्रमोद गोसावी यांची नियुक्ती करण्यात आली. महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी पद्मजा काळे यांची निवड झाली आहे. राज्य कार्यकारणीमध्ये मार्गदर्शक म्हणून ब्राह्मण समाजाचे ज्येष्ठ नेते, अभ्यासक आणि उद्योजक यांना स्थान देण्यात आले आहे. सोलापूर येथील पंचांगकर्ते मोहन दाते, परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आशिष दामले, सुधीर दास महंत, ज्येष्ठ उद्योजक अनिरुद्ध देशपांडे, माजी महापौर आर. एस. कुमार, श्रीकांत देशपांडे, नरेंद्र जोग यांना स्थान देण्यात आले आहे. तर रवींद्र देशमुख, रवींद्र प्रभुदेसाई, किरण करमरकर यांना विभागीय संघटन मंत्री म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. कार्यकारिणीने तीन राज्य प्रवक्ते नियुक्त केले असून त्यामध्ये राष्ट्रसंचार चे संपादक अनिरुद्ध बडवे, राहुल साकतकर आणि अजित देशपांडे यांचा समावेश आहे. अकरा उपाध्यक्ष, सात सरचिटणीस, अकरा चिटणीस, एक कोषाध्यक्ष, तीन प्रवक्ते, प्रत्येक विभागाला एक संघटन मंत्री आणि अठरा मार्गदर्शक यांना जबाबदारी देण्यात आली आहे. सोलापूरची जबाबदारी माढा येथील पत्रकार प्रमोद गोसावी यांच्याकडे देण्यात आली आहे. सोलापूरचे बजरंग कुलकर्णी आणि दत्ता कुलकर्णी यांची या कार्यकारिणीत चिटणीस म्हणून नियुक्ती करण्यात आली आहेयेणारी तीन वर्षे अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ उद्योग विकासासाठी समर्पित करणार आहे. ब्राह्मण महासंघाच्या वतीने या तीन वर्षात उद्योग वृद्धी आणि प्रत्यक्ष रोजगार निर्मितीसाठी अनेक कार्यक्रम व संकल्पना राबविण्यात येणार आहेत, असे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. गोविंद कुलकर्णी आणि राज्य सरचिटणीस दिलीप कुलकर्णी यांनी सांगितले.

# डॉ. प्रकाश बुरगुटे यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी : डॉ. यादव

**वाढदिवसानिमित्त सत्कार**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.७ ऑगस्ट-**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ तसेच शिवशक्ती बँक आणि विविध संस्था संघटनांच्या माध्यमातून डॉ. प्रकाश बुरगुटे यांनी केलेले कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे, असे गौरवपर शब्द श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी.वाय. यादव यांनी काढले.

डॉ. प्रकाश बुरगुटे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी आमदार राजेंद्र राऊत, संस्थेचे उपाध्यक्ष नंदन जगदाळे, यशोदा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अरुणदादा बारबोले, माजी नगराध्यक्ष असिफ तांबोळी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ. बुरगुटे यांचा मान्यवरांच्या हस्ते फेटा बांधून व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. यावेळी



डॉ. यादव म्हणाले, डॉ. बुरगुटे यांनी डॉ. जगदाळे मामा हॉस्पिटलची रुग्णांची गरज ओळखून डॉक्टरांच्या प्रयत्नांमधून सिटीस्कॅन मशीन उभारली. तसेच संस्थेचे मेडिकल स्टोअर्स सुरु करण्यात डॉ. बुरगुटे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. यावेळी माजी आमदार राजाभाऊ राऊत म्हणाले, डॉ.बुरगुटे यांनी शिवशक्ती बँकेच्या माध्यमातून अनेक बेरोजगार तरुणांना रोजगार मिळवून दिला.

डॉ. बुरगुटे यांच्यामुळे शिवशक्ती बँक प्रगतीपथावर वाटचाल करत आहे. यावेळी नंदन जगदाळे म्हणाले, डॉ. बुरगुटे हे माझे चांगले मित्र असून त्यांच्या चांगल्या कामांना माझे सदैव सहकार्य असेल. डॉ. बुरगुटे हे माझे वैचारिक विरोधक आहेत पण त्यांच्या शिवशक्ती बँकेला प्रगतीची दिशा देण्याच्या कार्याशी आम्ही पाठीराखे राहू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी ॲड. सुभाष जाधवर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. किरण गाढवे यांनी सूत्रसंचालन केले तर बँकेचे उपाध्यक्ष हनुमंत चव्हाण यांनी आभार मानले. यावेळी बँकेचे सर्व संचालक, सरव्यवस्थापक भारत उमाटे, सहा. व्यवस्थापक गणेश बारंगुळे, बँक कर्मचारी, खातेदार तसेच मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.



# पिलीवमध्ये विविध दाखल्यांचे ७१९ लाभार्थ्यांना वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ७ ऑगस्ट-**

पिलीव (ता. माळशिरस) येथे महसूल विभागाने घेतलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानात ७१९ लाभार्थ्यांना विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले. नागरिकांतून प्रचंड प्रतिसाद मिळाला.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, प्रांताधिकारी विजया पांगारकर, तहसीलदार सुरेश शेजुळ यांच्या मार्गदर्शनाखाली माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे मंडळ कार्यालया मार्फत हे अभियान राबवण्यात आले. नागरिकांच्या समस्या, दाखले, प्रमाणपत्रे, जागेवरच मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. अभियानात महसूल, महावितरण, ग्रामपंचायत, कृषी, प्राथमिक आरोग्य, पुरवठा, मतदार नोंदणी, सेतू मार्फत दिले जाणारे प्रमाणपत्रे दाखले, आधार कार्ड, पशुधन आदी विभागामार्फत नागरिकांच्या समस्या व दाखले प्रमाणपत्रे अभियानात जागेवरच देण्याचा प्रयत्न करण्यात आला. काही समस्या जागेवरच सोडवण्यात आल्या. प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत विशेषतः महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. सेतू कार्यालयातून उत्पन्नाचे, जातीचे, डोमासाईल, नॉन क्रिमिनल आदी दाखले देण्यात आली. यावेळी शिधापत्रिकांच्या तक्रारी जास्त आल्या असताना पुरवठा विभागाचे कोणीही अधिकारी नसल्याने रेशन कार्ड शिधापत्रिकेच्या तक्रारी सोडवण्यासाठी विशेष कॅम्प घेण्याचे आश्वासन मंडळ अधिकारी विजय एकतपुरे यांनी यावेळी दिले. नायब तहसीलदार अमोल कदम, सिद्धनाथ जावीर, मंडळ अधिकारी विजय एकतपुरे, ग्राम महसूल अधिकारी अमोल कांबळे, संकेत खाडे, दिलीप नाईकनवरे, ज्योत्स्ना लोखंडे, महेश रणखांब, अण्णासाहेब कोपनर, कृषी मंडल अधिकारी रेखा खरात, ग्रामपंचायत अधिकारी विलासराव बाबर, भाऊसाहेब कोरबू, वैद्यकीय अधिकारी विलासराव जाधव, आरोग्य सहायिका, आरोग्य सेवक, आशा सेविका, महावितरणचे सहाय्यक अभियंता प्रदीप थोरात, सेतू केंद्रचालक स्वप्नील पाटील, लक्ष्मण करे ,अमोल भैस, कोपनर, स्वस्त धान्य दुकानदार नजीर मुलाणी, संतोष गुजरे, महेश पाटील, दत्तात्रेय जावळे, कबीर माने, मतदार नोंदणी विभाग पोपट धनवडे आदी उपस्थित होते.

**असे झाले दाखल्यांचे वाटप**

जातीचे दाखले ७८, उत्पन्नाचे दाखले ६२, डोमासाईल सर्टिफिकेट २७, रहिवासी दाखले ०७, नॉन क्रिमिनल ४२, शेतकरी दाखले १९२ ,ईकेवायसी ०८, मतदान नोंदणी १८, रेशन कार्ड तक्रारी ७०, तलाठी कामकाज ८७, कृषी विभाग २५, ग्रामपंचायत विभाग २५, आरोग्य विभाग ५१, पशुवैद्यकीय विभाग पाच व महावितरण विभागाकडून २२ तक्रारीचे निराकरण करण्यात आले.

# अक्कलकोट 'रॉबिन हूड'कडून वर्धापनदिनी फळे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.७ ऑगस्ट-**

मैत्री दिनाचे औचित्य साधून दि.५ ऑगस्ट २०१७ रोजी सुरू झालेल्या येथील रॉबिन हूड आर्मीने मुलांना फळे वाटप करून आपला ८ वा वर्धापन दिन साजरा केला.

माणुसकी हाच खरा धर्म आहे. मेल्यावर खांदा देण्यापेक्षा जिवंतपणी मदतीचा हात देण्यासाठी भुकेल्यांच्या पोटात दोन घास अन्नाचे कण घालणे, बेवारस रुग्णांना औषध उपचार करणे, बेवारस प्रेतावर अंत्यविधी पार पडणे, हरवलेल्या लोकांना शोधून काढणे अशी कामे रॉबिनहूड आर्मीकडून केली जातात. अक्कलकोट शहरातील हॉटेल, बेकरी, मंगल कार्यालय व घरगुती कार्यक्रमाच्या ठिकाणी शिल्लक राहिलेले अन्न गरजू पर्यंत पोहचविण्याचे कार्य ते करीत आहेत. रॉबिन हूड आर्मीने गेल्या ८ वर्षामध्ये तीन ते चार लाख पेक्षा अधीक लोकांना एक वेळचे अन्न दिले आहे.



रोज २५ ते ३० गरीब गरजू बेघर लोकांना जेवण तसचे फ्रुट वाटप करीत आहे. अक्कलकोट शहरातील एसटी स्टँडच्या मागील झोपडपट्टीत एक कुटुंब असून या घरामध्ये तीन मुले मतिमंद व अपंग आहेत. त्या कुटुंबाला दररोज न चुकता दुपारी किंवा रात्रीचा एक वेळचे जेवण न चुकता त्या कुटुंबाला रॉबिन हूड आर्मी पुरवत आहे. त्यासोबतच रॉबिन हूड आर्मीचे रशीद खिस्तके, सोहेल फरास, समीर शेख, अशरफ गोलंदाज, समीर चाबुकस्वार हे सदस्य शहरातील कित्येक बेवारस मनोरुग्ण व भिक्षू लोकांचा उपचारसुद्धा करतात. याकामी डॉ. विपुल शहा यांची मोलाची साथ लाभली आहे. त्याच बरोबर पोलीस प्रशासन व पत्रकार बांधवांचेही सहकार्य आहे. उपचारादरम्यान रुग्णांचा मृत्यू झाल्यास अंत्यविधी सुद्धा ज्यांच्या त्यांच्या धर्मानुसार करण्यात येतो. आजवर हरवलेल्या व्यक्तीचा शोध घेऊन त्यांच्या घरच्यांना सुपुर्द केले आहे. रशीद खिस्तके,सोहेल फरास, ज्योतीबा पारखे, देविदास गवंडी, अनंत क्षीरसागर, आशिष हुबे, योगेश महेंद्रकर, श्रीधर गुरव,अशरफ गोलंदाज,आझम शेखजी,अली मुजावर,समर्थ गोरे,मुआज शेख,मुदस्सर खिस्तके,मुस्तफा बागवान,इनुस बागवान,इलियास शेख,मुवाज शेख आदी जण नेहमी सहभागी होतात.

# हौशी कलाकारांच्या गाण्यांनी बार्शीकर मंत्रमुग्ध

- अनेक गीतांना मिळाला उत्तम साद

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.७ ऑगस्ट-**

फक्त हौशी कलाकार ग्रुपतर्फे येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात 'गाता रहे मेरा दिल' हा हौशी कलाकारांच्या गाण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्याला बार्शीतील रसिक प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली. या कार्यक्रमात बार्शीकर श्रोते मंत्रमुग्ध झाले होते. कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन फक्त हौशी कलाकारांच्या हस्ते पार पडले.



प्रथमतः ज्योत से ज्योत जलाते चलो हे सर्व महिलांनी एकत्र येऊन गीत गायले आणि सर्व सभागृह उत्साहित करुन टाकले. त्यानंतर ७५ वर्षाच्या श्रीमती शोभा रणशूर यांनी जाईये आप कहा जाये हे गीत सादर करुन कार्यक्रमात रंगत आणण्यास सुरुवात केली. त्यांच्या या गीताला प्रेक्षकांनी खूप प्रतिसाद दिला. सदर कार्यक्रमात सीए बालकिसन जाजू, राहुल झोंबाडे, मेजर अविनाश हिंगमिरे, प्रशांत माळवदे, रवींद्र मैंदर्गीकर, अशोक डहाळे, गोविंद तापडिया, अजय खंडेलवाल आणि सुनील फल्ले या पुरुष कलाकारानी गीते सादर केली. तसेच श्रीमती लक्ष्मी तोरड, रुपाली पवार, सुनीता जाजू, स्वाती डोळे, निमा कांबळे, अरुणा तापडिया आणि श्रीमती शोभा रणशूर या महिलांनी गीते सादर करुन सभागृह मंत्रमुग्ध करुन टाकले .सीए जाजूंच्या 'यारी है इमान मेरा' गाण्याला प्रेक्षकांनी सभागृह डोक्यावर घेतले होते. या कार्यक्रमात दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे, प्रेम कैदी,मोहरा, हिम्मत, दिलवाले, राजा, याराना, जंजीर, फुल और कांटे, दिवाना, संगम, आप आये बहार आई, आराधना, अभिमान, अंजाना अशा जुन्या नव्या चित्रपटांची गीते सादर करण्यात आली. कार्यक्रमास सौ. मंजुषा राऊत आणि सौ. प्रेमा राऊत यांनी सूत्रसंचालन करुन कार्यक्रम बहारदार करण्यास मदत केली. कार्यक्रमास वृक्ष संवर्धन समिती बार्शी, ओन्ली समाजसेवा संस्था, बार्शी अकाउंटंट असोसिएशन, माहेश्वरी समाज, वीरशैव लिंगायत तेली समाज, प्रसन्नदाता गणेश मंडळ, हेल्थ क्लब, आरके क्लब, भारत विकास परिषद, सुप्रभातम ग्रुप अशा विविध संस्थाचे सदस्य उपस्थित होते. सदर कार्यक्रमास बार्शीचे आमदार दिलीपराव सोपल यांनीही उपस्थिती लावून कार्यक्रमाचा आनंद घेतला. कार्यक्रमाचा शेवट जिना यहा मरना यहा हे गीत सर्व कलाकारांनी सादर करुन केला. प्रेक्षकांची उपस्थिती लक्षणीय होती. संपूर्ण हॉल तुडुंब भरलेला असल्याने काही प्रेक्षक उभारुन गाण्याचा आस्वाद घेत होते तर काही प्रेक्षक बाल्कनीवर बसून गाण्याचा आनंद घेत होते. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बालकीसन जाजू, लक्ष्मी तोरड, राहुल झोंबाडे, गोंविंद तापडिया, सुनील फल्ले यांनी नियोजन केले होते.

# आपला जिल्हा


सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




दैनिक तरुण भारतला वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देताना सौ. शैलजा प्रशांत माने, राधा पवार, श्रीदेवी कुलकर्णी.



## 'तरुण भारत'च्या वर्धापन दिनी मान्यवरांची उपस्थिती



अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे



अतुल्य सेवा प्रतिष्ठानचे अनिल कोंडा श्रीनिवास बिटला, श्रीनिवास कनकी व श्रीनिवास यन्नम.



सोहम ॲड्सचे रविंद्र जोगीपेठकर व रोहित जोगीपेठकर.





सोलापूर जनता सहकारी बँकेचे मुख्याधिकारी लक्ष्मण सुतार व सिनिअर ऑफिसर सुहास मुळजकर



सुनील नागणे, अण्णासाहेब क्षीरसागर.



बहुजन शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी महासंघाचे राज्य अध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर, प्राचार्य बोधीप्रकाश गायकवाड, रवी देवकर.



सोलापूर विकास मंचचे मिलिंद भोसले आणि विजय जाधव



प्रा.रेश्मा माने



डॉ. अरविंद कुंभार



पत्रकार संजय येऊलकर, उज्वलकुमार माने



अक्कलकोटचे पत्रकार राजेशकुमार जगताप, स्वामीराव गायकवाड, नंदकुमार जगदाळे, रमेश भंडारी, कांत झिपरे.



पत्रकार महेश पांढरे, हणमंत माने.



ड्रीम फाऊंडेशनचे संस्थापक काशिनाथ भतगुणकी.



विजय इप्पाकायल, रमेश सूंचू.



दै. पुण्यनगरीचे व्यंकटेश पटवारी, रघुवीर शिराळकर, कृष्णकांत चव्हाण.



महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनचे अध्यक्ष बापुसाहेब सदाफुले, योहान कानेपागुल, इक्बाल तडकल, शिवराज शिंदे, अरुण म्हेत्रे.



हास्य तुषार ग्रुप मंद्रुप



श्री. अनिल पाटील व सौ. सुनिता पाटील



विवेक सांजेकर



दुर्गा मंत्री-जोशी



अमिता जगदाळे, भारती मुनोळी, ललिता झळके, शोभा थडकर



रविंद्र देशमुख



सोमनाथ सोनकांबळे

सीए महादेव खराडे

भावेश शहा

अरविंद जामगोंडी

कैलास कसबे

श्रीशैल कटीमनी

श्री. मधुकर गवळी

प्रा.शिवाजी शिंदे

मिलिंद वेणेगुरकर

अनंत जाधव

श्री. सक्करगी, डॉ. व्यंकटेश मेतन

डॉ. नेहा तंबाके



सचिन गायकवाड, प्रा. संतोष गवळी, संतोष खेंडे, मारुती घोडके, प्रशांत कदम, संतोष पाटील.



चांगदेव सोनवणे, भालचंद्र साखरे, कानिफनाथ थोरात, प्रा. नवनाथ कुचेकर, ॲड. संघपाल घोडकुंबे, प्रसेनजीत शिंगे, सतीश वाघमारे, दुर्योधन मस्के, रामकृष्ण लांबतुरे, नंदकुमार येच्चे.



विजयकुमार पिसे



राजकुमार सारोळे सचिन जाधव अविनाश गोडसे



सुनिल रसाळे, चक्रपाणी गजम, श्री.भोसले



विश्वनाथ हिरेमठ, सुरेश टेळे व नागेश जोडमोटे



राजु राठोड, अनिल राठोड व शिवशंकर राठोड



अर्थशास्त्र विभागाचे अध्यक्ष डॉ. संतोष कदम व प्रा. कृष्णदेवराय गरड



भावसार व्हिजनचे विशाल खमितकर, सुनील उपरे



दयानंद पाटील व डॉ. तात्याराम व्हनमाने



संतोष धाकपाडे, अजित चौहान



सुनिता रोटे



आरती कुसेकर, वैशाली कांबळे, रंजना घोडके



रविंद्र नाशिककर



केदार बदामीकर